अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी २०१२ | किंमत १५ रुपये




## 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे आमच्या सर्व वाचकांना व मित्रपरिवाराला नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!












बेट्टी मेहमूदी, अरविंद अडिगा, सुधा मूर्ती, जेफ्री आर्चर, किरण बेदी,
तसलीमा नसरिन यांसारख्या जगदविख्यात लेखकांच्या पुस्तकांचे सरस
अनुवाद करून अनुवाद क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या प्रख्यात अनुवादिका
लीना सोहोनी यांच्या 'अ प्रिझनर ऑफ बर्थ' या २५व्या अनुवादित पुस्तकांचे प्रकाशन
पुणे येथील प्रेसिडेंट हॉटेलमध्ये पार पडले.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी २०१२ ◆ वर्ष बारावे ◆ अंक पहिला


– अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | १२ |
| पुरस्कार | ४८ |
| पुस्तक परिचय | ५६ |
| अभिप्राय | ७४ |
| ओळख लेखकांची | ८४ |
| श्रद्धांजली | ९८ |
| वाचकांचा प्रतिसाद | १०२ |
| बालनगरी | १०४ |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
अश्विनी कुलकर्णी

अंकाची किंमत१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension (ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३
E-mail : info@mehtapublishinghouse.com


**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# ग्रंथव्यवहाराचे नवे पैलू

जागतिक प्रकाशन व्यवसायाच्या दृष्टीने इ.स.२०११ हे वर्ष महत्त्वपूर्ण गणले जाईल; कारण या वर्षात ‘बुक इज डेड’ या घोषणेचा जो बागुलबुवा गेल्या काही महिन्यात उभा केला जात होता, आणि ई-बुकच्या सार्वत्रिक आक्रमणांचा जो डागोंरा पिटला जात होता त्याचे वास्तव आणि व्यावहारिक स्वरूप हे परस्पर शत्रत्वाच्या ऐवजी सहकार्यानेच राहणे अपरिहार्य आहे याची जाणीव संबंधितांना होऊ लागली आहे. या वर्षात इ-बुकचा प्रसार निश्चितच झाला आणि डेडिकेटेड ई-बुक रीडर बरोबर (किंडल, नूक इ.) आयपॅड, आयपॉड, टॅब्लेट, ई-फोन वगैरे साधनांवरही ई-बुक सहजपणे वाचता येईल अशा तंत्रसुलभतेची ग्वाही मिळाली. तसेच किंडल, नूक गॅलक्सी वगैरे वाचनयंत्राच्या आणि ई-फोन्स च्या किंमतीतही लक्षणीय घट झाली आहे. त्यामुळे ई-बुक आपल्याही आटोक्यात आहे याची सर्वसामान्य वाचकाला कल्पना आली. ई-बुक्स ची विक्रीही वाढू लागली. छापील पुस्तकांच्या खपापेक्षा ई-बुक्सचा खप वाढू लागला. हे चित्र अर्थात अमेरिकेत मोठ्या प्रमाणात दिसू लागले. यूरोपमध्ये जर्मनी, इंग्लंड वगैरे मोजक्या देशातच इ-बुकची चर्चा चालू आहे. ई-बुक डाऊनलोड सहज करता येईल अशा तंत्रज्ञानाची उपलब्धता हा एक अडसर होता, तो आता दूर होत आहे. त्यामुळे २०१२ मध्ये युरोपियन देशात ई-बुक्सच्या प्रसाराचा धूमधडाका सुरू होईल. ॲमेझॉन तर्फे त्यासाठी प्रचार मोहिमांची आखणी करण्यात येत आहे. टॅब्लेट पीसीचे उत्पादकही ई-बुकच्या या प्रसारमोहिमांचा पाठपुरावा करून टॅब्लेटचा खप वाढविण्याची स्वप्न बघत आहेत. पुस्तकांच्या कॉपीराइटबाबत अजून न्यायालयात वाद चालू आहेत. डिजिटल प्रकाशनाचे हक्क लेखकाकडे की प्रकाशकाकडे याबाबत संभ्रम आहे. तसेच डिजिटल स्वरूपातच पथथम पुस्तक निघाले तर प्रकाशक आणि लेखक तसेच ॲमेझॉन, गुगल, बार्न्स अँड नोबल सारखे डिजिटल सेवा देणारे सर्व्हिस प्रोव्हायडर्स यांच्यात मानधनाची वाटणी कशी करायची याबद्दलही वाटाघाटी चालू आहेत. ग्रंथालयांनी षिजिटल पुस्तकाच्या  स्वरूपातील सेवा देताना एका वेळी २६ पेक्षा जास्त वेळा ते पुस्तक वाचकांना देऊ नये. तसे देण्यासाठी त्यानंतर नव्याने शल्कि घ्यावे असा आदेश प्रकाशक संघाने काढला आहे. ग्रंथालये अर्थात छापील पुस्तके वाचकांना कितीही

वेळा देऊ शकतील. पुस्तक फाटेपर्यंत किंना नंतरही बाईंडिग करून. त्याबाबत काहीच अडचण नाही. मात्र ते डिजिटल पुस्तकांची देवघेव अधिक प्रमाणात करू लागतील तेव्हा या बाबत तर देशांनाही नियम करावे लागतील तेव्हा याबाबत इतर देशांनाही नियम करावे लागतील. सेल्फ पब्लिशिंग करणाऱ्या लेखकांच्या संदार्भातही कॉपीराइटचे व्यवहार पाहणाऱ्या यंत्रणांची गरज लागेल. त्यांच्यातही करार मदार करताना लेखकांच्या हितसंबंधांना बाधा येता कामा नये याकडे लक्ष द्यावे लागेल.

डिजिटल पुस्तकांचे हक्क देताना ते वेगवेगळ्या भौगोलिक क्षेत्रांनुसार आणि भाषांनुसार द्यावे लागतील. चित्रपट, नाटक, दूरचित्रवाणी मालिका, ॲनिमेशन वगैरे माध्यमांनुसार त्यात फरक करावे लागतील हेही स्पष्ट होऊ लागले आहे. 'ई-बुक्स' मुळे प्रकाशन क्षेत्राच्या एकूणच स्वरूपात आणि कार्यपद्धतीत आमूलाग्र फरक पडणार आहे; हे जाणवू लागले असले तरी त्या फरकाची व्याप्ती किती व कशी असू शकेल हे लक्षात यायला काही काळ जावा लागेल. गेल्या वर्षात अमेरिकेत याबाबत वेगवेगळे प्रश्न समोर आले आणि अनेक समजुतींना तसेच पूर्वग्रहांना धक्का बसला. उदाहरणार्थ, छापील पुस्तकांच्या किंमतीपेक्षा षिजिटल पुस्तकांच्या किमती कमी असतील असे आपण मानतो. षिजिटल पुस्तकाला कागद, छपाई, बांधणी, टपाल खर्च वगैरे खर्च नसतो. तेव्हा ते स्वस्तात मिळावे असे आपण गृहीत धरूनच विचार करतो. गेल्या वर्षी काही पुस्तके अशी निघाली की ज्यांच्या डिजिटल किंमती छापील पुस्तकांपेक्षा जास्त आहेत.

ॲमेझॉनने नोव्हेंबर २००७ मध्ये प्रथम ई-बुक रीडर किंडल बाजारात आणले तेव्हा त्याची किंमत ३९९ डॉलर्स ठेवली आणि त्यावर कोणतेही पुस्तक ९.९९ डॉलर्सना डाऊनलोड करता येईल असे जाहीर केले. आता किंडलची किंमत ६९ डॉलर्स पर्यंत खाली आहे, मात्र डिजिटल पुस्तकांची किंमत बदलती राहणार आहे. केन फोलेटची फॉळ ऑफ जायन्ट्स ही नवी थरारकथा पेपरबॅक आवृत्तीमध्ये १६.५० डॉलर्सना उपलब्ध आहे. परंतु ॲमेझॉनवर तिची डिजिटल आवृत्ती १८.९९ डॉलर्सना देण्यात येत आहे. सहा प्रमुख प्रकाशनसंस्थांनी एकत्र येऊन ई-बुकच्या किंमती प्रत्येकाने आपल्या सोईप्रमाणे ठरवाव्या असा निर्णय घेतला आहे. ई-बुक्सच्या किंमती छापील पुस्तकांच्या किंमतीप्रमाणे ठराविक असणार नाहीत. त्यामुळे वाचकांना ई-बुक्स ही महागडी वाटण्याची भीती या व्यवसायातील काही जाणकारांना वाटत आहे. छापील पुस्तक घेताना एक वस्तू आपल्या हातात येते. ई-बुक घेताना फक्त त्याचा मजकूर वाचण्याचा हक्क मिळतो. त्यामुळे वाचक छापील प्रतींना प्राधान्य देतील आणि ई-बुकची मागणी कमी होईल असा त्यांचा युक्तिवाद आहे. हे सगळे नवे तंत्रज्ञान असल्याने अशा वेगवेगळ्या अडचणी समोर येत राहणारच शेवटी वाचकांच्या सोईचे जे असेल

त्याचा वरचष्मा राहील. प्रकाशन संस्था किंवा ॲमेझॉनसारख्या यंत्रणा यांना वाचकांची अपेक्षा आणि सुविधा लक्षात घेऊनच धोरणे ठरवावी लागणार आहेत. छापील पुस्तके जुनी झाली तरी विकली जातात. स्वस्तात मिळतात. वीस पंचवीस डॉलरचे जुने पुस्तक दोन-तीन डॉलर्सना मिळते. असा स्थितीत ई-बुक म्हणून ते दहा-पंधरा डॉलर्सना घेण्यात वाचकांना काय स्वारस्य वाटणार असा प्रश्न स्वाभाविक आहे. जास्त किंमतीमुळे पायरसीलाही चालना मिळते., या वस्तुस्थितीकडेही दुर्लक्ष करता कामा नये अमेकितील अनेक बेस्टसेलर पुस्तके भारतीय शहरांमध्ये फूटपाथवर स्वस्तात मिळतात; मराठी पूस्तकांच्याही पायरेटेड प्रती मिळतात. तेव्हा किंमतीचा मुद्दा नजरेआड करुन चालणार नाही.

ई-बुक्स ही छापील पुस्तकांच्या तुलनेत कमी किंमतीतच मिळायला हवीत, आणि तशी ती मिळाली तरच त्यांना वाचकांचा प्रतिसाद मिळेल हे स्पष्ट आहे. ॲमेझॉनने पाच वर्षांपूर्वी ९.९९ डॉलर्सना ई-बुक असे जाहीर केल्याने त्याकडे ग्राहकांचे लक्ष गेले. त्या किंमतीतही आता घट होत आहे. काही सेल्फ पब्लिशर लेखक आपले पुस्तक ई-बुक म्हणून नेटवर एक-दोन डॉलर्समध्येही देत आहेत आणि हजारो प्रती विकत आहेत. ॲपलने रँडम हाऊस, हॅचेट, मॅकमिलन, सीमन अँड शूस्टर, पेंग्विन, हार्पर कॉलिन्स या अग्रगण्य प्रकाशन संस्थांना एकत्र आणून ठोक किंमतीच्या धोरणाचा त्याग करून, किरकोळ ग्रंथविक्रेत्यांना सवलतीत पुस्तके विकण्याची मुभा असावी यासाठी राजी केले आहे. ॲमेझॉनच्या पुढे त्यांना टिकून राहण्यासाठी हे धोरण आवश्यक आहे, हे ॲपलने प्रकाशन संस्थांच्या लक्षात आणून दिले ते चांगले झाले. इ.स.२०१२ मध्ये मराठी ग्रंथव्यवहारात ई-बुकचे प्रमाण वाढत राहील असे दिसते. परंतु आणखी दोनतीन वर्षे हे प्रमाण बेताचेच राहील असेही वाटते. मोबाइल, आयपॅड, आयफोन, आयपॉड आणि वाचन यंत्रे ज्या वेगाने लोकांपर्यंत पोचतील, त्या वेगानेच डिजिटल पुस्तकांचे अस्तित्व फैलावत जाईल.

सुनील मेहता



**आगामी**




# लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स

मूळ लेखक

**बर्नी सिगेल, एम.डी.**

अनुवाद

**डॉ. शुभदा राठी लोहिया**

१९०रु. पोस्टेज २५रु.

बंधनमुक्त प्रेम हे प्रतिकार क्षमता वाढविणारे सर्वात शक्तिशाली प्रेरक होय. प्रेमाने माणूस दुरुस्त होतो ही एक सत्य बाब आहे. ज्या रुग्णांमध्ये प्रेम करण्याचे धैर्य असते व दुरुस्त होण्याच्या प्रक्रियेत तसेच त्यावर परिणाम व्हावा म्हणून डॉक्टरांसोबत काम करण्याचे धैर्य असते असे अपवादात्मक रुग्ण रोज एक नवीन आश्चर्य अनुभवतात.

उठा, त्वरा करा, नजीकच्या पुस्तकालयात जा व तुम्ही स्वत:ला आजारी अगर निरोगी कसे 'बनवता' याचे स्पष्टीकरण देणारे हे अद्भूत पुस्तक मिळवा... प्रत्येक कुटुंबाजवळ याची एक प्रत असायला हवी. हे जीवनदान देणारे पुस्तक आहे.

***—ॲन लॅन्डर्स.***

## टी बुक क्लब २० मधील सहावे पुस्तक







**जेफ्री आर्चर**

अनु. **लीना सोहोनी**

**५००रु.**

टी बुक क्लब सभासदांना २५०रु.

पोस्टेज ३०रु.

डॅनी कार्टराईटने बेथ विल्सनला लग्नाची मागणी आदल्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी घातली असती, तर त्याच्यावर आपल्या जिवलग मित्राचा खून केल्याचा आरोप ठेवण्यात आला नसता आणि त्याला अटकसुद्धा झाली नसती.

जेव्हा फिर्यादी पक्षाकडून चार नामांकित साक्षीदार आणण्यात येतात : एक बॅरिस्टर, एक लोकप्रिय अभिनेता, एक उच्चकुलीन प्रतिष्ठित व्यक्ती आणि एक नावाजलेल्या फर्ममधला तरुण, धडाडीचा पार्टनर... तेव्हा तुमची बाजू कोर्टात कोण ऐकून घेणार?

डॅनीला बावीस वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा होते. त्याला बेलमार्श तुरुंगात पाठवण्यात येतं. देशातल्या सर्वांत जास्त कडक सुरक्षाव्यवस्थेसाठी प्रसिद्ध असलेला हा तुरुंग! आजवर कोणताही कैदी तिथून पळून जाऊ शकलेला नाही. पण डॅनीच्या अंतर्यामी एक आग भडकलेली आहे. आपल्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्याची आग. ती आग त्याला जाळते आहे; पण याची किंचितही कल्पना स्पेन्सर क्रेग, लॉरेन्स डेवनपोर्ट, जेराल्ड पेन आणि टोबी मोर्टिमर यांना नाही. डॅनीला साथ आहे त्याच्या प्रेयसीची, बेथची. डॅनीच्या नावाला लागलेला कलंक धुवून काढण्यासाठी तिनेही न्यायालयाची दारं ठोठावलेली आहेत. सच्च्या दिलाच्या या प्रेमिकांच्या अथक प्रयत्नांनी अखेर त्या चौघांना पळता भुई थोडी होते. जिवावर उदार होऊन अखेर रणांगणातून पळ काढावा लागतो.

'केन आणि एबल' नंतरची तेवढीच जबरदस्त, वाचकांची मती गुंग करणारी, शेवटच्या पानापर्यंत वाचकांच्या मनाचा ताबा घेऊन त्यांना खिळवून टाकणारी ही कादंबरी!

# टी बुक क्लब २१ मधील पहिले पुस्तक




## द स्पिरिच्युअॅलिस्ट

**मेगन चान्स**

अनु. **मुकुंद कुर्लेकर**

न्यूयॉर्कमधील भद्रलोक संस्कृतीचे चित्रण करणारी मेगन चान्स यांची आगळी वेगळी कादंबरी. या रहस्यप्रधान कादंबरीमधील तपासाला मदत होते एका मृतात्म्याची!

**३२०रु.**

टी बुक क्लब सभासदांना १६०रु.

पोस्टेज ३०रु.

## T बुक क्लब २१

नोंदणी सुरू

**सभासद फी ५०रु. आजच भरा आणि सभासद व्हा!**

जगप्रसिद्ध इंग्रजी कादंबऱ्यांचे सरस मराठी अनुवाद आणि तेही निम्म्या किमतीत! एका क्लबमध्ये ६ पुस्तके,
ही सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

## टी बुक क्लब २१ मधून प्रकाशित होणारी इतर पुस्तके

| **पुस्तकाचे नाव** | **मूळ लेखक** | **अनुवाद** |
|---|---|---|
| क्रिटिकल | रॉबिन कुक | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर |
| द चेंबर | जॉन ग्रिशॅम | अनु. विश्वनाथ केळकर |
| बिट्रेयल | जॉन लेस्क्रॉर्ट | अनु. एम.व्ही. कुर्लेकर |
| झॅप्ड | कॅरॉल हिगिन्स क्लार्क | अनु. जयंत गुणे |
| शॅडो मॅन | कोडी मॅकफेद्येन | अनु. उदय भिडे |

वाचकांनी आपली सभासद फी (५०रु.) डी.डी. अथवा मनीऑर्डरने
'मेहता पब्लिशिंग हाऊस' येथे पाठवावी.

**आगामी**




# असे शास्त्रज्ञ, असे संशोधन

**निरंजन घाटे**

१९०रु.

पोस्टेज २५रु.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्तींबद्दल सामान्य माणसांच्या मनात नेहमीच कुतूहल असतं. शास्त्रज्ञांचा विक्षिप्तपणा, त्यांची एककल्ली वृत्ती संशोधकांची धडपड, पेटंट मिळाल्यानंतर एकाच पेटंटवर अमाप श्रीमंत बनलेल्या संशोधकांची कहाणी, ह्या गोष्टी सत्य हे कल्पनेपेक्षा अद्‌भुत असतं, हे पटवून देतात. त्यामुळं अशा व्यक्ती घडल्या कशा हे जाणून घ्यायचीही आपल्या मनात इच्छा असते.

ह्या पुस्तकामध्ये अशा मान्यवर शास्त्रज्ञ आणि संशोधकांच्या बाबतीतलं कुतूहल शमविण्याची क्षमता आहे. त्याच बरोबर ह्यामुळं तरुण वाचकांना आपणही असं काहीतरी करायला काय हरकत आहे, असं वाटावं, ही अपेक्षाही लेखकाला वाटते. त्याच दृष्टीनं हे पुस्तक वाचावं, असं मात्र नाही. ह्या शास्त्रज्ञांची धडपड वाचून वाचकाची करमणूकही होईल. त्यामुळंही वाचकानं हे पुस्तक वाचायला हरकत नाही.

आगामी




# साहित्यिक जडण-घडण

**डॉ. आनंद यादव**

१५०रु.

पोस्टेज २५रु.

जीवन जगताना माणसाने गतानुगतिक पद्धतीने, सांकेतिक रीतीने जगू नये. जीवनात येणाऱ्या अनुभवांना संवेदनशील वृत्तीने सामोरे जावे. जीवनात अनेक घडामोडी घडत असतात; त्यांचा अनुभव स्वतंत्र वृत्तीने, आपल्या आवडी-निवडीनुसार घ्यावा. असे केले तर जीवनातील एरवी साधे, सरळ, सांकेतिक वाटणारे अनुभवसुद्धा नवनव्या संवेदना, नवनवे जीवनार्थ, नवनवे चिंतन देऊन जातात. परिणामी आपण नेहमीच्या सांकेतिक, सरळ, सोप्या, साध्या जीवनातसुद्धा 'अनुभव-समृद्ध' होऊन जातो. याची एकदाची सवय झाली की, आपण तथाकथित चाकोरीतील जीवनातही अनुभवसमृद्ध बनतो...

या साठीच ललित आणि चिंतनशील साहित्याचे वाचन आणि मनन केले पाहिजे. तरच आपले जीवन विविध सौंदर्याने संपन्न होऊ शकेल.




*** चंद्रपुरात जुळणार वैदर्भीय योग**

पंचाऐंशीव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी, समीक्षक वसंत आबाजी डहाके यांची निवड झाली आहे. अध्यक्षाच्या निवडणूकीत सर्वाधिक म्हणजे ५५० पैकी ३७४ मते मिळवून डहाके विजयी झाले आहेत.

फेब्रुवारी महिन्याच्या ३,४ आणि ५ तारखेला चंद्रपुरातील राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात संमेलन होणार आहे. सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपुर आणि सरदार पटेल मेमोरियल ट्रस्ट या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन होणार असून, सुमारे अडतीस वर्षांनंतर चंद्रपुरात संमेलन होत आहे.

*** संस्कृत ग्रंथांचे नेपाळमध्ये जतन**

भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर व पुणे विद्यापीठ पाली विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य धर्मानंद कोसंबी स्मृती व्याख्यानांतर्गत 'नेपाळ-जर्मन हस्तलिखित जतन प्रकल्प' या विषयावर बोलताना हॅम्बर्ग विद्यापीठाचे संचालक प्रा. अल्बर्ट हेनिश्च म्हणाले, ''नेपाळी, संस्कृत, तिबेटियन अशा विविध भाषांमध्ये अस्तित्वात असलेल्या पोथ्या नेपाळने आपल्या सरकारी ग्रंथालयामध्ये अत्याधुनिक पद्धतीने जतन केल्या आहेत. 'नेपाळ-जर्मन हस्तलिखित जतन प्रकल्प' भविष्यात सर्वच देशांसाठी अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे.''

डॉ. श्रीकांत बहुलकर म्हणाले, ''सध्या उपलब्ध असलेल्या दुर्मिळ पोथ्या, हस्तलिखिते हे हिमनदीचे एक टोक असून, अजून बरेचसे ग्रंथ आपल्याला माहीत नाहीत. भारताप्रमाणेच बौद्ध राष्ट्रांमध्येही हा सांस्कृतिक ज्ञानाचा खजिना मोठ्या प्रमाणात आहे.'' संस्थेच्या सचिव मैत्रयी देशपांडे यांनी प्रास्ताविक केले.

*** 'साहित्य व कृतीला नाटक जोडते'**

''साहित्य व कृती यांना जोडणारे नाटक असते. नाटकात उक्ती व कृतीची सांगड घालून ते विशिष्ट टोकाला नेले जाते,'' असे मत डॉ. शुभदा शेळके यांनी पुणे विद्यापीठ मराठी विभागातर्फे रा. शं. वाळिंबे यांच्या जन्मशताब्दी व्याख्यानमालेत व्यक्त केले. मराठी विभागाच्या प्रमुख विद्यागौरी टिळक यावेळी उपस्थित होत्या. डॉ. शेळके म्हणाल्या, ''साहित्यातून आलेले बदल प्रेक्षकांपर्यंत कसे पोचतील, याचा आढावा नाटकात घेतला जातो. नाटकाचे सादरीकरण प्रायोगिक स्वरूपाचे

आहे. नाटकाचा परिणाम शोधण्यासाठी नाटकांचा अभ्यास केला पाहिजे. एखाद्या गोष्टीचे वेगळेपण हे साहित्यात असते, तर घटना, व्यक्ती व वातावरणात नाटक असते.''

*** पायरेटेड सॉफ्टवेअर मुळे अमेरिका तोट्यात**

पायरसीचा अंतर्भाव कंपनीच्या धोरणांमध्येच करण्यात आला आहे असे समजून जगभरातील कंपन्या बेकायदेशीरपणे सॉफ्टवेअर वापरत असतात. पायरेटेड सॉफ्टवेअरमुळे अमेरिकेचे मोठे नुकसान झाले आहे. आणि त्यामुळेच हा देश सध्या आर्थिक अडचणींना तोंड देत आहे, असे मायक्रोसॉफ्ट कंपनीने जाहीर केले आहे. सॉफ्टवेअरच्या पायरसीमुळे ते पुरवणाऱ्या कंपन्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागला. त्यामुळे अमेरिकेतील सॉफ्टवेअर कंपन्यांमधील नोकऱ्यांवर त्याचा परिणाम होऊन एकूण अर्थव्यवस्था डबघाईला आली.

मूळ सॉफ्टवेअरपेक्षा त्याचे डुप्लिकेट किंवा पायरेटेड व्हर्जन वापरण्याकडे जगभरातील कंपन्यांचा ओढा आहे. ओरिजिनल कॉपीसाठी जादा पैसे मोजण्यापेक्षा कमी दरात तेच सॉफ्टवेअर सहज उपलब्ध होते. आयडीसी म्हणजे इण्टरनॅशनल डेटा कॉर्पोरेशनने पायरसीविषयी आकडेवारीच जाहीर केली. जगभरात एकूण सॉफ्टवेअर मध्ये ४१ टक्के सॉफ्टवेअर पायरेटेड आहेत. विकसनशील देशांमध्ये हे प्रमाण सर्वाधिक आहे. चीनमध्ये तर हे प्रमाण एकेकाळी ९० टक्के होते. गेल्या पाच वर्षात ही टक्केवारी ७८ वर आली आहे.

मायक्रोसॉफ्टच्या म्हणण्यानुसार गेल्या पाच वर्षांत पायरेटेड सॉफ्टवेअरमुळे अमेरिकेला तब्बल ८.२ अब्ज डॉलर्सचा फटका बसला आहे. जर देशातील उद्योगधंद्यांमध्ये ओरिजनल सॉफ्टवेअर्स वापरली असती तर त्यामुळे ती पुरवणाऱ्या कंपन्यांना त्याचा फायदा होऊन सध्याची परिस्थिती उद्‌भवली नसती. चीनमध्ये पायरेटेड सॉफ्टवेअर वापरण्यामुळे अमेरिकेला वर्षाकाठी ८३.७ कोटी डॉलरचा तोटा सहन करावा लागत आहे. ही रक्कम इतकी मोठी आहे की एवढ्याच रकमेत दोन लाख लोकांना मासिक चार हजार डॉलर पगाराची नोकरी करता येईल. एकीकडे कम्प्युटरचा खप वाढत असला तरी सॉफ्टवेअरच्या खपाची गती मात्र धीमी असल्याचे चित्र मायक्रोसॉफ्टने समोर आणले आहे.

*** हम साथ साथ है!**

गुगलला टक्कर देण्यासाठी इंटरनेट कंपन्यांना खूप कष्ट घ्यावे लागत आहेत. नवनवीन कल्पना लढवून स्वत:चे अस्तित्व टिकवण्यासाठी या कंपन्या धडपड करताना दिसतात. याचाच एक भाग म्हणून आता याहू, मायक्रोसॉफ्ट आणि एओल (अमेरिका ऑनलाईन) या कंपन्या जाहिरातींची ऑनलाईन स्पेस विकण्यासाठी एकत्र आल्या आहेत. या कराराअंतर्गत या कंपन्या परस्परांच्या व

विकले गेलेल्या जाहिरातींची स्पेस विकणार आहेत तसेच जाहिराती वापरणार आहेत.

या करारामुळे जाहिरातदार आणि प्रकाशकांनाही सोप्या पद्धतीने जाहिराती देणे शक्य होणार आहे. या माध्यमातून परस्परांना उच्च दर्जाची सेवा, जाहिराती देण्याच्या विविध तऱ्हा यामुळे सर्वांचा लाभ होईल, असे मायक्रोसॉफ्ट ॲडव्हर्टायझिंग बिझनेस ग्रुपचे उपाध्यक्ष रिक वान देर म्हणतात. विशेष म्हणजे करार केल्यानंतरही या तिन्ही कंपन्या स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय सुरू ठेवणार आहेत. प्रत्येक कंपनीला स्वत:चे स्वतंत्र निर्णय, धोरण आणि योजना राबविता येणार आहेत. त्यामुळे परस्परांशी स्पर्धा करताना या कंपन्या एकमेकांसोबत सोबत कामही करणार आहेत.

२००८ मध्ये डिस्प्ले ॲडव्हर्टायझिंग मार्केटमध्ये दोन टक्के असलेला गुगलचा हिस्सा चालू वर्षात ११ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. याच कालावधीत याहू ची हिस्सेदारी १८ टक्क्यांवरून १३ टक्क्यांपर्यंत घसरली. तर मायक्रोसॉफ्ट आणि एओएलकडे अनुक्रमे केवळ ५ आणि ४ टक्के हिस्सा आहे. गुगलची हिस्सेदारी वाढण्यामध्ये २००८ मध्ये डबलक्लिक ही कंपनी विकत घेतल्यानंतर झालेला फायदाही आहे.

*** इराणला 'डुकू'ची ढुशी**

गेल्या वर्षी 'स्टक्सनेट' या वर्मने धुमाकूळ घातला. त्यानंतर यंदाच्या वर्षात एप्रिलमध्ये 'स्टार्स' नावाच्या मालवेअरने पायाभूत सोयीसुविधांवर हल्ला चढवला आणि आता 'डुकू' या व्हायरसने इराणच्या सरकारी यंत्रणेला पुन्हा एकदा त्रस्त केले आहे. कम्प्युटरमधल्या महत्त्वाच्या माहितीचे स्क्रीन शॉट्स घेणे, त्यानंतर ती फाइल शोधणे आणि त्यावरून पासवर्ड्स चोरणे, अशी अत्यंत घातक कामे हा व्हायरस करत आहे. सरकारी कार्यालयांना या व्हायरसने आपले लक्ष्य बनवले आहे.

मायक्रोसॉफ्ट डॉक्युमेंटची फाइल इमेलच्या माध्यमातून पाठवून, ती उघडल्यास आपोआपच त्याला जोडलेला व्हायरस कम्प्युटरमध्ये शिरून त्याचे काम सुरू करतो. कम्प्युटर सिक्युरिटी एक्सपर्ट कॅस्परस्की लॅबच्या मते यापूर्वी झालेल्या हल्ल्यांचाच हा एक भाग असून 'स्टार्स'मध्ये थोडीशी सुधारणा करून हा नवा व्हायरस तयार करण्यात आला आहे. कॅस्परस्कीच्या मते डेक्स्टर रेग्युलर या फाँटमध्ये या व्हायरसचा प्रोग्राम लिहिला असून शो-टाइम इनकार्पोरेशनने तो तयार केला आहे.

सरकारी यंत्रणांना लक्ष्य करण्यामागे देशात येऊ घातलेल्या परमाणू प्रकल्पात खोडा घालण्याचा प्रयत्न असल्याचे आंतरराष्ट्रीय पातळीवर बोलले जात आहे.

एक वर्षांच्या कालावधीत तीनवेळा व्हायरसचे तडाखे झेलल्यामुळे इराणचा अणुप्रकल्प पूर्णत्वास येण्यासाठी उशीर होणार आहे. सरकारी यंत्रणांबरोबरच औद्योगिक क्षेत्रावर या हल्ल्यांमुळे परिणाम झाले आहेत. कॅस्परस्की तसेच सिमॅन्टेक यासारख्या सिक्युरिटी सेवा पुरवणाऱ्या संस्थांच्या मते स्टक्सनेट, स्टार्स आणि डुकू यांची रचना अत्यंत हुशारीने केलेली आहे.

साध्यासुध्या हॅकर्सपेक्षा हे काम एखादा सराईतच करू शकतो असे या संस्थांचे म्हणणे आहे. सध्याच्या परिस्थितीत इराण सरकारने डुकूच्या हल्ल्यावर ताबा मिळवला आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यात सरकारला यश आले आहे. पण भविष्यात असा हल्ला होणार नाही याची हमी मात्र इराण देऊ शकत नाही.

*** भाडेतत्त्वावर 'आयपॅड'**

एखाद्या सिनेमाची सीडी भाड्याने घ्यायची आणि तो बघून झाला की ती परत करायची, अशी सोय अनेक ठिकाणी असते. ऑस्ट्रेलियाच्या जेटस्टार एअरवेजने त्यांच्या ठराविक विमानांमध्ये भाड्याने आयपॅड देण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय विमानांमध्ये करमणुकीसाठी अशा प्रकारे टॅब्लेट पीसी देण्यात येणार आहेत.

विमानात बसल्यानंतर समोर असणाऱ्या स्क्रीनवरील सिनेमा, टीव्ही शो, गाणी किंवा गेम्स खेळण्यापेक्षा आयपॅडवर त्याचा आनंद लुटण्याची संधी या ऑस्ट्रेलियन एअरवेजने निर्माण केली आहे. यापूर्वी अमेरिकन एअरलाइन्सने फर्स्ट क्लास तसेच बिझनेस क्लाससाठी सॅमसंग गॅलेक्सी टॅब पुरवण्याची घोषणा केली होती. दोन तास किंवा त्यापेक्षा जास्त वेळ होणाऱ्या प्रवासामध्ये जेटस्टारतर्फे आयपॅड देण्यात येणार आहेत. १० ते १५ डॉलर इतके भाडे आकारून प्रवाशांना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. तूर्तास तरी ऑस्ट्रेलिया, टास्मानिया आणि न्यूझीलंड या देशांमधील विमानांमध्ये ही सोय सुरू होणार आहे. त्याचप्रमाणे जपान, सिंगापूरला जाणाऱ्या विमानांमध्येही ही सुविधा सुरू होणार आहे.

नव्या जनरेशनचे आयपॅड्स विमानात प्रवाशासमोर बसवलेले असतील. २० तास बॅटरीची क्षमता असणाऱ्या या आयपॅडमध्ये गेम्स, गाणी, सिनेमे प्री-लोडेड असतील. देशांतर्गत विमानांपासून सुरुवात करत हळूहळू आंतरराष्ट्रीय सेवेतही आयपॅड देण्यास सुरुवात होणार आहे. जेटस्टारने सध्याच्या घडीला तीन हजार आयपॅड्सचा करार ॲपलशी केला आहे. अमेरिकन एअरलाइन्सनेही सॅमसंगशी गॅलेक्सी टॅबसाठी करार केला आहे. त्याचप्रमाणे उत्तर अमेरिकेतील विमानसेवेसाठी सहा हजार टॅब्स त्यांनी विकत घेतल्या आहेत.

*** नव्या ऑपरेटिंग सिस्टिमचे 'रिम'ला कौतुक**

'गुगल'च्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टिमवर चालणारे स्मार्टफोन आणि 'ॲपल'च्या आयफोनची टक्कर रिसर्च इन मोशनला (रिम) बसली आहे. कंपनीच्या विक्रीत घट होत आहे. ब्लॅकबेरी या ब्रँडनेमअंतर्गत कंपनी बिझनेस आणि स्मार्टफोन विकते. स्पर्धेला तोंड देण्यासाठी 'रिम' पुन्हा तयारी करू लागली आहे. कंपनीची नवी ऑपरेटिंग सिस्टिम ही 'आश्चर्यचकित' करणारी असेल, असा विश्वास कूपरमन यांना आहे. लेऑन कूपरमन या हेज फंडाने 'रिम'मध्ये हिस्सा खरेदी केलेला आहे. स्मार्टफोनच्या बाजारपेठेतील 'रिम'चा हिस्सा ६८ टक्क्यांनी कमी झाला आहे. जॅग्वार फायनान्शिअल कॉर्पने कंपनीचे विभाजन, विक्री किंवा विलीनीकरण करण्याची मागणी केली आहे. कंपनीने सर्वप्रथम ई-मेल सुविधा असणारा मोबाइल हँडसेट बाजारात आणला होता. एखाद्या अन्य कंपनीशी विलीनीकरण केल्यास तयार होणारे मूल्य हे कंपनीच्या बाजारमूल्यापेक्षा अधिक असेल, असे कूपरमन यांचे म्हणणे आहे. फंड कंपनीने 'रिम'मधील १४.३ लाख शेअर विकत घेतले होते. 'रिम'मधील एक अब्ज डॉलर मूल्याचे शेअर कंपनीचे सह अध्यक्ष आणि सह मुख्य कार्यकारी अधिकारी जेम्स बलसिले आणि मायकेल लाझार्डिस यांच्याकडे आहेत. कंपनीचे सात कोटी ग्राहक आहेत. कंपनीचा अमेरिकी बाजारपेठेतील हिस्सा ९.२ टक्क्यांवर आला आहे. गेल्या आर्थिक वर्षात हिस्सा २४ टक्क्यांवर होता. ग्राहकांनी आयफोन आणि अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टिमवर चालणाऱ्या मोबाइल हँडसेटना प्राधान्य दिल्याचे यावरुन दिसते.

*** 'ब्लॅकबेरी'ची ॲप डेव्हलपमेंट भारतात**

मोबाइलवर वापरल्या जाणाऱ्या ॲप्लिकेशन्सच्या निर्मितीत भारतात प्रचंड संधी आहेत, असे रिसर्च इन मोशन (रिम) इंडियाचे सहकार्य आणि रितेशन डेव्हलपर विभागाच्या प्रमुख ॲनी मॅथ्यू यांनी सांगितले. ही कंपनी ब्लॅकबेरी या ब्रँडनेम अंतर्गत स्मार्टफोन बनविते. कॅनडास्थित 'रिम'च्या 'ब्लॅकबेरी'चे जगभरात साडेपाच कोटी ग्राहक आहेत. जगातल्या शंभरपेक्षा जास्त देशात ब्लॅकबेरी उपलब्ध आहे. भारतात मोबाइल ॲप्लिकेशन्स डेव्हलपमेंटमध्ये संधी आम्हाला दिसत आहेत. ब्लॅकबेरी ॲप्लिकेशन वर्ल्डमध्ये २६ हजार भारतीय डेव्हलपर्स रजिस्टर्ड आहेत. दोन वर्षांपूर्वी हीच संख्या पाच हजार होती. हीच संख्या चाळीस हजारांपर्यंत जाण्याची शक्यता आहे,' असे कंपनीला वाटते.

'रिम'ने तामिळनाडू येथील प्रोयगिक प्रकल्पाच्या माध्यमातून इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांना ॲप्लिकेशन डेव्हलपमेंटचे शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. तरूणांनी तरूणांसाठी बनविलेल्या ॲप्लिकेशन्ससाठी आम्ही तमिळनाडूमध्ये प्रायोगिक तत्त्वावर प्रोजेक्ट सुरू केला आहे. लवकरच हा प्रकल्प देशभरात

राबविण्याचा विचार कंपनी करीत आहे. कंपनी ७०:३० या प्रमाणात रेव्हेन्यू शेअर करते. यात अ‍ॅप्लिकेशन डेव्हलपरला मोठा हिस्सा मिळतो. यातील ८० टक्के अ‍ॅप्लिकेशन्स ही पार्टनर्सकडून डेव्हलप करण्यात येतात. उर्वरित रिम स्वत: डेव्हलप करते. रिम भारत सरकारसाठी आरोग्य आणि शिक्षण खात्यासाठी ई-गव्हर्नन्स प्रोजेक्ट्स डेव्हलप करीत आहे.

रिम लवकरच निअर फिल्ड कम्युनिकेशन्स (एनएफसी) हे तंत्रज्ञान भारतात सादर करणार आहे. नोव्हेंबर अखेरीस एनएफसी भारतात सादर करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. याचा भारतातील वैद्यकीय क्षेत्राला फायदा होईल. एनएफसीच्या माध्यमातून औषध कंपन्या ग्राहकांकडून लगेचच माहिती मिळवू शकणार आहेत. एनएफसीमुळे वेगवेगळ्या अ‍ॅप्लिकेशन्स अधिक परिणामकारक होतील. उदा. एखाद्या ऑफिसमध्ये एनएफसीच्या माध्यमातून आयकार्डावरील माहिती ब्लॅकबेरीवर घेता येईल. यामुळे ग्राहकांना कार्डाऐवजी मोबाइलचा वापर करता येईल; तसेच यामुळे ग्राहकांना बिझनेस कार्ड्सही एक्स्चेंज करता येतील. यापूर्वी सॅमसंगने वाडा या ऑपरेटिंग सिस्टिमसाठी अ‍ॅप्लिकेशन तयार करण्याची स्पर्धा भारतात घेतली होती.

*** गुगलचे क्रोमबुक पुढच्या वर्षी**

गुगलचे लॅपटॉप किंवा नेटबुकसारखे दिसणारे क्रोमबुक पुढच्या वर्षी भारतात दाखल होणार आहे. चालू वर्षी जूनमध्ये कंपनीने जगभरात क्रोमबुकची विक्री सुरू केली. मात्र हे क्रोमबुक एसर आणि सॅमसंगने तयार केलेले आहेत. सध्या अमेरिकेत स्टोअर्समध्येही याची विक्री होत नसून इच्छुकांना अ‍ॅमेझॉन डॉट कॉमवर त्यासाठी मागणी नोंदवावी लागते. एसरच्या एसी ७००-१०९९ या क्रोमबुकची किंमत १७ हजार ६९४ रूपये असून सॅमसंगच्या १२.१ इंच आकाराच्या सिरीज ५ मधील थ्री-जीची किंमत २५ हजार ३५० रूपये आहे.

लॅपटॉप सारखे दिसणारे हे क्रोमबुक गुगलच्या क्रोमबुक ऑपरेटिंग सिस्टिमवर चालते. नवीन लॉग इन स्क्रीन, ऑफलाइन अ‍ॅप्स, न्यू टेक्नॉलॉजी फाईल सिस्टिमसारख्या अनेक नवीन सुविधा देण्यात आल्या आहेत. या क्रोमबुकमध्ये सुरक्षेसाठी दोन टप्प्यातील लॉग-इन देण्यात आले आहे. तसेच इंटरनेटशी कनेक्ट नसतानाही ऑफलाईन अ‍ॅप्सच्या माध्यमातून खूप काही करता येणार आहे.

या क्रोमबुकचा खूप मोठा फायदा म्हणजे याला बूट व्हायला केवळ ८ सेकंद लागतात. तसेच तुम्ही सातत्याने वापरात असलेले वेबपेजेस तुम्ही वेब अ‍ॅड्रेस टाईप करायला सुरुवात केल्यानंतर लगेच लोड होऊ लागतात. याचा दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे यामध्ये कोणत्याही प्रकारच्या अँटी व्हायरसची गरज

नाही. याच्या ऑपरेटिंग सिस्टीममध्येच मालवेअर आणि व्हायरसपासून सुरक्षेची खबरदारी घेण्यात आली आहे. त्यासाठी यामध्ये सँडबॉक्सिंग, डाटा इन्क्रिप्शन आणि व्हेरीफाईट बूट यासारखी बहुस्तरीय सुरक्षा प्रणाली देण्यात आली आहे. यामध्ये स्टोअर होणारी सर्व माहिती वेब स्टोरेजच्या माध्यमातून क्लाऊडमध्ये असणार आहे, त्यामुळे क्रोमबुक चोरीला गेल्यानंतरही तुमचे इमेल, फोटो, डॉक्युमेंट आणि इतर मोड सारख्या फिक्चरमुळे तुमची खासगी माहिती इतरांपासून सुरक्षित ठेवता येणार आहे. वायफाय आणि थ्रीजी अशा दोन्ही प्रकारात क्रोमबुक उपलब्ध असणार आहे.

*** मर्लिन, एल्विस जिवंत होणार!**

आपल्या संगीताने चाहत्यांच्या मनात ठेका धरणारा महान संगीतकार एल्विस प्रिस्ले आणि मदमस्त सौंदर्याने भुरळ घालणारी हॉलिवूडची अभिनेत्री मर्लिन मन्रो पुन्हा जिवंत होणार आहेत. पाश्चिमात्य जगातील हे दोन अवलिया कलाकार लवकरच एका व्हिडिओ गेमच्या माध्यमातून अवतरणार आहेत. विशेष म्हणजे हा गेम सर्वप्रथम 'फेसबुक'च्या माध्यमातून चाहत्यांच्या भेटीला येणार आहे. त्यानंतर गुगल प्लस, कम्प्युटर आणि टॅब्लेट पीसीमध्ये खेळता येणार आहे. हॉलिवूडच्या चित्रपटाप्रमाणे या गेमची रचना करण्यात आली असून हे गेम साहसी अर्थात ॲडव्हेंचर्सयुक्त असणार आहेत. अमेरिकास्थित एन्टरटेन्मेंट गेम्स कंपनीतर्फे या गेम्सची निर्मिती करण्यात येत आहे.

या गेम्सची निर्मिती तरुणांना समोर ठेवून करण्यात आली असली, तरी वय वर्षे चाळीस किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या व्यक्तींना हे गेम्स जुन्या आठवणींत घेऊन जातील,' अशी प्रतिक्रिया व्हिडिओ गेम ॲनालिस्ट मायकल पॅटर यांनी व्यक्त केली. सध्या 'फेसबुक'च्या जगभरातील युजर्सची संख्या १५० कोटींहून अधिक आहे. त्यामुळे या गेमचा प्रसार करण्याकरता 'प्लॅटफार्म' म्हणून फेसबुकची मदत घेण्यात आली आहे. जुन्या व्यक्तिरेखांना गेम्सच्या माध्यमातून जिवंत करणे, हा सध्या गेमिंग उद्योगातील नवा फंडा असल्याचेही पॅटर यांनी स्पष्ट केले. हा गेम 'फेसबुक' वरील फार्मव्हिले, 'झिंग'च्या 'सिटीव्हिले' आदी गेम्स इतकाच लोकप्रिय होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

सध्या अमेरिकेत व्हिडिओ गेम खेळणाऱ्यांची नवी जमात उदयाला येत असून हीच बाजारपेठ मिळविण्याच्या दृष्टीने एन्टरटेन्मेंट गेम्सची योजनात आहे. ॲडव्हेंचर्स गेम्सच्या व्यतिरिक्त प्रिस्ले आणि मर्लिन कार रेस, बॉक्सिंग आदी गेम्समध्येही दिसणार आहेत. या गेम्सच्या निर्मितीसाठी एन्टरटेन्मेंट गेम्सने डिक क्लार्क यांच्याशी भागीदारी केली आहे. सध्या अमेरिकेतील व्हिडिओ गेम्सची बाजारपेठ दोन अब्ज डॉलरची असून येत्या दोन वर्षांत ती दुपटीने वाढून चार

अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता असल्यानेच अनेक कंपन्या गेमिंगमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करीत आहेत.

*** सोशल मीडियाचा भारतावर डोळा**

तरुणांमध्ये लोकप्रिय असलेल्या फेसबुक या सोशल नेटवर्किंग साइटने यूजर्स वाढवण्यासाठी भारताकडे लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे.

यूजर्स संख्येच्या क्रमवारीत सध्या भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यांच्यापुढे केवळ इंडोनेशिया आणि अमेरिका हे दोन देश आहेत. भारत सर्वप्रथम इंडोनेशियाला मागे टाकेल आणि नंतर लवकरच अमेरिकेलाही मागे टाकत भारत आघाडीवर येईल अशी माहिती फेसबुकचे मोबाइल पार्टनरशिप आणि कॉर्पोरेट डेव्हलपमेंट विभागाचे उपाध्यक्ष वॅगहान स्मिथ यांनी सांगितले.

फेसबुकवर इंडोनेशियाचे ४५ लाख यूजर्स असून भारतातील ३० लाख यूजर्स फेसबुकवर आहेत. फेसबुकवरील यूजर्सपैकी तीन चतुर्थांश यूजर्स हे अमेरिका व्यतिरिक्तच्या देशांमधील आहेत. भारतातील प्रत्येक तीन इंटरनेट यूजर्सपैकी एकाचे फेसबुकवर अकाऊंट आहे, ही बाब नुकतीच कॉमस्कोर या कंपनीने प्रसिद्ध केलेल्या अहवालात उघड झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत देशातील फेसबुक यूजर्सच्या संख्येत ८५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ही वाढ इतर देशांच्या तुलनेत खूप जास्त आहे. भारतात दर महिन्याला इंटरनेट यूजर्सच्या संख्येत ५० ते ७० हजारांनी वाढ होत असते. इंटरनेट आणि मोबाइल असोसिएशन ऑफ इंडियाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार डिसेंबरपर्यंत भारतातील इंटरनेट यूजर्सची संख्या एक कोटी १२ लाख इतकी होणार आहे. यामुळे साहजिकच फेसबुक यूजर्सही वाढतील असा अंदाज कंपनीने बांधला आहे.

मोबाइलवरून इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या भारतात वाढत असल्यामुळे लवकरच फेसबुक मोबाइल ॲप्सचाही वापर भारतात मोठ्या प्रमाणावर होऊ लागेल, अशी आशा स्मिथ यांनी व्यक्त केली आहे. सध्या जगभरात फेसबुकच्या मोबाइल यूजर्सची संख्या साडेतीन कोटी इतकी आहे. भविष्यात भारतातील यूजर्स वाढवण्याच्या दृष्टीने फेसबुक प्रयत्नशील राहणार असल्याचे स्मिथ यांनी स्पष्ट केले.

*** टेलिव्हिजन क्षेत्रातही आता गुगल**

सर्च इंजिन, मोबाइल ऑपरेटिंग सिस्टीम या क्षेत्रात खळबळ माजवल्यानंतर गुगलने आता टेलिव्हिजन क्षेत्रात वर्चस्व गाजविण्याची तयारी सुरू केली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून या टीव्हीवर चॅनलचे 'थेट' प्रक्षेपण दिसणार आहेत. यूट्यूबच्या माध्यमातून शंभराहून अधिक चॅनेलचे थेट प्रक्षेपण करण्याची तयारी कंपनीने केली आहे. विविध दूरचित्रवाणी चॅनेल आणि मॅडोना, जेझी यासारख्या

सेलिब्रिटींबरोबर केलेल्या टाय-अपमधून हे यूट्यूब व्हिडीओ तयार केले जाणार आहेत. स्पोर्ट्स, कॉमेडी, न्यूज यासारख्या २० वेगवेगळ्या श्रेणींमध्ये हे चॅनेल असणार आहेत. त्यातील पहिले चॅनेल पुढील महिन्यात लाँच होणार असून वर्षभरात उर्वरित सर्व चॅनेल सुरू होतील असे गुगलने जाहीर केले आहे. त्यासाठी कंपनीने आतापर्यंत १० कोटी डॉलर मोजल्याची चर्चा आहे.

सध्या सोनीचे काही टीव्ही आणि लॉजीटेकच्या सेट टॉप बॉक्सवर गुगल टीव्हीच्या माध्यमातून ग्राहक त्यांच्या टेलिव्हिजन सेटवर ऑनलाईन व्हिडीओ, वेबसाइट ॲक्सेस करू शकतात. त्याचबरोबर व्हिडीओ गेमसारख्या स्पेशल ॲप्सचाही फायदा उठवू शकतात. गुगल टीव्हीच्या नव्या २.० व्हर्जनमध्ये प्रेक्षकांना टीव्ही प्रोग्रॅम, चित्रपट आणि ऑनलाईन व्हिडीओ सुचविण्याचा ऑप्शन आहे. तसेच टीव्हीसाठी नवनवीन ॲप्स डेव्हलप करणे सोपे होणार आहे.

गुगल टीव्ही ही सुविधा गेल्यावर्षी मोठा गाजावाजा करून सुरू करण्यात आली असली तरीही या सेवेचा लाभ किती ग्राहक घेत आहेत, याची माहिती जाहीर करण्याची गुगलची तयारी नाही. यासाठी २९९ डॉलर शुल्क भरावे लागते. मात्र त्यामुळेच गुगलला अपेक्षेइतका प्रतिसाद मिळाला नसल्याचा अंदाज तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. त्यातच गुगलच्या भीतीने अनेक टेलिव्हिजन चॅनेलनी त्यांच्या कार्यक्रमांच्या वेब व्हर्जनचा ॲक्सेस गुगल टीव्हीला दिलेला नाही. त्यामुळेही ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यातच ॲपलही सर्वप्रकारच्या सुविधा एकत्र देणारा टीव्ही तयार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे जॉब्ज यांच्या आत्मचरित्रात नमूद केले आहे. मायक्रोसॉफ्टनेही एक्सबॉक्स व्हिडीओ गेम कन्सोल मिडीया प्लेयर म्हणून उपयोगात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे नुकत्याच केलेल्या अधिग्रहणानंतरही मोटोरोलाचे मोबाईल, सेट टॉप बॉक्स यांची मदत गुगलला या क्षेत्रात सर्वोच्च स्थान मिळवण्यासाठी होईल किंवा नाही याबाबत साशंकता कायम आहे.

*** ट्विटर-टीव्हीची अनोखी युती**

सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचण्यासाठी सध्या सर्वस्तरावरून विविध प्रयत्न होत आहेत. हा प्रयत्न आता टीव्ही मालिकांच्या निर्मितीसाठी केला जाणार आहे. येत्या दोन दिवसांत जर तुम्ही ट्विटरवर 'एक्स फॅक्टर' सर्च केले, तर काही क्षणातच तुम्हाला या मालिकेबद्दलचे कौतुक आणि तक्रारी वाचावयास मिळतील. या सर्व ट्विटरचा आढावा घेऊन मालिकेचे निर्माते सिमोन कोवेल दुसऱ्या दिवशी उत्तरे देतील आणि आवश्यकतेनुसार आपल्या शोमध्ये बदल करतील. या माध्यमातून एका मालिकेसाठी हजारो निर्माते शोधण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

'एक्सफॅक्टर' हा गाण्यांचा रिॲलिटी शो असून यामध्ये गायकांना मतं देण्यासाठीही ट्विटरचा वापर होणार आहे. यामध्ये आपण एखाद्या गायकाला का मत देत आहोत या मागचे कारणही आपण थोडक्यात स्पष्ट करु शकतो. या माध्यमातून टीव्ही आणि ट्विटरचे अनोखे सूत जुळणार आहे. वेबसाइट फ्री प्रमोशनसाठी हा मार्ग येत्या काळात उपयुक्त ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. कोवेल यांच्या या प्रस्तावाचे ट्विटरनेही स्वागत केले आहे. यामुळे आपल्याला एक अनोखा अनुभव घेता येणार आहे. या शोचा आम्हालाही खूप चांगला फायदा होईल असे ट्विटरचे सीईओ डिक कोस्टोलो यांनी स्पष्ट केले. या युतीमधून ट्विटरला अर्थांजन होणार की नाही हे मात्र त्यांनी स्पष्ट केलेले नाही. लोकांपर्यंत पोहचणारी ही विविध माध्यमं एकत्रित येऊन काम करतील तेव्हा साहजिकच त्याचा फायदा सर्वांना होईल असेही कोस्टोलो म्हणाले.

या आधी ट्विटरचा अशा प्रकारचा वापर २००८ मधील अमेरिकेतील निवडणुकांच्यावेळी झाला होता. त्यावेळेस टीव्हीवर सतत ट्विट दिसायचे. यापुढे आता एक्स फॅक्टर शोमध्येही त्यांच्या स्पर्धकांवरील ट्विट पाहवयास मिळणार आहे. एक्स फॅक्टरच्या स्पर्धकांसाठीची ट्विटरवरील वोटिंग लाइन्स २ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत.

*** 'गुगल प्लस'वर ब्रँड पेज**

सोशल नेटवर्किंगमध्ये नव्या रूपात दाखल झालेल्या गुगल प्लसकडे बहुतांश तरुण युजर्स आकर्षित होत असले, तरी व्यावसायिकांना आकर्षित करण्यासाठी त्यांनी आता ब्रॅण्ड पेजेस ही नवी संकल्पना सुरू केली आहे. मागील आठवड्यातच गुगलने भारतातील लघु उद्योजकांसाठी फ्री वेबसाइटची सेवा सुरू केली होती. याच सेवेचा हा पुढचा भाग म्हणता येऊ शकेल.

गुगल प्लसच्या या ब्रँड पेजेसच्या माध्यमातून स्थानिक ब्रँड असोत किंवा जागतिक ब्रँड असोत सर्वांना त्याची माहिती उपलब्ध व्हावी आणि ब्रँडसलाही लोकांपर्यंत पोहचता यावेत या उद्देशाने ब्रँड पेजेसची संकल्पना विकसित करण्यात आली आहे, अशी माहिती गुगल प्लसच्या ब्लॉगवर देण्यात आली आहे. हे पेज गुगल प्लसच्या प्रोफाइलसारखेच असणार आहे. यामध्ये ब्रँडसना त्यांचे फोटोज, व्हिडीओज अपलोड करता येणे शक्य होणार आहे. इतर युजर्स एका बॉक्समध्ये आपले ब्रँड सिलेक्ट करून ठेऊ शकतात. आपल्या सर्कलमध्ये युजरने एकदा ते ब्रँड पेज ॲड केले की, सतत अपडेट्स मिळत राहतील. सध्या गुगल प्लसवर ॲंग्री बर्डस, सीएनएन, फॅक्स न्यूज, पेप्सी, टोयोटो, एक्स गेम्स, डब्लूडब्लूई, ट्रेन आदी ब्रँड पेजेस उपलब्ध आहेत.

गुगल प्लसचे ब्रँडपेज फेसबुकच्या ओपिनिओज पेजपेक्षा सरस असल्याची

चार करणे

* बेटर सर्च ऑप्शन : फेसबुकवर ब्रँडसना सर्च केलं की, पैसे लागू होतात, 'गुगल प्लस'मध्ये क्लिकवर पैसे भरावे लागतात. यामुळे पैशांची बचत होऊ शकते.

* युजर फ्रेण्डली : फेसबुक ॲडसमध्ये खूप मर्यादा आहेत. यामध्ये आपण व्हिडीओ शेअर करू शकतो किंवा पोल घेऊ शकतो. गुगल प्लसवर भरपूर स्पेस उपलब्ध असणार आहे. त्याचबरोबर ब्रँड प्रोफाइल किंवा यूट्यूबवरील व्हिडीओ शेअर करू शकतो.

* अनॅलिस्टिक : गुगल अनॅलिस्टिकमुळे युजर्सना एखाद्या पेजची परिपूर्ण माहिती उपलब्ध होऊ शकणार आहे. यामुळे ब्रँडसना त्यांचे फॅन्स कोण आहेत, त्यांची आवड, त्यांचे जीआयएस स्टेट्स आदी माहिती मिळू शकणार आहे.

* फेसबुककडून धडा : फेसबुक नवनव्या सोशल सुविधांचा पायंडा पाडते. यातील त्रुटींचा अभ्यास करून गुगल सुधारित सोशल सुविधा बाजारात आणते.

*** गुगलला 'सिरि'चा फटका?**

ॲपलने आपल्या 'आयफोन ४एस' मध्ये सिरि टेक्नॉलॉजीचा वापर केला. यामुळे आपण मोबाइलशी थेट संवाद साधू शकणार आहोत. या टेक्नॉलॉजीमुळे मोबाइल फोन क्षेत्रात मोठी क्रांती झाल्याचे बोलले जात आहे. यातील गुण-दोषांवरही मोठी चर्चा झाली. यामुळे वेबजगतात मोठी स्पर्धा निर्माण झाली असून याचा सर्वात मोठा फटका गुगलला बसण्याची शक्यता आहे.

ॲपलची 'सिरि' ही नवी टेक्नॉलॉजी गुगलला आव्हान निर्माण करणारी असल्याचे दस्तरखुद्द गुगलचे अध्यक्ष एरिक स्विमिड यांनीच मान्य केले आहे. सिरिच्या माध्यमातून ॲपलने सर्च इंजीन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे गुगलला सिरिची भीती असल्याचे स्विमिड म्हणाले. गुगल आपल्या सहकारी कंपन्यांशी योग्य प्रकारे वागत नाही म्हणून बहुतांश कंपन्यांनी त्यांच्यावर खटला दाखल केला आहे. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान स्विमिड यांनी ही भीती व्यक्त केली. आता काही कंपन्यांनी सिरिसोबत हातमिळवणी केली असून या कंपन्यांच्या संख्येत वाढ झाली तर गुगलला नक्कीच याचा फटका बसेल, असे ते म्हणाले. यापूर्वी स्विमिड यांनी गुगलच्या सर्च इंजीनला ॲपल आणि फेसबुकची स्पर्धा कधीच नसेल असे स्पष्ट केले होते. मात्र आता त्यांनी आपलेच विधान बदलत थेट ॲपल आपली मुख्य स्पर्धक असेल असे स्पष्ट केले. प्रत्येकवेळी स्पर्धेत विरोधकांना थांबवणे शक्य होत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे भविष्यात ॲपल आणि गुगल असे नवे 'सर्च इंजीन वॉर' सुरू होईल यात कोणताही वाद नाही.

*** हॅकर्सचे फेसबुकवर रोज ६ लाख हल्ले**

कोणत्याही क्षणी हॅकर्सकडून तुमचे फेसबुकवरील अकाऊंट हॅक होऊ शकते. कारण दररोज हजारो फेसबुक अकाऊंटपर्यंत पोहोचण्यासाठी हॅकर्स तब्बल ६ लाख वेळा या सोशल नेटवर्किंग संकेतस्थळाला लक्ष्य करीत आहेत.

स्वत: फेसबुकनेच ही धक्कादायक माहिती उघड केली आहे. फेसबुक हे जगातील सर्वात मोठे सोशल नेटवर्किंग संकेतस्थळ असून या संकेतस्थळाचे जगभरातील युजर्स महिन्याकाठी सुमारे ७०० अब्ज मिनिटे या संकेतस्थळाचा वापर करतात. २४ तासांत सुमारे एक अब्ज लोक या संकेतस्थळावर लॉगीन असतात.

फेसबुकने दिलेल्या माहितीनुसार या युजर्सचे संदेश, छायाचित्रे आणि अन्य गोपनीय तथा वैयक्तिक माहितीपर्यंत पोहोचण्यासाठी हॅकर्स दररोज किमान ६ लाख वेळा फेसबुकवर हल्ला करतात.

*** जर्मन नाटके आणि रशियन कादंबरीचा मराठीत अनुवाद**

कॉन्टिनेटल प्रकाशनातर्फे नुकतेच ब्रेस्ट या जर्मन नाटककारांच्या चार नाटकांचा मराठी अनुवाद असलेल्या पुस्तकाचे तसेच मिखाइल ल्येरामन्तव या रशियन लेखकाच्या कादंबरीच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन करण्यात आले. जर्मन नाटकांचा अनुवाद विद्यासागर महाजन यांनी तर रशियन कादंबरीचा अनुवाद अनघा भट यांनी केला आहे.

शारदा साठे, पुष्पा भावे, सतीश काळसेकर, अविनाश सप्रे आदी यावेळी उपस्थित होते. साठे यांनी ‘वैचारिक साहित्याच्या भाषांतरात भाषांतरकाराची भूमिका’ या विषयावर मार्गदर्शन केले. सतीश काळसेकर यांनी भाषांतरामागील हेतू, तसेच त्याची गरज यावर मार्गदर्शन केले. ‘मराठीत वैचारिक साहित्याची परंपरा खंडित झाल्याने ठोस विचार, तत्त्वज्ञान मांडणाऱ्या साहित्याची कमतरता निर्माण झाली आहे. त्यामुळे इतर भाषांमधील महत्त्वाची पुस्तके मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्याची गरज आहे,’ असे साठे यांनी सांगितले.

देवयानी अभ्यंकर यांनी स्वागत केले. सुनंदा महाजन यांनी आभार मानले. उज्ज्वला बर्वे यांनी सूत्रसंचालन केले.

*** ‘रारंगढांग’ आता ऑडिओ स्वरूपात**

मराठी साहित्य क्षेत्रात मैलाचा दगड ठरलेली ‘रारंगढांग’ ही प्रभाकर पेंढारकर लिखित कादंबरी लवकरच ऑडिओ स्वरूपातही रसिकांना उपलब्ध होणार असून दोन तरुण पुणेकर नाट्यकर्मी हे शिवधनुष्य पेलत आहेत. निपुण धर्माधिकारी पटकथा लेखन आणि दिग्दर्शन, तर गंगाधर संर्गोराम ध्वनी आणि पार्श्वसंगीत करत आहेत.

वैभव कुलकर्णी, समीर धामणगावकर आणि आशिष जोशी या तीन तरुणांनी सुमारे दोन वर्षांपूर्वी स्नॉवेल या कला-साहित्य क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीची स्थापना केली. या कंपनीने आतापर्यंत दि. बा. मोकाशी यांची 'कथा मोकाशी', गो. नी. दांडेकर यांची 'शितू', मिलिंद बोकील यांची 'समुद्र' आणि जयवंत दळवी यांची 'सारे प्रवासी घडीचे' या कादंबऱ्या ऑडिओ स्वरूपात प्रसिद्ध केल्या असून अनुक्रमे वृषाली देशपांडे, वीणा देव, अनिरूद्ध जोशी आणि मुकुंद टांकसाळे यांनी त्याचे दिग्दर्शन केले आहे. या ऑडिओ साहित्यात आता 'रारंगढांग'चीही भर पडणार आहे. या ऑडिओसाठी शशांक शेंडे, अमेय वाघ, किरण यज्ञोपवीत, सिद्धार्थ मेनन आणि सायली फाटक या कलाकारांनी आवाज दिला आहे.

ऑडिओ रूपांतरणात कादंबरी आहे तशी मांडली, तर श्रोत्यांना त्यात रस वाटणार नाही. त्यामुळे याचा विचार करूनच त्या कथेतील निवेदन प्रसंगरूपात मांडणे आवश्यक होते. अगदी चित्रपटाच्या पटकथेप्रमाणेच त्याचे लेखन करण्यात आले आहे. थोडक्यात सांगायचे तर ही ऑडिओ स्वरूपातील ही कादंबरी म्हणजे न दिसणारा चित्रपट आहे. कादंबरीची शैली पटकथेच्या रूपात मांडणे हे नक्कीच आव्हानात्मक होते. तसेच त्यातील व्यक्तिरेखा आणि कलाकारांचा वाचिक अभिनय यांचा विचार करून कलाकार निवड केली आहे. श्रोत्यांना जास्तीत जास्त उत्तम अनुभव देण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.' असे निपुणने सांगितले. यापूर्वी ऑडिओ स्वरूपातील कादंबऱ्या 'स्नॉवेल'च्या संकेतस्थळावर आहेत.

*** 'संत तुकाराम' चित्रपटाची 'अमृत महोत्सवी' गाथा!**

'प्रभात फिल्म कंपनीच्या 'संत तुकाराम' चित्रपटाने इतिहास घडविला. चित्रपटात 'संत तुकाराम' यांची भूमिका करणारे विष्णुपंत पागनीस हे अक्षरश: ही भूमिका जगले. आपल्या अभिनयाच्या जोरावर त्यांनी ही भूमिका इतकी जिवंत केली की 'संत तुकाराम' म्हणजेच विष्णुपंत पागनीस असे चित्र प्रेक्षकांच्या मनात उभे राहिले ते आजतागायत कायम आहे,' असे मनोगत हा चित्रपट पहिल्यांदा प्रदर्शित झाला त्या पुण्यातील 'प्रभात' चित्रपटगृहाचे मालक अनिल दामले यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केले.

चित्रपट प्रदर्शित झाल्याला (७ नोव्हेंबर) रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त दामले यांनी चित्रपटाच्या अनेक आठवणी जागविल्या. प्रभात फिल्म कंपनीचे चित्रपट प्रथम मुंबईत आणि नंतर अन्यत्र प्रदर्शित व्हायचे. परंतु, नोव्हेंबरमध्ये मुंबईत जातीय दंगल उसळल्याने, ७ नोव्हेंबर १९३६ रोजी 'संत तुकाराम' हा चित्रपट पहिल्यांदा 'प्रभात' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. प्रभात चित्रपटगृहात तब्बल ४० तर गिरगाव येथील सेंट्रल सिनेमा (आजचे सेंट्रल प्लाझा) येथे

तब्बल ५७ आठवडे हा चित्रपट चालला असल्याचे दामले यांनी सांगितले.

चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इटलीमधील 'व्हेनिस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'मध्ये १९३७ साली हा चित्रपट दाखविण्यात आला आणि त्यावर्षी जगातील तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक म्हणून 'संत तुकाराम' ची निवड झाली. चित्रपटाच्या लोकप्रियतेने कळस तर गाठलाच परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर त्या काळी प्रथमच एका भारतीय चित्रपटाचा गौरव करण्यात आल्याचेही दामले म्हणाले.

शिवराम वाशीकर यांची पटकथा-संवाद, शांताराम आठवले यांची गीते, केशवराव भोळे यांचे संगीत आणि दामले-फत्तेलाल यांचे दिग्दर्शन याचबरोबर विष्णुपंत पागनीस, सालोमालोच्या भूमिकेतील काका भागवत आणि तुकारामांच्या पत्नीच्या भूमिकेतील गौरी या कलावंतांनीही प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळविले. चित्रपट पाहताना प्रेक्षक अक्षरश: भक्तिरसाने न्हाऊन निघत. आपण प्रत्यक्ष तुकाराम महाराजांचेच दर्शन घेत आहोत या भावनेने चित्रपटगृहात पैसे टाकणे, श्रीफळ वाढविणे, आरतीचे तबक घेऊन येणे, पादत्राणे चित्रपटगृहाबाहेर काढून ठेवणे, अभंगाच्यावेळी ताल धरणे अशा गमती जमती घडल्याची आठवणही दामले यांनी सांगितली.

*** स्वरभास्कर महोत्सव**

सूरश्री फाऊंडेशनतर्फे किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. भीमसेन जोशी यांच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी १८ ते २० नोव्हेंबर या कालावधीत कोथरूड भागातील आयडियल कॉलनीच्या मैदानावर तीन दिवसांच्या 'स्वरभास्कर महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले होते.

विश्वविख्यात पंडितजींनी आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या गायकीने आणि निर्मळ व्यक्तिमत्वाने सर्व रसिकांच्या मनात निरंतर आदराचे स्थान मिळवले होते. त्यांचे संगीतातील बहुमोल योगदान, अभिजात शास्त्रीय गायकी, संतवाणी सारेच अविस्मरणीय आहे. म्हणूनच हा संगीत महोत्सव त्यांनाच कृतज्ञपणे समर्पित करीत आहोत, असे फाऊंडेशनचे अध्यक्ष श्याम देशपांडे यांनी सांगितले.

शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. ज्येष्ठ सतारवादक उस्ताद उस्मान खाँ, ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे, ज्येष्ठ ध्रुपदगायक उस्ताद सइदुद्दीन डागर आणि पंडितजींचे ज्येष्ठ सुपुत्र राघवेंद्र जोशी या प्रसंगी उपस्थित होते. महोत्सवात किराणा घराण्याचे युवा गायक जयतीर्थ मेवुंडी यांना 'स्वरभास्कर' पुरस्काराने गौरविण्यात आले. आपल्या टाळवादनाने अभंगाची गोडी वाढविणारे माऊली टाकळकर यांना 'श्रेष्ठ संगतकार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर पतियाळा घराण्याचे गायक रमाकांत गायकवाड

यांना शिष्यवृत्ती प्रदान केली गेली.

उद्घाटन कार्यक्रमानंतर उस्ताद शाहीद परवेझ यांचे पुत्र आणि शिष्य शाकिर खान यांच्या सतारवादनाने या महोत्सवाची सुरुवात झाली.

*** लघुग्रहाचे जवळून दर्शन**

एक मोठा लघुग्रह पृथ्वीजवळून गेला. हा लघुग्रह पृथ्वीवर आढळण्याची कोणतीही शक्यता नव्हती, असे अमेरिकेच्या 'नासा' या संशोधन संस्थेने स्पष्ट केले आहे.

'२००५ वाययू ५५' या लघुग्रहाला पाहता यावे म्हणून जगभरातील अनेक खगोलशास्त्रज्ञ दुर्बिणीला डोळे लावून बसले होते. एखाद्या विमानाइतका मोठा असलेला हा लघुग्रह पृथ्वीच्या अगदी जवळून गेला तेव्हा तो साध्या डोळ्यांनी पाहता आला नाही. 'हा लघुग्रह साध्या डोळ्यांनी पाहता येण्यासारखा नव्हताच. त्यासाठी दुर्बिणीचीच गरज होती,' असे 'नासा'ची प्रवक्त्या व्हरोनिका मॅकग्रेगर यांनी सांगितले.

या गोलाकार लघुग्रहाचा व्यास १३०० फूट असून तो पृथ्वी, मंगळ आणि शुक्र यांच्या टापूतून भ्रमण करीत असतो. मात्र, गेल्या दोनशे वर्षांत तो प्रथमच पृथ्वीच्या अगदी जवळ आला होता, असे 'नासा'ने म्हटले आहे. पृथ्वीच्या मध्यापासून ३.२४ लाख किलोमीटर अंतरावर तो होता. अशाच आकाराचे लघुग्रह पृथ्वीच्या जवळून गेले आहेत. यापूर्वी १९७६ मध्ये असा प्रकार घडला होता. २०२८ मध्ये २००१ डब्ल्यूएन ५ हा लघुग्रह पृथ्वीच्या जवळून जाईल.

*** आनंदयात्रा कवितेची**

वार्धक्याने थकलेल्या शरीराला न जुमानता 'ते' एकदम व्यासपीठावर चढले... युवकालाही लाजवेल अशा उत्साहात... प्रेक्षकांमधील पहिल्या रांगेत बसलेले असताना, कुसुमाग्रजांबद्दल बोलण्याची विनंती त्यांना केली... ते उठले आणि प्रेक्षकांकडे तोंड करत, पाय उचलून व्यासपीठावर पोचले. कारण त्यांच्यात तेजाळल्या होत्या कुसुमाग्रजांच्या प्रेमाच्या, स्नेहाच्या आठवणी आणि त्या शब्दांत मांडण्यासाठी ही सारी धडपडही अगदी सहज झालेली... ते होते डॉ. श्रीराम लागू...!

डॉ. लागू आणि कुसुमाग्रज यांच्यातील ऋणानुबंध डॉ. लागूंच्या शब्दांबरोबरच देहबोलीतून अधिक प्रकर्षाने व्यक्त झाला. निमित्त होते, कुसुमाग्रज जन्मशताब्दीनिमित्त आयोजिलेल्या 'आनंदयात्रा कवितेची' या कार्यक्रमाचे. कुसुमाग्रज प्रतिष्ठान आणि नासिककर यांनी आयोजिलेल्या कार्यक्रमात अशोक नायगावकर, अरूण म्हात्रे, प्रकाश होळकर, हेमंत जोगळेकर, संतोष शेणई, नीता भिसे, गोविंद पाटील यांनी कविता सादर केल्या.

डॉ. लागू म्हणाले, ''माझ्या आयुष्याला आकार देण्यात त्यांनी खूप महत्त्वाचा वाटा अगदी नकळतपणे उचलला. माणसाचे आयुष्य माणसासारखे जगले पाहिजे. तरच त्याच्या जीवनाचे सार्थक आहे. माणुसकी सोडून वागणे हा ते गुन्हा मानीत. 'विशाखा' वाचून आमची पिढी मोठी झाली. पण महाराष्ट्राने त्यांच्याकडे जेवढे लक्ष द्यायला पाहिजे होते तेवढे दिले की नाही हे माहीत नाही. ते माझ्या आयुष्यात आल्यामुळे मी स्वत:ला भाग्यवान समजतो.''

नायगावकर यांनी खुमासदार शैलीने कविता सादर केली. 'सध्याच्या गद्यप्राय परिस्थितीत...' येणारे अनुभव कवितेतून मांडताना त्यांनी राजकारण, पोलिस आदी समाजातील सर्व व्यवस्थांवर भाष्य केले. म्हात्रे यांच्या 'पाऊस कधीचा पडतो...' या कवितेबरोबर वडिलांवरील कवितेतील वृद्धापकाळाच्या वर्णनामुळे मन कातर झाले. 'बाईपणाचे जगणे' भिसे यांनी आपल्या 'ओळखी', 'कुंचला', 'बऱ्यापैकी' या गझलांमधून मांडले. पाटील व जोगळेकर यांच्या कवितांतून शेतकऱ्यांच्या जगण्यातील वास्तव समोर आले. पाटील यांची कर्जावरची तर होळकर यांची 'जोतिबा फुले यांना पाठवलेले पत्र' या कविता रसिकांच्या मनात खोलवर रुजल्या. होळकर यांच्या 'होड्या'तून युवकांच्या मनाची स्थिती व्यक्त झाली. शेणई यांनी 'मोबाईलवर बोलणारी मुलगी' या कवितेतून सध्याच्या तंत्रज्ञानात्मक जगण्याची 'कॉड' कवितेशी जोडली. त्यांच्या 'पेन्सिल', 'संपादकांची जीभ' या कविता दाद घेऊन गेल्या. कुसुमाग्रजांचे 'गाभारा' व 'काही बोलायचे आहे....' ही काव्ये रसिकांसमोर आली.

*** साहित्य मनात घोळणे आवश्यक : डॉ. कुलकर्णी**

'समाजातील वाचनसंस्कृती हरवतेय अशी तक्रार होते. मात्र, नुसते पाने चाळणे म्हणजे वाचन नव्हे. त्याचा आस्वाद घेतला जावा, सतत त्याचे चर्वण व्हावे, दीर्घकाळ मनात घोळत राहणे आवश्यक असते. तरच साहित्य खऱ्या अर्थाने जपले जाईल,' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

'हॅपी थॉट्स विश्व शांती महोत्सवा'अंतर्गत तेजज्ञान फाउंडेशनच्या वतीने गणेश कला क्रीडा मंच येथे दि. ११ ते १५ नोव्हेंबर दरम्यान पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन केले होते. त्याचे उद्घाटन डॉ. कुलकर्णी, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा, फाउंडेशनच्या प्रेमा भटेवरा उपस्थित होते. 'विचार नियम-द पॉवर ऑफ हॅपी थॉट्स' या पुस्तकाच्या मराठी, हिंदी आवृत्तीचे प्रकाशन झाले. हे प्रकाशन प्रसिद्ध अभिनेता शाहरूख खान यांच्या हस्ते झाले. सकाळी साडेनऊ वाजता अभिनव

कला महाविद्यालयापासून शोभायात्रा काढण्यात आली होती. त्याचे उद्घाटन संत साहित्याचे अभ्यासक रामचंद्र देखणे यांच्या हस्ते झाले.

वैद्य म्हणाल्या, ''अनेक संत, कवी यांनी विश्वशांतीची मागणी केली आहे. मूल जन्माला येते तेव्हा निरागस असते. मात्र, जसजशी जगाशी ओळख होत जाते तशी त्याची निरागसता संपते. त्यावेळी अशा संस्थाच प्रकाशाचा मार्ग दाखवतात.'' डॉ. मकरंद परांजपे यांनी सूत्रसंचालन केले.

*** छपाईचे काम आता 'ऑनलाइन'**

प्रिटिंग क्षेत्रातील अजिबात ज्ञान नसलेल्या सामान्य माणसाला अगदी सोप्या पद्धतीने त्याचे छपाईचे काम 'ऑनलाइन' पूर्ण करून देण्याची सोय आता प्रथमच सॉफ्टवेअरच्या आधारे उपलब्ध झाली आहे. मुद्रकाला प्रत्यक्षात न भेटता आपल्या कामाची प्राथमिक माहिती संकेतस्थळावर दिल्यावर काही सेकंदांतच तयार झालेले 'कोटेशन' आपल्याला पाहायला मिळेल व त्यानंतर 'ऑनलाइन ऑर्डर'ही देता येईल.

कुठल्याही व्यावसायिक किंवा लघुउद्योजकाला माहितीपत्रक किंवा एखाद्या व्यक्तीला पुस्तके छापायची असल्यास, ते काम क्लिष्ट असते. कोणता व किती जाड कागद वापरायचा व त्यावरील रंग कसे दिसतील याचा अंदाज घेण्यात अनेकदा वेळ निघून जातो. व्यावसायिकांची आणि सामान्य नागरिकांची नेमकी अडचण ओळखून त्या कामातील 'कसरत' टाळण्यासाठी तंत्रज्ञानाच्या आधारे 'प्रतिरूप मुद्रण' या कंपनीने www.pratiroopmudran.com हे संकेतस्थळ तयार केले आहे. ऑर्डर देण्यापूर्वी कागदाची जाडी, रंगाच्या छटा बघण्यासाठी ग्राहकांनी २४२२३२६७ या क्रमांकावर संपर्क केल्यास त्यांना मोफत 'किट' पाठविण्याची व्यवस्था कंपनीने केली आहे.

सामान्यांबरोबरच बांधकाम व्यवसाय, अभियांत्रिकी, माहिती पत्रके, पोस्टर्स, कॅटलॉग, विपणन क्षेत्रासाठी या संकेतस्थळाचा फायदा होईल, अशी माहिती कंपनीने दिली.

प्रतिरूप मुद्रणचे शैलेंद्र भागवत म्हणाले, ''प्रिटिंग क्षेत्रात सामान्यांना अशी सुविधा देणारी आमची भारतातील पहिलीच कंपनी आहे. प्रतिरूपच्या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य असे की, ग्राहकाला त्याचे घर, कार्यालय सोडण्याची गरजच पडत नाही. छापून तयार झालेल्या उत्पादनाचे वितरण देशभरात मर्यादित कालावधीत जलद गतीने करण्याची शाश्वती कंपनीतर्फे देण्यात आली आहे.''

'यूव्ही स्कॅन' या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्राहकाने पाठवलेल्या 'फाइल' ची तपासणी ऑनलाइन केली जाते. एखादे चित्र किंवा अन्य गोष्टीचा दर्जा कमी असेल आणि त्याचा विपरीत परिणाम छपाईच्या कामावर होणार असेल, तर

त्याची पूर्वकल्पना या तंत्रज्ञानामुळे ग्राहकाला दिली जाते.

अंतिम ऑर्डर देण्यापूर्वी ग्राहकाला प्रिंटिग विषयातील मूलभूत विषयांची माहिती बघायची असल्यास त्याची सुविधाही करण्यात आली आहे. प्रिंटिंग प्रक्रियेतील एखादी माहिती किंवा गोष्ट ग्राहकाला समजली नाही तर दूरध्वनीद्वारे 'ऑनकॉल सपोर्ट' ची सोय संकेतस्थळावर आहे.

*** पहिल्या उर्दू-मराठी महिला साहित्य संमेलनात विविध कार्यक्रम**

पहिल्या उर्दू-मराठी महिला साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन प्रसिद्ध हिंदी साहित्यिक दीप्ती गुप्ता यांच्या हस्ते झाले. मुमताज पीरभॉय या संमेलनाच्या अध्यक्ष होत्या तर आबेदा इनामदार या स्वागताध्यक्ष होत्या. संमेलनाचे आयोजन उर्दू साहित्य परिषद व महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वतीने करण्यात आले होते. 'जागतिकीकरणाच्या रेट्यात प्रादेशिक भाषांचे भवितव्य संकटात आले आहे, यासाठी भाषाप्रेमींनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत' असे मत संमेलन अध्यक्षांनी व्यक्त केले. उद्‌घाटन प्रसंगी अन्य मान्यवरांनीही आपले विचार व्यक्त केले. या एकदिवसीय संमेलनात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यातील परिसंवादात 'भारतीय भाषांचे भवितव्य' या विषयावर प्रसिद्ध लेखिका माधवी वैद्य, उर्दू लेखिका रफिया शबनम आबदी व प्रा. नीलिमा गुंडी यांनी विचार व्यक्त केले. संमेलनाचे आयोजन आझम कॅम्पस येथे करण्यात आले होते.

*** करंजीची नाव, शेवेचा समुद्र आणि लाडवाचे डोंगर**

गोड गोड करंजीची नाव, शेवेचा समुद्र, लाडवाचे डोंगर अशी डुग्गूच्या मनातील कल्पना, चित्र आणि शब्दांच्या रूपातून पाहताना लहानगे हरखून गेले. उंदराच्या मजेशीर आणि शूर गोष्टींतून इतर भाषांचे ज्ञान असल्याचा फायदाही त्यांच्या लक्षात आला आणि बालदिनाचा आगळा आनंद त्यांना मिळाला. निमित्त होते 'सकाळ प्रकाशन'च्या चार पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाचे. लहान मुलांसाठी असलेल्या या पुस्तकांचे प्रकाशन झाले ते बाळगोपाळांच्याच हस्ते.

नीला शर्मा यांनी लिहिलेल्या 'भाषेचे फायदे' व रेश्मा बर्वे यांनी लिहिलेल्या 'डुग्गूचा फराळ', 'डुग्गू आणि कपाटातला हत्ती', 'काटेरी घरात डुग्गू' या पुस्तकांचे प्रकाशन समृद्धी जोगळेकर, सम्राज्ञी जोगळेकर, तन्मय पुराणिक, कृष्णा चौधरी या बच्चे कंपनीच्या हस्ते अक्षरधारा बुक गॅलरी येथे झाले. यावेळी शर्मा, बर्वे, सकाळ प्रकाशन विभागाचे आशुतोष रामगीर उपस्थित होते.

*** विश्वकोश अभ्यासा आता ऑनलाइन**

मराठी भाषेतील ऐतिहासिक वैभव जपलेले विश्वकोश आता नागरिकांना, विद्यार्थ्यांना संकेतस्थळावरही अभ्यासण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. पहिला खंड नुकताच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. यापुढे दर महिन्याला

एक खंड संकेतस्थळावर समाविष्ट होणार आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संपादित केलेल्या विश्वकोशाचे जतन करून सर्वसामान्यांपर्यंत ते पोचविण्यासाठी विश्वकोश निर्मिती मंडळाने 'सी-डॅक'च्या सहकार्याने हा प्रकल्प हाती घेतला आहे. http:// www.marathivishwakosh.inया संकेतस्थळावर ते अभ्यासण्यासाठी मिळणार आहेत. त्यासाठी कोणताही फॉन्ट डाऊनलोड करण्याची गरज नसून, युनिकोडमध्ये ते उपलब्ध आहे. १९९७ पर्यंतच्या नोंदीचा समावेश आहे. विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजया वाड यांनी विश्वकोशाचे कामकाज सातत्याने सुरू राहणार असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार संकेतस्थळावर सुधारणा होतील, असे कुलकर्णी यांनी नमूद केले. यापूर्वीच्या संकेतस्थळावर खंडांतील माहितीची स्कॅन पाने होती. आता माहितीत सुधारणा करून तिचा समावेश संकेतस्थळावर करण्यात आला आहे. त्यामुळे विशिष्ट माहितीचा शोध घेणे, हव्या असलेल्या व्यक्तींना पाठविणे, जतन करून ठेवणे शक्य होणार आहे. राज्य सरकारच्या संकेतस्थळावरही जे संकेतस्थळ 'लिंक' करण्यात येणार आहे. समानार्थी शब्द ऑनलाइन मिळणे, अर्थाचे स्पष्टीकरण आदी सुविधा त्यात उपलब्ध आहेत.

*** निसर्गरम्य स्थळांच्या चित्रांचे प्रदर्शन**

'चित्रकार सुभाष कुलकर्णी व श्रीनिवास पळशीकर यांनी काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन दर्पण आर्ट गॅलरी येथे भरविण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन इतिहासकार निनाद बेडेकर यांच्या हस्ते झाले.

प्रदर्शनात वॉटर पेटिंग व ॲक्रेलिक पेटिंगमधील निसर्गचित्र, व्यक्तिचित्र, प्राणी व पक्षांची चित्रे मांडण्यात आली होती.

*** ''मैत्री बँकिंगशी'**

बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकिंग क्षेत्रात वेगवेगळी स्थित्यंतरे पाहिलेल्या देशाची आर्थिक वाटचाल कशी सुरू आहे, हे समजण्यासाठी 'मैत्री बँकिंगशी' या पुस्तकाचा फायदा होईल, असे मत बँक ऑफ इंडियाचे उपमहाव्यवस्थापक नितीन गंध्रे यांनी मांडले. सकाळ प्रकाशनच्या 'मैत्री बँकिंगशी' या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र बँकेचे उप महाव्यवस्थापक मुकुंद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. लेखिका वंदना धर्माधिकारी आणि सकाळ प्रकाशनचे आशुतोष रामगीर यावेळी उपस्थित होते.

गंध्रे म्हणाले, ''बँकिंग हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय आहे. तरीही देशातील निम्म्यापेक्षाही अधिक लोक अद्यापही या क्षेत्रापासून लांब आहेत. त्यांना बँकिंग व्यवहार समजेल अशा सोप्या आणि सरळ भाषेत लिहिलेले हे पुस्तक आहे.''

मुकुंद कुलकर्णी म्हणाले, ''सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक असणारी माहिती या पुस्तकात आहे. याचा फायदा खेड्यातील नागरिकांसोबतच शहरी भागातील नागरिकांनाही होणार आहे. निवृत्तीच्या काळातही धर्माधिकारी यांनी लिहिलेले हे पुस्तक समाजाच्या उपयोगी पडणारे आहे.''

नागरिकांना आर्थिक साक्षर करण्याचे काम केल्याबद्दल त्यांनी 'सकाळ'चे कौतुक केले.

आर्थिक प्रगतीच्या मार्गावर काठीसारखा आधार या पुस्तकामुळे मिळू शकेल, अशी भावना वंदना कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

शुभदा बर्वे यांनी सूत्रसंचालन केले, तर आशुतोष रामगीर यांनी प्रास्ताविक केले.

*** 'एमईएस'चे स्मरणरंजन एका 'क्लिक'वर!**

संस्थेच्या दीड शतकाच्या वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे, राष्ट्रपतींपासून केंद्र आणि राज्यातील प्रतिष्ठितांनी दिलेल्या भेटी, माजी विद्यार्थ्यांचे दुर्मिळ क्षण... अशा 'नॉस्टॅल्जिक' अनुभवांच्या 'चित्र-स्मृती'चा ठेवा, 'फोटोबायोग्राफी' स्वरूपात 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तर्फे (मएसो) प्रकाशित केला गेला.

संबंधित संस्थांमध्ये छायाचित्रांच्या स्वरूपात बऱ्याच स्मृती जतन केल्या असल्याचे लक्षात आल्याने त्यांच्या एकत्रित 'फोटोबायोग्राफी'तून संस्थेचा क्रियाशील इतिहास मांडण्याचा हा प्रयत्न असल्याची माहिती संस्थेचे सचिव वि. ना. शुक्ल यांनी दिली.

या 'फोटोबायोग्राफी' मध्ये संस्थेच्या विविध शाखांमधील सुमारे दोनशे दुर्मिळ छायाचित्रांचा समावेश करण्यात आला आहे. २९ नोव्हेंबर रोजी गणेश कला क्रीडा मंच येथे याचे प्रकाशन करण्यात आले.

*** प्राचीन भारताचा ठेवा आता डिजिटल रूपात**

भारतामधील १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामानंतर ब्रिटिशांनी जाहीर केलेल्या विशेष 'इंडिया मिलिटरी बजेट्स'पासून ते मराठी साम्राजाच्या अस्ताच्या काळात १८०४ मध्ये आर्थर वेलस्ली या ब्रिटिश लेखकाने लिहिलेल्या पुस्तकापर्यंत... प्राचीन भारतीय समाज-अर्थकारणावर प्रकाश टाकणारे आठ हजार महत्त्वाचे ग्रंथ, अहवाल लवकरच डिजिटल रूपात जगभरातील वाचकांना खुले होणार आहेत.

गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स संस्थेच्या प्रख्यात 'धनंजयराव गाडगीळ ग्रंथालया'ने दुर्मिळ पुस्तकांना डिजिटल स्वरूपात जतन करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. 'जगभरात अन्यत्र कुठेही उपलब्ध नसलेली सतराव्या-अठराव्या शतकातील दोन हजारांपेक्षा अधिक दुर्मिळ पुस्तके ग्रंथालयात आहेत. या महत्त्वाच्या साठ्याचे कायमस्वरूपी जतन करण्याच्या उद्देशाने 'पीडीएफ'

स्वरूपात पुस्तकांचे जतन करण्यात येत आहे.

संस्थेच्या एकूण दोन लाख ७० हजार ग्रंथसाठ्यातील ५० हजार पुस्तक-अहवालांना डिजिटल स्वरूपात इंटरनेटच्या माध्यमातून खुले करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प संस्थेने हाती घेतला आहे. जुलै २०११ पासून या प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली असून, मार्च २०१२ अखेर आठ हजार ग्रंथ ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) या प्रकल्पासाठी २० लाख रुपयांचे विशेष अनुदान संस्थेला देण्यात आले आहे.

*** बीएसएनएलची आता 'भारत बेरी'**

भारत संचार निगम लिमिटेडने (बीएसएनएल) पुश ई-मेलची सर्व्हिस 'भारत बेरी' नावाने सुरू केली असून देशभरात उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सर्व्हिससाठी 'बीएसएनएल'ने 'भारत बेरी टेक्नॉलॉजीज' या कंपनीशी करार केला आहे. पुश-ई-मेलमध्ये ब्लॅकबेरी ब्रॅंडची मालकी असणारी रिचर्स इज मोशन (रिम) ही कंपनी आघाडीवर आहे.

काही महिन्यांपूर्वी एमटीएनएल या कंपनीच्या माध्यमातून 'भारत बेरी' ही सर्व्हिस दिल्ली आणि मुंबई येथे लॉंच करण्यात आली होती. ही सर्व्हिस उत्तम सुरू असल्याने आता 'बीएसएनएल'ने लॉंच केली आहे. ब्लॅकबेरी, सिम्बियान, अँड्रॉइड, विंडोज मोबाइल, जी२एमई आदी मोबाइल ऑपरेटिंग सिस्टिम असणाऱ्या हॅंडसेटवर ही सेवा उपलब्ध होऊ शकणार आहे.

'खेड्यामधून राहणाऱ्या लोकांचे प्रमाण अजूनही मोठे आहे; तसेच अनेक जणांकडे कम्प्युटर नाहीत, मात्र, या सर्व्हिसमुळे मोबाइलच्या माध्यमातून त्यांचे अनेक प्रश्न सुटणार आहेत,' असे भारत बेरी सर्व्हिसेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय दाता यांनी सांगितले.

*** अण्णा भाऊ साठे महोत्सव**

पुणे महानगरपालिका आणि जनसेवा फाऊंडेशनच्या वतीने १९ ते २२ नोव्हेंबरला साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गणेश कला क्रीडा मंच येथे होणाऱ्या या महोत्सवाचे उद्‌घाटन भाजपाचे नेते गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते झाले.

अण्णा भाऊ साठे यांच्या ग्रंथाची दिंडी काढून महोत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर 'अण्णा भाऊंचा जीवन प्रकाश' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या मानसकन्या शांताबाई दोडके, शकुंतला संकपाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

चार दिवस चालणाऱ्या या महोत्सवामध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. तुकाराम मोरे, पोलिस अधिक्षक शिवाजीराव शिंदे यांची मुलाखतीचा कार्यक्रम, 'असा हा रंग माझा वेगळा' हा नंदेश उमप, सतीश तारे यांचा कार्यक्रम

तसेच ‘मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण काळाजी गरज’ यावर परिसंवाद, लावणी महोत्सव अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

*** स्पर्धक विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांचे प्रदर्शन**

स्पर्धा परीक्षांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती आणि आवड निर्माण व्हावी आणि त्यांना योग्य पुस्तके उपलब्ध व्हावी, यासाठी ‘शिवतेज बुक डेपो’ तर्फे स्पर्धा-परिक्षांसंबंधित पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुषमा चव्हाण यांच्या हस्ते झाले. स्पर्धा परीक्षा विषयक पुस्तके प्रकाशित करणाऱ्या राज्यातील विविध प्रकाशकांच्या सहकार्याने या प्रदर्शनात ५० हजारांपेक्षा अधिक पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती.

*** शंकर महादेवन प्रथमच ‘सवाई’त**

एका थोर शिष्याने गुरूला दिलेल्या मानवंदनेच्या व्रताची परंपरा कायम राखत ‘आर्य संगीत प्रसारक मंडळा’ने ‘भीमसेनी’ स्वर चिरकाल राहावा, यासाठी सवाई गंधर्व संगीत महोत्सवाच्या शीर्षकात भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या नावाचा अंतर्भाव केला आहे. त्यामुळे ‘सवाई गंधर्व संगीत महोत्सव’ ‘सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव’ म्हणून ओळखला जाणार आहे.

गेल्या जानेवारीत पंडितजींचे निधन झाल्यानंतर होणारा हा पहिला सवाई गंधर्व महोत्सव होता. गुरुसेवेसाठी ५० वर्षांहून अधिक काळ महोत्सवासाठी सर्वस्व देणाऱ्या पंडितजींच्या स्मृती चिरंतन राहाव्या, यासाठीच त्यांचे नाव महोत्सवाशी जोडण्याचा हा प्रयत्न असल्याचे ‘आर्य संगीत प्रसारक मंडळा’चे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी सांगितले. यंदाच्या ५९ व्या वर्षी हा महोत्सव प्रथमच पाच दिवसांचा झाला.

पं. जसराज, डॉ. प्रभा अत्रे, डॉ. बालमुरलीकृष्ण, उस्ताद अमजद अली खाँ यांच्यासारखे संगीत क्षेत्रातील दिग्गज अन् संजय गरूड, महेश काळे आणि शंकर महादेवन यांची ‘सवाई’च्या व्यासपीठावरील पहिलीच उपस्थिती अशा जुन्या-नव्याच्या समन्वयातून ५९ व्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवातील सांगीतिक मैफली रंगली.

*** ई-मेलचा ‘पासवर्ड’ कायम बदलता ठेवा**

हॅकिंग टाळण्यासाठी ‘जी-मेल’ च्या यूजर्सना सुरक्षेसंदर्भात मार्गदर्शक सूचना

नेहमीच्या सवयीने ‘जी-मेल’ उघडता आणि तुमच्या लक्षात येते की, मेलच्या माध्यमातून कोणी तरी तुमचे बँक खाते रिकामे केले आहे किंवा तुमच्या क्रेडिट-डेबिट कार्डवर ऑनलाइन शॉपिंग केले आहे किंवा तुमच्या मित्र-मैत्रिणींशी अश्लील चॅटिंग केले आहे... असे झाले तर? तुमच्या नकळत तुमचा ‘ई-मेल

आयडी’ वापरणाऱ्या हॅकर जमातीपासून सावधान राहण्यासाठी कोणालाही ‘पासवर्ड’ देऊ नका, दोन-तीन महिन्यांनंतर हा परवलीचा शब्द बदला अशा सूचना ‘जी-मेल’ ने दिल्या आहेत.

लाखो ‘यूजर्स’ असलेल्या ‘जी-मेल’च्या सदस्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र, काही दिवसांपासून ‘जी-मेल’चे अकाउंट ‘हॅक’ होण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. त्यामुळे हॅकर्सना अटकाव करण्यासाठी ‘जी-मेल’वर आता सुरक्षेसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले आहे. ‘जी-मेल’चे अकाऊंट उघडताना सुरक्षेबाबतचा प्रश्न आणि पर्यायी ‘ई-मेल’ पत्ता विचारला जातो. या प्रश्नांची माहिती कोणालाही देऊ नका आणि निवडलेल्या पर्यायी ‘ई-मेल’साठीही स्वतंत्र आणि अनोखा ‘पासवर्ड’ द्या, अशी सूचना करण्यात आली आहे. अगदी जवळच्या मित्राशीही हा परवलीचा सांकेतिक शब्द ‘शेअर’ करू नका. कारण, कोणत्याही क्षणी या ‘पासवर्ड’चा गैरवापर होऊ शकतो. अनेक जण वेगवेगळ्या संकेतस्थळांवर ‘लॉग इन’ करताना एकच ‘आयडी’ वापरतात आणि ‘पासवर्ड’ही तोच देतात. अशामुळे जर तुमचे एक मेल अकाउंट हॅक झाले, तर समान पासवर्डमुळे सर्व अकाउंट हॅक होऊ शकतात, असा इशारा ‘जी-मेल’ने दिला आहे.

‘लॉग इन’ केल्यावर तळाला असलेल्या टिपेद्वारे मेल अकाउंट यापूर्वी कधी ओपन झाले होते, त्याची वेळ आणि दिवस अशी माहिती मिळते. ही माहिती नेहमी तपासल्यास आपले मेल अकाउंट अन्य कोणी वापरते का, याचा शोध लागू शकतो. अनेक संकेतस्थळांकडून येणारी निमंत्रणे उघडल्यास किंवा ‘आगंतुक’ लिंक उघडल्यास तत्क्षणी ‘आयडी’ आणि ‘पासवर्ड’ त्या लिंकवर ‘बाय डिफॉल्ट’ जोडला जाऊ शकतो. त्यामुळे अशा लिंकवर ‘क्लिक’ करण्याच्या भानगडीत पडू नका, असेही सांगण्यात आले आहे. सुरक्षेची एवढी काळजी घेऊनही हॅकिंग झाल्याचे समजले, तर तत्काळ ‘जी-मेल’ला माहिती द्यावी. पर्यायी ‘ई-मेल’ आणि सुरक्षेबाबतच्या प्रश्न नमूद करून त्या ‘ई-मेल’ पत्त्यावर पुन्हा ताबा मिळवता येऊ शकतो. मात्र, तोपर्यंत मेलधारकाचे किती नुकसान झाले, हे कळणे अवघडच ठरू शकते.

*** विनोद हा पुलंचा श्वास होता**

‘गेलेल्या माणसाच्या आठवणी ऐकताना हसणे काही बरे नव्हे, पण पुलंच्या आठवणी ऐकताना आलेले हसू ही त्यांना मिळालेली दाद आहे. ते विनोद ‘करत’ नसत; विनोद तर त्यांचा श्वासच होता!’

ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी अशा भावना व्यक्त केल्या. निमित्त होते, अक्षरधारा व परचुरे प्रकाशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या

‘तुझिया जातीचा मिळो आम्हां कोणी’ या पु. ल. देशपांडे यांच्याविषयीच्या लेखसंग्रहाच्या प्रकाशनाचे! हे प्रकाशन पाडगावकर यांच्या हस्ते झाले.

ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, अशोक पानवलकर, डॉ. संजय ओक, डॉ. सतीश अग्निहोत्री आदी यावेळी उपस्थित होते. पाडगावकर यांनी पु.ल. देशपांडे यांच्या हजरजबाबी स्वभावाचे काही किस्से सांगितले. तसेच आपल्या काही कविता आणि वात्रटिकाही वाचून दाखवल्या. ते म्हणाले, ‘पुलंचे श्रोत्यांवर अतोनात प्रेम होते. सतत माणसांच्या गराड्यात राहणे त्यांना आवडे. भेटायला येणाऱ्यांचे ते सहज ‘श्रोते’ करत असत. मी आणि पु.ल. एकाच काळात आकाशवाणीत नोकरी करत असू. इतकेच नव्हे तर आमची बसण्याची खोलीही एकच होती. त्या काळात ‘पी.एल.’ चा अफलातून स्वभाव मला जवळून अनुभवता आला.’

मिरासदार म्हणाले, ‘महाराष्ट्राला हसायला शिकवणारे अत्रे होते; या हसण्याला पुलंनी सुसंस्कृतपणाची जोड दिली. दोघांनीही आपल्या विनोदाला विडंबनाने सुरुवात केली. अत्र्यांचा विनोद रक्तबंबाळ करणारा, प्रसंगी वैयक्तिक टीका करणारा होता. पुलंचा विनोद मात्र उनाड पोराने थट्टा करावी तसा आहे!’

याप्रसंगी ओक यांनी लिहिलेल्या ‘मला काही सांगायचंय’, अग्निहोत्री यांनी लिहिलेल्या ‘झोपी गेलेला कुंभकर्ण’ आणि पानवलकर लिखित ‘नेटभेट’ या पुस्तकांचे केतकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. केतकर यांचे या वेळी भाषण झाले. भाऊ मराठे यांनी सूत्रसंचालन केले.

*** डोळ्यांचा ‘स्मार्ट’ कारभार, पण...**

अख्ख्या जगाला एका बोटावर नाचवण्याची किमया स्मार्टफोन्सनी केली.कुठलेही काम चुटकीसरशी करणे या स्मार्टफोन्समुळे शक्य झाले. पण आता हे उपकरण अधिकच स्मार्ट होऊ लागले आहे. फोनसमोर हात हलवून किंवा आज्ञा ऐकून काम करणारी ॲप्लिकेशन्स आणि स्मार्टफोन्स याआधीही आले आहेत. पण भविष्यात मात्र केवळ डोळ्यांच्या हालचालींवर सारा कारभार उरकणार आहे. ‘सेन्सआय’ या नावाने हे नवे ॲप्लिकेशन २०१३ मध्ये नवीन स्मार्टफोन आणि टॅब्लेट्समध्ये दिसणार आहे.

सध्याच्या घडीला बहुतांशी स्मार्टफोन्स तसेच टॅब्लेट्सना पुढच्या बाजूलाही कॅमेरा असतो. पापण्यांच्या होणाऱ्या हालचाली कॅमेऱ्यातून टिपून त्यानुसार हा फोन काम करणार आहे. ‘फेशियल रेकग्निशन’च्या जवळ जाणारे हे ॲप्लिकेशन आहे. पापण्यांच्या हालचालींनुसार हे ॲप्लिकेशन कार्यरत होणार असले तरी दृष्टीहीन व्यक्तींसाठी मात्र कोणतीही विशेष तरतूद करण्यात आलेली नाही. एकीकडे स्मार्टफोन्स अधिक स्मार्ट होत असताना दुसरीकडे त्यांच्या वापरामुळे

प्रकृतीच्या कुरबुरींना सुरुवात झाली आहे. 'टेक्स्ट नेक' आणि 'टेक्स्ट थंब इन्जुरी' सारखी नवी दुखणी तंत्रज्ञानाच्या अधिक वापरामुळे लागली असल्याचा अहवाल ब्रिटनमधील आरोग्य तंज्ञानी दिला आहे. टॅब्लेट्स तसेच स्मार्टफोन्समधील टचस्क्रीन तसेच नेहमीच्या तंत्रज्ञानामुळे बोटे, मानदुखीचे प्रमाण वाढले आहे. बोटांच्या अतिरिक्त वापरामुळे स्नायू दुखावले जात असून त्याचा थेट परिणाम हातांवर होऊ लागला आहे. डोळ्यांच्या किंवा पापण्यांच्या हालचालींवरून फोन कार्यरत होण्याचे तंत्रज्ञान विकसित होणे चांगलेच आहे. पण त्यामुळे आणखी एका आजाराला निमंत्रण आपण देत आहोत, असे 'चार्टर्ड सोसायटी ऑफ फिजिओथेरपी'ने सांगितले.

*** अठराव्या शतकातील वृत्तपत्र 'ऑनलाइन'**

भूतकाळातील आठवणी असोत किंवा वर्तमानातील घडणारी एखादी घटना असो, तिचे इंटरनेटच्या माध्यमातून जगभरात पडणारे पडसादही आपण पाहिले आहेत. कमी कालावधीत एखादी गोष्ट जगभर पोचविण्यासाठी सध्या इंटरनेटची मदत घेण्यात येत आहे. इंटरनेटचा सर्वाधिक फायदा वृत्तपत्रांना आणि त्यांच्या वेबसाइटना झाला आहे. न्यूयॉर्क टाइम्सची वेबसाइट ही जगात सर्वात अधिक वाचली जाणारी वेबसाइट बनली आहे, ती त्याचमुळे.

सध्या इंटरनेटवरील वृत्तपत्रे जगभर चवीने वाचली जातात आणि त्याविषयी चर्चाही केली जाते. एवढी सगळी प्रस्तावना याचसाठी की नुकतीच एका ब्रिटीश लायब्ररीने खास वाचकांसाठी अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकातील वृत्तपत्र स्कॅन करून इंटरनेटवर डाऊनलोड केले. त्यामुळे माध्यमांचा अभ्यास करणाऱ्यांची चांगलीच सोय झाली आहे. या लायब्ररीने नुकतीच एका दैनिकाची तब्बल ४० लाख पाने इंटरनेटवर उपलब्ध करून दिली आहेत. हे वृत्तपत्र तत्कालीन ब्रिटन आणि आयर्लंडमध्ये प्रसिद्ध होते असे समजते.

या वृत्तपत्राच्या पानांत रेल्वेचा उदय, राणी व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट यांच्या विवाहाच्या वृत्तांकनाचा समावेश आहे. संबंधित ब्रिटिश लायब्ररीचे प्रमुख एड किंग यांच्या मते अशाप्रकारचा हा पहिलाच प्रयोग असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही माहिती वाचणे, डाऊनलोड करणे हे अगदी नि:शुल्क आहे. स्कॅनिंग केलेल्या पानांमुळे हे दोनशे वर्षांपूर्वीचे वृत्तपत्र नेहमीच्या पद्धतीने वाचणे शक्य होणार आहे. अभ्यासकांना ठरावीक तारखेचे पान, त्यातील हवी ती बातमी, हवा तो फोटो आणि ठरावीक मजकूर पाहणे, वाचणे शक्य होणार आहे. एक क्लिक करावयाचा अवकाश की ती बातमी समोर हजर... अशी या साइटची रचना करण्यात आली आहे.

या वेबसाइटवर डाउनलोड करण्यात आलेल्या वृत्तपत्रांत 'अबरदीन जर्नल',

'बेलफास्ट न्यूजलेदर', 'वेस्टर्न मेल' आणि 'मँचेस्टर इव्हिनिंग न्यूज' आदींचा समावेश आहे. ही वृत्तपत्रे डाऊनलोड करण्याच्या प्रकल्पावर लायब्ररींची टीम गेले वर्षभर राबत होती. त्यांनी दिवसाला ८ हजार पाने या वेगाने हा प्रकल्प पूर्ण केला आहे. आगामी दहा वर्षांत आणखी ४ कोटी पाने डाउनलोड करण्यात येणार आहेत.

*** सोशल मीडियात गोपनीयता वेशीवर**

आपले फोटो, पर्सनल माहिती, कॉमेंट्स शेअर करून त्यावर चर्चा, मतमतांतरे मिळवण्याचा फेसबुक कट्टा आता फारसा सुरक्षित राहिलेला नाही. जुने फ्रेंड्स आणि ग्रुप्सवर अधिकाधिक माहिती तुम्ही शेअर करत असाल, तर फेसबुक स्वत:च त्याचा इतर कारणासाठी वापर करण्याचा धोका आता निर्माण झाला आहे. युरोपमध्ये फेसबुकने काही लोकांचे प्रोफाइल आणि माहिती जाहिरातदार कंपन्यांना विकल्यामुळे गदारोळ उडाला आहे.

फेसबुकच्या या व्यापारी कारनाम्यानंतर आता युरोपियन कमिशन अधिक कठोर पावले उचलण्याच्या मनस्थितीत असून फेसबुकवर प्रोफाइलमधील राजकीय मते, लैंगिकतेबाबतची मते आणि धार्मिक विचारसरणी याबाबतच्या माहितीवर बंधने आणणार आहे. वेगवेगळ्या सॉफ्टवेअरचा वापर करून लोकांकडून प्रायव्हसी सेटिंगमध्ये असलेली माहितीही जाहिरातदारांना फेसबुक पुरवत असल्याचा आरोप आहे. फेसबुकच्या या नव्या कारनाम्यांमुळे जागे झालेले युरोपियन कमिशन नवे नियम जानेवारीमध्ये लागू करणार आहे. या नियमांनुसार जाहिरातदारांना प्रोफाइल ओनरच्या परवानगीशिवाय संबंधित माहिती वापरता येणार नाही. तर अमेरिकेनेही याबाबत कारवाईचा बडगा उगारण्याची तयारी केली आहे.

या पार्श्वभूमीवर कमिशनने संबंधित सोशल मीडिया साइट्सशी संपर्क साधला असून त्यांच्या ऑपरेटिंगमध्ये अधिकाधिक पारदर्शकता असावी, असे बंधनही घालण्यात येणार आहे. प्रोप्राइलवरील एखाद्या माहितीचा वापर केला जाणार असेल, तर त्याबाबत संबंधित व्यक्तीला माहिती असणे, त्याची परवानगी असणे आवश्यक असेल. मात्र, अशाप्रकारे माहिती विकल्याचा वा त्याचा गैरवापर केल्याच्या दाव्याचा फेसबुक इन्कार करत आहे. कोणत्याही प्रोफाइलमधील माहिती संबंधित व्यक्तीच्या परवागनीशिवाय जाहिरातदारांना दिली जात नाही. तसेच साइटवरील माहिती कोणत्याही तिऱ्हाईत व्यक्तीला विकली जात नसल्याचा फेसबुकचा दावा आहे.

युरोप आणि अमेरिकेमध्ये पेपरच्या दाव्यावरून फेसबुकवर कारवाईचा बडगा उगारण्याची तयारी झाली आहे.

*** सॅमसंगच्या टीव्हीत गुगल टीव्ही**

मोबाइल क्षेत्रात गुगलशी हातमिळवणी करून ॲपलच्या आयफोनला टक्कर देत असलेल्या सॅमसंगने आता डबघाईला आलेल्या टीव्ही उद्योगातही गुगलकडे मोर्चा वळवला आहे. यू ट्यूबसह अन्य इंटरनेट व्हीडिओ सेवा पुरवणाऱ्या वेबसाइटचा थेट टीव्हीवर ॲक्सेस पुरवणाऱ्या गुगल टीव्हीच्या मदतीने स्मार्ट टीव्हीच्या क्षेत्रात आघाडी घेण्यासाठी सॅमसंगने बोलणी चालवली आहेत.

कम्प्युटर आणि मोबाइलच्या जमान्यात टीव्हीचे प्राबल्य आता कमी होत चालले आहे. त्याततच एलसीडी, एलईडी, स्मार्ट टीव्ही यांच्यामुळे सर्वसाधारण टीव्ही, तर जवळपास हद्दपार होत आहे. त्यामुळे दहा वर्षांपूर्वी सर्वात नफादायी उद्योग असलेला टीव्ही उद्योग आता डबघाईला येत आहे. याचा सर्वाधिक फटका जगातील सर्वांत अग्रगण्य टीव्ही कंपनीपैकी एक असलेल्या सॅमसंगला बसत आहे. म्हणूनच गुगल टीव्हीच्या मदतीने आपल्या टीव्ही उत्पादनांना वर आणण्याचे सॅमसंगचे प्रयत्न आहे.

इंटरनेट, सोशल नेटवर्किंग, यू ट्यूब अशा सुविधा असलेल्या स्मार्ट टीव्हीच्या उद्योगाने आतापासून बाजारपेठ काबीज करण्यास सुरुवात केली आहे. २०११ या वर्षांत जगभरात १ कोटी २० लाख स्मार्ट टीव्ही, तर साडेचार कोटी फ्लॅट स्क्रीन टीव्हींची विक्री होण्याची सॅमसंगचा अंदाज आहे. त्यामुळेच गुगलशी बोलणी करून गुगल टीव्हीचा सॅमसंग टीव्ही समावेश करण्याचे सॅमसंगचे प्रयत्न सुरू आहेत.

गुगल टीव्ही ही सुविधा गेल्या वर्षीच लाँच करण्यात आली होती. थेट टीव्हीत अंतर्भूत असलेल्या किंवा सेट टॉप बॉक्सच्या मदतीने यू ट्यूब, इंटरनेट टीव्ही आणि अन्य ऑनलाइन चॅनेल्स पाहणे शक्य होते. मात्र, हा सर्रास पायरसी आणि ब्रॉडकास्ट नियमांचे उल्लंघन करून केलेल्या चोरीचा प्रकार असल्याची टीका गुगल टीव्हीवर होत आहे.

अर्थात, गुगल टीव्हीचा सॅमसंगला कितपत फायदा होईल, याबाबत तज्ज्ञांना शंका आहे. काही दिवसांपूर्वीच लॉगीटेक या कंपनीने गुगल टीव्हीवर आधारीत रेव्हू सेट टॉप बॉक्सचा व्यवसाय बंद केला आहे.

गुगल टीव्हीची सेवा अद्याप परिपूर्ण नसून, त्याचा परिणाम विक्रीवर होत असल्याचे सांगून लॉगीटेकनेही ही भागीदारी मोडीत काढली होती. त्यामुळे गुगल टीव्हीची सुविधा पुरवणारी सोनी ही एकमेव टीव्ही कंपनी सध्या बाजारात उरली आहे. सॅमसंगने त्यामुळेच गुगल टीव्हीची मदत घेण्याचे ठरवले आहे. याची घोषणा नजीकच्या काळात होण्याची शक्यता नसली, तरी पुढील वर्षी जानेवारी एलजी टीव्हीही गुगल टीव्हीबरोबर झळकणार असल्याने सॅमसंगला नक्कीच घाई

करावी लागणार आहे.

*** कॉपी राइटवरून कोर्टात 'याहू'**

कार्पोरेट कंपन्या आणि खटले यांचे फार जवळचे आणि घनिष्ठ नाते आहे. एकमेकांशिवाय पटत नसल्यासारखी त्यांची गत आहे. त्यात पुन्हा आंतरराष्ट्रीय कंपनी असेल, तर जितक्या देशांत कार्यालये तितक्या ठिकाणी कोर्टाच्या वाऱ्या सुरूच असल्या पाहिजेत, असा जणू अलिखित नियम झाला आहे. सिंगापूरच्या एका मीडिया कंपनीने वेबसाइटवरील माहितीच्या कॉपी राइटवरून 'याहू'ला कोर्टात खेचले आहे. दुसरीकडे भारतात कंपनीने थेट केंद्र सरकारलाच कोर्टाच्या पायऱ्या दाखवल्या आहेत.

सिंगापूरच्या द स्ट्रेट टाइम्स, न्यू पेपर आणि माय न्यू पेपर या तीन वर्तमानपत्रातील लेख तसेच इतर माहिती वेबसाइटवर जशीच्या तशी आल्यामुळे 'सिंगापूर प्रेस होल्डिंग' या प्रकाशकांनी 'याहू'वर चोरीचाच ठपका ठेवला आहे. या प्रकाशकांनी गेल्या वर्षभरात याहूवर प्रसिद्ध झालेल्या तब्बल २३ लेखांची यादीच कोर्टात सादर केली आहे. याबाबतीत 'याहू'नेही या लेखांचे मूळ हक्क स्वत:कडेच असल्याचा दावा करत ते सिद्ध करण्याच्या दृष्टीने पावले उचलायला सुरूवात केली आहे. थेट तीन वृत्तपत्रांनीच हा आरोप केल्यामुळे नेटिझन्समध्ये 'याहू'ची जरा नाचक्की झाली आहे. पण, हे आरोप बिनबुडाचे असून, त्याप्रकरणी आम्ही कोर्टात निर्दोष सिद्ध होऊ, असे 'याहू'चे म्हणणे आहे.

एकीकडे 'याहू'वर चोरीचा आरोप असताना दुसरीकडे कंपनीने भारत सरकारला दिल्ली उच्च न्यायालयात खेचले आहे. इस्लामिक दहशतवादी आणि माओवादी यांच्या संशयितांचे इ-मेल आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयाने इकडून-तिकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला होता. जवळपास डझनभर संशयितांची खासगी माहिती तसेच त्यांचे आयपी ॲड्रेस मिळवण्यासाठी गृहमंत्रालयाने इकडे-तिकडे हातपाय मारले होते. सुरक्षा यंत्रणांनी काही संशयितांची माहिती देण्यासाठी याहूला विचारणा केली होती. पण, कंपनीने ही माहिती उघड करण्यास नकार दिला. त्यामुळे सरकारने याहूला थेट ११ लाख रुपयांचा दंड ठोठावला. याबाबतीतच कंपनीने कोर्टात धाव घेतली आहे. तूर्तास तरी उच्च न्यायालयाने या दंडावर स्थगिती आणली असून सरकारकडून खुलासा मागितला आहे.

*** फेसबुक कसं वापराल?**

आपण आपल्या फ्रेंडलिस्टपैकी कुणीही पोस्ट केलेली माहिती तिची शहानिशा न करता शेअर करून टाकतो. निव्वळ मनोरंजन हा त्याचा हेतू असला तरी हाच कधीकधी खूप तापदायक ठरतो. फ्री टीशर्ट्स, फ्री गिफ्टस, शॉकिंग व्हिडिओज,

आपलं प्रोफाइल कोणी बघितले आहे हे सांगणाऱ्या लिंक्स अशा अनेक गोष्टी आपोआप पोस्ट होत असतात. नकळत आपण त्यावर क्लिक करतो आणि ती आपल्या सगळ्या फ्रेंड्सच्या वॉलवर पोस्ट होते. तेव्हा कुठे आपल्याला कळतं की ही एक स्पॅम लिंक आहे. फेसबुक वापरताना घ्यायची काळजी व सुरक्षिततेचे उपाय माहिती असणं याचसाठी महत्त्वाचं आहे.

* जर आपल्या अकाऊंटमधून 'अननोन लिंक्स' पोस्ट होत असतील तर अकाऊंट सेटिंगमधून पासवर्ड बदला आणि सिक्युअर ब्राऊझिंग अनेबल करा.

* तुमच्या प्रोफाइलला कोणी व्हिजिट केलीय किंवा 'हू हॅज बीन स्टॉकिंग युअर प्रोफाइल' असं म्हणणाऱ्या लिंक्स, पोस्ट, शेअर किंवा ओपन करणं टाळा. त्यावर क्लिक करू नका.

* फेसबुकच्या इ-मेलमधून आलेल्या अटॅचमेण्ट्स उघडू नका अगदी फ्लॅश प्लेअर अपडेट आला तरीही. कारण ही लिंक खोटीसुद्धा असू शकते आणि तुमचं अकाऊंट किंवा तुमचा पीसी अफेक्ट होऊ शकतो.

* फेसबुक मधून आलेल्या 'प्लीज सेंड मनी' इ-मेल स्कॅम मेलला बळी पडू नका आणि असा मेसेज लगेचच काढून टाका.

* जर तुम्हाला कोणती लिंक संशयास्पद वाटली तर 'रिपोर्ट स्कॅम' करा जेणेकरून फेसबुक टीम त्यावर लक्ष ठेवून गरज पडल्यास योग्य ती कारवाई करेल.

* आपल्या कम्प्युटरशिवाय अन्य कुठेही इंटरनेट वापरताना आपले अकाऊंट न विसरता साईन आऊट करा.

* आपला पासवर्ड कोणालाही सांगू नका आणि बाहेरच्या मशिनवर सेव्ह करू नका.

* शक्यतो बाहेरच्या मशिन्सवरून ऑनलाइन व्यवहार टाळा.

* ऑनलाईन व्यवहार करताना शक्यतो व्हर्च्युअल कीबोर्डचा वापर करा. ज्यामुळे तुमचा क्रेडीट किंवा डेबीट कार्ड नंबर कुठेही स्टोअर होत नाही आणि त्याचा गैरवापर व्हायची शक्यता कमी होते.

* आपल्या स्पॅम इमेलमध्ये आलेल्या कोणत्याही लिंकवर जाऊ नका. खास करून बँकेच्या. कारण त्याद्वारे तुमची माहिती समोरच्याला मिळू शकते आणि तुमच्या बँक अकाऊंटला ॲक्सेस मिळू शकतो.

*** मोबाइल व्हायरसचं वर्ष**

मोबाइल फोन्स, टॅब्लेट्स तसंच स्मार्टफोन्स यांच्या लोकप्रियतेत यंदाच्या वर्षात जरा जास्तच वाढ झाली. पण केवळ ग्राहकांच्या संख्येतच ही वाढ झालेली नसून, मालवेअर तसेच व्हायरस हल्ल्यांच्या प्रमाणातही प्रचंड वाढ झाली आहे.

एकीकडे कम्प्युटर व्हायरस हल्ल्यांच्या प्रमाणात घट झालेली नसतानाच मोबाइल मालवेअरचा व्याप आणि तापही वाढतच चालला आहे. 'मॅकॅफी'ने नुकताच त्यांचा 'थ्रेट्स रिपोर्ट' जाहीर केला. २०११ हे मालवेअर आणि व्हायरस यांच्याकरता विक्रमी वर्ष ठरले आहे, असे या अहवालात म्हटले आहे.

२०११ या वर्षात तब्बल सात कोटी नवे मालवेअर, व्हायरस तयार होतील, असे भाकित 'मॅकॅफी'ने गेल्या वर्षअखेरीस केले होते. पण, नऊ महिन्यांतच हा आकडा साडेसात कोटीपर्यंत पोचला आहे. स्मार्टफोन तसेच इतर ग्राहकांची संख्या वाढत असतानाच व्हायरस डेव्हलपर्समध्येही वाढ होत आहे. त्यातही सोशल नेटवर्किंग वेबसाइट्वर झालेल्या सायबर हल्ल्यांमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. 'ॲनॉनिमस' आणि 'लुल्झसेक' या दोन हॅकर्स ग्रुप्सनी केलेल्या हल्ल्यांमुळेही अनेक संस्थांचे नुकसान झाले आहे.

स्मार्टफोन्सच्या क्षेत्रात अँड्रॉइडने सिम्बियन या ऑपरेटिंग सिस्टमला हल्ल्यांच्या बाबतीत मागे टाकले आहे. अँड्रॉइड फोन्ससाठी तयार करण्यात आलेल्या व्हायरसमध्ये तब्बल ४७२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अँड्रॉइड फोन्सचा ग्राहकवर्ग हळूहळू वाढत आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी अनेक ॲप्लिकेशन्सही तयार करण्यात आली आहेत. पण, याचा अर्थ अँड्रॉइड फोन्स असुरक्षित आहे, असा होत नाही, हे 'मॅकॅफी'ने स्पष्ट केले आहे. 'अँड्रॉइड'बरोबरच सिम्बियन ऑपरेटिंग सिस्टमच्या फोन्सनाही मालवेअरचा सर्वाधिक फटका बसला आहे. बनावट अँटिव्हायरस, पासवर्ड चोरी अशा प्रकारांचा वाटा सगळ्यात जास्त असल्याचे 'मॅकॅफी'ने म्हटले आहे.

*** जरा दमानं घ्या...**

हल्ली सगळं काही ऑनलाइन असतं. मित्र-मैत्रिणी, गप्पा, रूसवे-फुगवे, भेटीगाठी, प्रेम इतकंच काय तर अगदी लग्न-पत्रिकाही आणि इव्हेंट्सही. मग या सगळ्यासाठी गिफ्ट्स आणि त्यासाठी केलं जाणारं शॉपिंगही. जवळपास सगळी पेमेंट्स ऑनलाइन करण्याचीही हल्ली सोय आहे. रांगेत उभे राहून वेळ घालवत 'सुट्टे पैसे द्या', 'ही नोट चालणार नाही' अशी काही कटकट सहन करण्यापेक्षा ऑनलाइन पेमेंटचा पर्याय आजकल अनेकजण अवलंबतात. शॉपिंगप्रमाणे मोबाइल आणि ऑनलाइन बँकिंगचा ट्रेंडही एकीकडे झपाट्याने पसरत आहे. बँकेतल्या गर्दीला फाटा देत या नव्या पर्यायांकडे लोकांचा ओढा वाढत आहे. पण हे करत असताना अनेकदा फसल्या जाण्याची शक्यताही असते. त्यापासून काळजी घेण्यासाठीच या काही टिप्स.

* शक्यतो नावाजलेल्या वेबसाइट्सवरून शॉपिंग करा. जेणे करून काही अडचण आल्यास त्यांच्याशी थेट संपर्क साधता येता.

* कोणत्याही साइटवरून शॉपिंग करताना खाली 'लॉक सिम्बॉल' आहे का याची खात्री करून घ्या. आणि पेमेंट करताना आपल्या ब्राउजरवर असणाऱ्या ॲड्रेस बारमध्ये https आहे याकडे लक्ष असू द्या, कारण सुरक्षित व्यवहार होत असल्याची ती खूण असते.

* कोणतीही शॉपिंग वेबसाइट तुमची जन्मतारीख किंवा तुमची अन्य माहिती मागवत नाही. पण तुमची जन्मतारीख आणि क्रेडीट-डेबिट कार्ड नंबर जर कोणाला मिळाला तर ते कॉम्बीनेशन करून कार्ड वापरायचा प्रयत्न करू शकतात.

* आपले क्रेडीट आणि बँक स्टेटमेंट चेक करत राहा आणि कोणतेही अन्य चार्जेस लावलेले नाहीत हे पडताळा.

* तुमच्या कॉम्प्युटरवर अपडेटेड अँटीव्हायरस आणि लेटेस्ट ऑपरेटिंग सिस्टम अपडेट्स इन्स्टॉल्ड आहेत याकडे लक्ष असू द्या.

* आपला पासवर्ड कोणाला सहज कळेल असा नसावा.

* शक्यतो बाहेरच्या मशीन्सवरून ऑनलाइन ट्रान्झॅक्शन करणे टाळावे.

* वायफाय नेटवर्क सिक्युअर्ड आणि पासवर्ड प्रोटेक्टेड असावे.

**ऑनलाइन बँकिंग टिप्स**

* बँकेच्या साइटवर नेहमीच नवीन लिंक ओपन करून जावे. इ-मेलमध्ये आलेली लिंक ओपन करू नये. तशी लिंक आल्यास बँकेला कळवावे.

* कुठलीही बँक कधीही तुमची खासगी माहिती परत मागत नाही. तुम्हाला त्यासंबंधीचा एखादा मेल आला तरी ती माहिती बँकेत जाऊन द्यावी. त्या मेलवरून माहिती देऊ नये.

* बँकेची साइटसुद्धा https ओपन होत आहे ना हे बघावे.

* आपला मोबाइल नंबर रजिस्टर्ड असल्यास आपल्याला ठराविक रकमेच्या व्यवहारांसाठी तुम्हाला एसएमएस अलर्ट येऊ शकतात.

* बँक स्टेटमेंट जर काही वेगळे आढळले तर लगेच बँकेशी संपर्क साधावा.

* ऑनलाइन बँकिंग वापरून झाल्यावर अकौंटट नेहमी लॉगआउट करावे.

*** घरातल्या घरात नकाशा**

एखाद्या अनोळखी शहरात किंवा गावात गेलं आणि रस्ता माहीत नसेल तर इष्टस्थळी पोचण्यासाठी स्थानिकांची मदत घेतली जाते. सध्याच्या परिस्थितीत मोबाइलवर गुगल मॅप ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे ठिकाण शोधणं आता तितकेसे कठीण काम नाही. पण गुगलने आता पुढची पायरी गाठलीय. म्हणजे तुम्ही एखाद्या बड्या मॉलमध्ये असाल. तिथे तुम्ही रस्ता चुकलात तर काय कराल? जवळच्या कर्मचाऱ्याची मदत घ्याल किंवा त्या मजल्यावर असणारा नकाशा बघाल. मात्र गुगलने आता शॉपिंग मॉल, हॉटेल्स, विमानतळं याचे

नकाशेही देण्यास सुरुवात केली आहे.

कंपनीने नुकतेच गुगल मॅप्स ६.० बाजारात आणले आहे. त्यामध्ये त्यांनी इनडोअर मॅपिंग तंत्रज्ञान वापरले आहे. यामुळे ग्राहकांना मदत तर होणारच आहे पण त्याशिवाय जाहिरातींच्या माध्यमातून गुगललाही आर्थिक फायदा होणार आहे. या नव्या सुविधेसाठी गुगलने अनेक विमानतळे, शॉपिंग मॉल्स, हॉटेल्स, रिटेलर्स यांच्याशी करार करण्यास सुरुवात केली आहे. एखाद्या अनोळखी ठिकाणी नवख्या माणसाला येणाऱ्या अडचणी डोळ्यासमोर ठेऊन या सोयीची रचना करण्यात आली आहे. बुकशॉप्स, कॉफीशॉप्स शोधण्यासाठी या नव्या सुविधेचा वापर होऊ शकतो असे गुगलतर्फे सांगण्यात आले आहे. सध्यातरी अमेरिका आणि जपानमध्ये ही सुविधा कार्यरत झाली असून लवकरच इतर देशांमध्येही ती सुरू होणार आहे.

गुगलच्या या नव्या सोयीचे कौतुक सगळीकडे होत आहे. पण ही अशी सोय सुरू करणारी गुगल ही पहिली कंपनी नाही. यापूर्वी मायक्रोसॉफ्टच्या 'बिंग'नेही अशीच एक सुविधा बाजारात आणली होती. व्हेन्यूज मॅप नावाने विविध ठिकाणांचे फ्लोअर मॅप्स देण्याची सोय बिंगने सुरू केली होती. पण गुगलच्या या नव्या सुविधेइतकी सहजता आणि सोपेपणा त्यात नव्हता. म्हणूनच ही सोय फारशी छाप पाडू शकली नाही. अॅण्ड्रॉइड फोनवर हे मॅप अॅप्लिकेशन वापरता येणार असून अॅपलच्या आयफोनसाठी मात्र काही विशेष तरतूद करण्यात आलेली नाही. उलटपक्षी गुगलची ही सोय बघून अॅपललाही काहीतरी कल्पना सुचेल असं कंपनीकडून सांगितलं जात आहे.

*** 'कर्त्या-करवित्या' या पुस्तकाचे प्रकाशन**

राजकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या स्त्रिया केवळ नावापुरत्याच आहेत. सर्व कामे पुरूषमंडळी करीत असतात, अशा स्थितीत स्त्रियांना ३३ टक्के आरक्षण दिले किंवा ५० टक्के दिले तरी त्याचा काय उपयोग असा सवाल राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण यांनी केला.

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या 'बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्रा'च्या 'कर्त्या-करवित्या' या पुस्तकाचे प्रकाशन त्याच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले उपस्थित होते.

''कर्त्या-करवित्या' या पुस्तकाबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, बाया कर्वे पुरस्कारप्राप्त वेगवेगळ्या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या व प्रसिद्धी न मागता अबोलपणे काम करणाऱ्या स्त्रिया आहेत. त्यांच्या कार्यावर आधारित टीव्ही मालिकांची निर्मिती करण्याची विनंती त्यांनी केली.

या प्रसंगी गोखले म्हणाले की, देशाच्या संपन्नतेसाठी महिलांच्या हाती सत्ता

हवी. ‘कर्त्या-करवित्या’ या पुस्तकाचे सर्व प्रादेशिक व इंग्रजी भाषेत भाषांतर व्हावे, अशीही इच्छा त्यांनी व्यक्त केली. मृणालिनी चितळे यांनी पुस्तक परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अंजली देशपांडे यांनी केले तर विद्या देशपांडे यांनी आभार मानले.

*** निसर्ग छायाचित्रांचे प्रदर्शन सुरू**

आपल्याही डोळ्यांना दिसणाऱ्या अनेक वस्तू, फुले, फळे, पाने एखाद्या निष्णात छायाचित्रकाराच्या कॅमेऱ्याने टिपल्या गेल्या, की खूपच वेगळ्या होऊन जातात. मग आपल्याला हे असे आधी का नाही दिसले, असा प्रश्न पडतो. असाच अनुभव सत्यजित पंडित यांनी काढलेल्या छायाचित्रांतून येतो. त्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन बालगंधर्व कलादालनात भरले होते.

व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. काळा, निळा, पांढरा अशा विविध रंगात रंगून गेलेले आकाश, वळणावळणाने जाणारी नदी अशी अनेक निसर्गसुंदर छायाचित्रे पंडित यांनी काढली होती.

*** साधना साहित्य संमेलन**

नाटक विषयावर आधारित असणाऱ्या साधना साहित्य संमेलनाचे आयोजन यंदा नाशिकमध्ये करण्यात आले होते. ११ आणि १२ डिसेंबर रोजी संमेलन झाले.

कविवर्य कुसुमाग्रज यांची जन्मशताब्दी असल्याने नाशिकमध्ये या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. नाशिक येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या महिला महाविद्यालयात दोन दिवस चाललेल्या या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ नाटककार गो. पु. देशपांडे यांचे बीजभाषण झाले. त्यावर ज्येष्ठ समीक्षक पुष्पाताई भावे आणि चं. प्र. देशपांडे यांनी चर्चा केली. नेपथ्यकार प्रदीप मुळे, नाटककार प्रेमानंद गज्वी, अभिनेते सदाशिव अमरापूरकर आणि दिलीप प्रभावळकर यांच्या प्रकट मुलाखतींचा कार्यक्रम या संमेलनात झाला. नाटककार वि.वा.शिरवाडकर आणि वसंत कानेटकर यांच्यावर कमलाकर नाडकर्णी व मोहिनी पेटकर यांची व्याख्याने झाली. दोन दिवस चाललेल्या या संमेलनात नाटकाचे अध्यापन, स्त्री नाटककार आणि नळदोत्तरी रंगकर्मी या विषयावर परिसंवाद झाले. त्यामध्ये माधव वझे, वामन केंद्रे, मंजुल भारद्वाज, रेखा साने-इनामदार, शुभदा शेळके, जयंत पवार, अतुल पेठे, दीपक करंजीकर सहभागी झाले होते.

संमेलनाच्या निमित्ताने नाटकावर आधारित प्रश्नमंजूषा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यामध्ये स्थानिक संघ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संमेलनाचा समारोप ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते झाला. संमेलनाच्या ठिकाणी

साहित्य कलाकृती आणि नाट्यसंहितांची विक्री करण्यात आली.

*** गुरु रवीदास साहित्य संमेलन**

दुसरे अखिल भारतीय चार दिवसीय गुरु रविदास साहित्य संमेलन २६ जानेवारी ते २९ जानेवारी २०१२ दरम्यान मुक्रमाबाद, ता. मुखेड, जि. नांदेड येथे आयोजित करण्यात आले असून या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक व सोव्हिएत देश नेहरू पुरस्कार विजेते मा. रवींद्र बागडे यांची निवड करण्यात आली आहे.

❐



**आगामी**




२५०रु. पोस्टेज ३०रु.

# चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स

**जॅक कॅनफिल्ड**
**मार्क व्हिक्टर हॅन्सन**
**वेंडी एम. डिक्सन**

अनुवाद

**सुषमा जोशी**

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. यात देणारा आणि घेणारा दोघंही शिकत, शिकवत असतात.

कित्येक शिक्षक विद्यार्थ्यांना तळमळीनं शिकवत असतात. शिक्षकांच्या आचारविचारांमुळे, त्यांच्या शिकवण्यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळत असते. शिक्षक ज्याप्रमाणं विद्यार्थ्यांना शिकवतात, त्याप्रमाणेच विद्यार्थीही काही वेळा आपल्या वागण्यातून शिकवतात, प्रेरणा देतात.

शिक्षकांचा विद्यार्थ्यांवर नकळत पडणारा प्रभाव, कळत-नकळत होणारे संस्कार यामुळे विद्यार्थ्यांचं आयुष्य समृद्ध होत असतं. याबद्दलची कृतज्ञता यातील अनुभवांतून व्यक्त होताना दिसते. ही समृद्धी आणि कृतज्ञता हेच शिक्षकाचं वैभव असतं.

शिक्षकी पेशातील अशाच विविध अनुभवांचं अनोखं मिश्रण या पुस्तकात आहे.

आजच्या परिस्थितीत शिक्षकाला आपलं कार्य करत असताना कित्येक वेळा निराशा येते. ही निराशा दूर करण्यासाठी हे ‘चिकन सूप’ अत्यंत गुणकारी आहे.

**आगामी**




१५०रु. पोस्टेज २५रु.

# अंतरिक्षाच्या अंतरंगात

## लीना दामले

खगोलशास्त्राचा अभ्यास करायचा झाल्यास किचकट गणित व भौतिकशास्त्र अशा गंभीर विषयांना तोंड द्यावे लागते. मात्र खगोलशास्त्रातील गणित व भौतिकशास्त्र वगळून जर एखाद्याला त्यातील फक्त मनोरंजक माहिती मिळवायची इच्छा असेल, तर प्रस्तुत पुस्तक जरूर वाचावे.

हलक्या फुलक्या भाषेत खगोलशास्त्राशी तोंडओळख करून देता देता लेखिका आपल्या सूर्यमालेतील सभासदांविषयी माहिती देते. तसेच सूर्यमालेबाहेरील विविध परग्रह, ते शोधण्याच्या पद्धती, तारे व ताऱ्यांचे रंग यासंबंधी माहिती येते. विविध प्रकारच्या दुर्बिणी, त्यातून होणारे ब्रह्मांडाचे दर्शन, गुरुत्वीय भिंगासारखे चमत्कार, तर विश्वनिर्मितीसंबंधी अजूनही समाधानकारक विवेचन न मिळाल्याने शास्त्रज्ञांनी मांडलेले 'बिग बँग', 'स्टेडी स्टेट युनिव्हर्स' इ. सिद्धान्त विविध लेखांद्वारे लेखिकेने मांडले आहेत.




*** ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत डेग्वेकर यांना गोविंद बल्लाळ देवल सन्मान पुरस्कार**

मराठी रंगभूमीवर 'पंडितराज जगन्नाथ' या संगीत नाटकातील 'कलंदर'ची भूमिका अजरामर करणारे व आपल्या अभिनय कौशल्याने मराठी संगीत नाट्य रंगभूमी गाजवलेले मुंबई येथील ज्येष्ठ नाट्य अभिनेते चंद्रकांत तथा चंदू डेग्वेकर यांना नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.

देवल स्मारक समितीच्या वतीने प्रतिवर्षी त्यांच्या जन्मदिनी म्हणजे दि. १३ नोव्हेंबर रोजी हा पुरस्कार दिला जातो. मानपत्र, पदक, शाल, श्रीफळ व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सन १९९७ पासून देवल स्मारक समितीच्या वतीने हा पुरस्कार दिला जात असून यापूर्वी भालचंद्र पेंढारकर, श्रीमती जयमाला शिलेदार, प्रसाद सावकार, शरद गोखले, रामदास कामत, पंडित तुलसीदास बोरकर, कान्होपात्रा किणीकर, शांताराम सुर्वे, शिवराम राड्ये, मास्टर अविनाश, विनायक थोरात व अरविंद पिळगावकर यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

चंद्रकांत डेग्वेकर यांनी घरच्या बेताच्या परिस्थितीमुळे रात्री नोकरी व दिवसा महाविद्यालयीन शिक्षण अशी कसरत करीत 'मुंबईची माणसे' या बाळ कोल्हटकर यांच्या नाटकातील 'वसंत' भूमिका साकारली. चंद्रकांत डेग्वेकर यांच्या या भूमिकेने प्रभावित झालेल्या नाट्यसंपदेच्या तीन मालकांपैकी मोहन वाघ व विद्याधर गोखले यांनी त्यांच्या संस्थेच्या 'मदनाची मंजिरी' या नवीन नाटकात 'चक्रदेव' ही भूमिका दिली. तेथूनच त्यांच्या व्यावसायिक रंगभूमीवरील कारकीर्दीस सुरुवात झाली. एक गाणारा नट व्यावसायिक रंगभूमीवर विनोदी अभिनेता म्हणून वावरू लागला. सन १९६७ ला अण्णा पेंढारकर यांनी ललित कलादर्श या संस्थेत चंद्रकांत डेग्वेकर यांना बोलावले. 'दुरितांचे तिमिर जावो' नाटाकातील 'बापू', 'पुण्यप्रभाव'मधील 'भीष्म', 'एकच प्याला' मधील 'शरद' व 'देव दीनाघरी धावला' मधील 'नारद' या भूमिका अजरामर आहेत.

*** कवी ग्रेस यांना साहित्य अकादमी पुरस्कार**

कविवर्य ग्रेस यांच्यासह २२ साहित्यिकांची यंदाच्या साहित्य अकादमी

पुरस्कारासाठी निवड झाली आहे. पुरस्कारात मानचिन्ह आणि एक लाख रुपयांची समावेश असून १४ फेब्रुवारीला नवी दिल्ली येथे पुरस्काराचे वितरण होणार आहे.

माणिक सीताराम गोडघाटे उर्फ कवी ग्रेस यांना 'वाऱ्याने हलते रान' या ललितलेखसंग्रहासाठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

*** डॉ. अनंत लाभसेटवार पुरस्कार**

दरवर्षी लाभसेटवार प्रन्यास (नागपूर) आणि लाभसेटवार प्रतिष्ठान (अमेरिका) यांच्यावतीने मराठी सारस्वतांसाठी साहित्य सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सन २०१२ चा डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मान पुरस्कार कथाकार भारत सासणे यांना जाहीर झाला आहे. एक लक्ष रुपये रोख व स्मृतीचिन्ह या स्वूपात दिला जाणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार आजपर्यंत कविवर्य विंदा करंदीकर, डॉ. आनंद यादव, मा. मधु मंगेश कर्णिक, मा. अनिल अवचट, डॉ. राजन गवस, प्रा. डॉ. रवींद्र शोभणे, विश्वास पाटील आदी मान्यवरांना मिळाला आहे. फेब्रुवारी २०१२ मध्ये या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

*** यश चोप्रा यांना संत नामदेव पुरस्कार प्रदान**

'चित्रपटांचा मोठा प्रभाव असून समाजातील बिघडलेल्या नीतिमूल्यांना सुधारण्याचे काम चित्रपटांसारख्या प्रभावी माध्यमातून केले जावे,' अशी अपेक्षा केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केली.

सरहद संस्थेच्या वतीने संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट निर्माते दिग्दर्शक यश चोप्रा यांना प्रदान करण्यात आला. एक लाख एक हजार रुपये, पगडी असे या पुरस्काराचे स्वरूप होते. पुण्याचे महापौर मोहनसिंग राजपाल, पिंपरीचे महापौर योगेश बहल, सरहदचे डॉ. एम.यू.रहमान, धर्मेंद्रसिंग घई, भारत देसरडा, संतसिंग मोखा आदी उपस्थित होते.

'संत नामदेव यांनी पंढरपूर ते पंजाब असा प्रवास करीत वारकरी संप्रदायाची विचारधारा पंजाबमध्ये रुजविलीच नाही तर त्या विचारप्रणालीने धर्मग्रंथामध्ये जागा घेतली. त्याचप्रमाणे यश चोप्रा यांनीही समाजाला प्रत्येक वेळी चांगला संदेश देण्याचे काम चित्रपटांच्या माध्यमातून केले आहे. समाज बदलला त्याप्रमाणे चित्रपटही बदलले. चित्रपटांच्या चंदेरी दुनियेला चांगले नेतृत्व यशजींनी दिले. महाराष्ट्राच्या दृष्टीने ही अभिमानाची गोष्ट आहे.' अशा शब्दांत शिंदे यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय नहार, सूत्रसंचालन सुधीर गाडगीळ यांनी केले.

'आपली जन्मभूमी पंजाब, मातृभूमी भारत आणि कर्मभूमी महाराष्ट्र असून

पंजाबी असल्याचा आपल्याला अभिमान आहे. चित्रपटांतून पंजाबची संस्कृती, परंपरा, जीवन, रीतिरिवाज दाखविण्याचा प्रयत्न आपण कधी केला नाही, तर तो आपल्यामध्ये पुरेपूर भरला असल्याने तो आपोआपच चित्रपटांमध्ये येतो. महाराष्ट्रातील लता मंगेशकर, व्ही. शांताराम यांच्यामुळे आपण चित्रपट क्षेत्रात शिखरावर पोहोचू शकलो,' असे चोप्रा म्हणाले.

*** 'इन्फोसिस' पुरस्कार**

इन्फोसिस सायन्स फाउंडेशनने 'इन्फोसिस' पुरस्कार जाहीर केले असून यामध्ये प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ रघुराम जी. रंजन यांच्यासह सहा जणांचा समावेश आहे.

अभियांत्रिकी, संगणक, विज्ञान, जीवशास्त्र, गणिती विज्ञान, भौतिकशास्त्र आणि सामाजिकशास्त्र या विषयांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी इन्फोसिस पुरस्काराने गौरविण्यात येते.

अभियांत्रिकी आणि संगणक विज्ञान विभागात प्रा. कल्याणमय देव, जीवशास्त्र विभागात डॉ. इमरान सिद्दिकी, गणिती विज्ञान विभागात प्रा. कानन सुंदरराजन, भौतिकशास्त्र विभागात प्रा. श्रीराम रामस्वामी, सामाजिक शास्त्र विभागात डॉ. प्रताप भानू मेहता यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कारांसाठी परीक्षक म्हणून प्रा. अमर्त्य सेन, प्रा. श्रीनिवास कुलकर्णी, प्रा. प्रदीप के. खोसला, प्रा. एस. आर. वर्धन, प्रा. इंदर वर्मा यांनी काम पाहिले. या पुरस्काराचे स्वरूप ५० लाख रुपये, सुवर्णपदक आणि प्रशस्तिपत्रक असे आहे. पुरस्काराचे वितरण ९ जानेवारी रोजी इन्फोसिसमध्ये माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते होणार आहे.

*** डॉ. मोहन आगाशे यांना जीवनगौरव पुरस्कार**

"अभिनयाने माणूस जेवढा सुसंस्कृत होतो तेवढा कशानेही होत नाही. त्यामुळे कलाकाराने आपल्या अभिनय कलेच्या माध्यमातून समाजाला सुसंस्कृत करण्याचे प्रयत्न सुरू ठेवावेत," अशी अपेक्षा ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केली.

रंगभूमी दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुणे शाखेतर्फे ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांना जयंतराव टिळक स्मृती जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक, विश्वस्त विष्णुपंत मेहेंदळे, नाट्य परिषदेचे शाखाध्यक्ष डॉ. सतीश देसाई आणि उपाध्यक्ष शशिकांत कुलकर्णी या प्रसंगी व्यासपीठावर होते. आगाशे यांनी पुरस्काराचे २५ हजार रुपये पडद्यामागच्या रंगकर्मींसाठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेकडे सुपूर्त केले.

लागू म्हणाले, ‘‘शांतपणे काम करीत राहणारी जी थोडी माणसे आहेत त्यामध्ये आगाशे यांचे नाव घ्यावे लागेल. कोणताही अतिरेक न करता नाटकाचा आशय लोकांच्या गळी उतरवणे हे अभिनेत्याचे काम असते. हे कार्य निष्ठापूर्वक आणि जबाबदारीने करतात तेच मोठे नट या पदवीला पात्र ठरतात. बाकी नुसतेच नट असतात. चांगला नट आयुष्यालाच अभिनय समजतो. अंगातील कलेचा पाठपुरावा जन्मभर करत राहणे, हे ध्येय कलाकाराने ठेवले पाहिजे.’’

आगाशे म्हणाले, ‘‘पुरस्कार का मिळतात आणि का मिळत नाहीत याची कोणतीही उत्तरे नाहीत. मिळाले तर तसेच ते स्वीकारावेत या मताचा मी आहे. ‘तुका म्हणे आता उरलो पुरस्कारापुरता’ असे होऊ नये. चांगली नाटके आणि चित्रपटांतून भूमिका मिळाव्यात. सध्याच्या काळातसुद्धा चांगल्या भूमिका मिळाव्यात ही देवाचरणी प्रार्थना करतो. पण डॉक्टरांचा देवावर विश्वास नसल्यामुळे ही प्रार्थना त्यांच्याच चरणी करतो.’’

या वेळी पुष्पा पालेकर, सुमित्रा रेगे, पुष्पा जबडे, नंदा गोखले, चित्राबाई शेरेकर यांना माता जानकी पुरस्कार; मंजूषा जोशी यांना प्रपंचलक्ष्मी पुरस्कार; राघवेंद्र कडकोळ आणि लतिका कडकोळ यांना लक्ष्मी-नारायण पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. देसाई यांनी प्रास्ताविक केले.

*** पाडगावकर, दाते यांना कलागौरव पुरस्कार**

‘कलारंग सांस्कृतिक कलासंस्थे’तर्फे दिला जाणारा यंदाचा ‘कलारंग कलागौरव पुरस्कार’ ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर, प्रसिद्ध गायक अरुण दाते, ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे, चित्रपट दिग्दर्शक राजदत्त आणि ज्येष्ठ अभिनेत्री लीला गांधी यांना जाहीर झाला आहे.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. ‘सिम्बायोसिस’चे संस्थापक अध्यक्ष डॉ. शा.ब. मुजुमदार प्रमुख पाहुणे होते.

यावेळी कलोपासक संगीत अकादमीचे पं. पद्माकर कुलकर्णी, नंदकिशोर कल्चरल अकादमीचे डॉ. नंदकिशोर कपोते, नादब्रह्म परिवाराचे डॉ. रवींद्र घांगुर्डे व वंदना घांगुर्डे, गीता डान्स क्लासेसच्या गीता शर्मा, नृत्य कला मंदिराच्या तेजश्री अडिगे, पिंपरी-चिंचवड संगीत कला अकादमीचे समीर सूर्यवंशी यांनाही सम्मानित करण्यात येणार आहे.

*** कोणाची नक्कल करीत नसल्यानेच लता व आशा मोठ्या आहेत - देव**

लता मंगेशकर व आशा भोसले या दोघींची आपापली स्वतंत्र शैली आहे. कोणाची नक्कल करीत नसल्यामुळेच त्या मोठ्या आहेत, असे मत ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांनी व्यक्त केले. दुसऱ्यासारखे होऊन कोणी मोठे होत नाही,

असेही ते म्हणाले.

पुणे महापालिका व साहित्यिक कलावंत प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अकराव्या साहित्यिक कलावंत संमेलनात यशवंत देव व ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर पानतावणे यांच्या हस्ते 'वाग्येज्ञ साहित्य व कलागौरव पुरस्कार' देण्यात आला. त्यावेळी देव बोलत होते.

संगीतकार या नात्याने तुम्हाला लता व आशा यांच्यापैकी कोण आवडते, असा प्रश्न कार्यक्रमाचे सूत्रसंचालक अरुण नूलकर यांनी देव यांना विचारला असता, 'काहीही उत्तर दिले, तरी मी संकटातच,' असे सांगत देव यांनी दोघींच्या गायकीचे काव्यात वर्णन केले. लता ही लतासारखी आणि आशा ही आशासारखीच गाते. त्या कोणाची नक्कल करीत नसल्याने मोठ्या आहेत, असे ते म्हणाले. वेशाची नक्कल होते, आवेशाची नक्कल होऊ शकत नाही. गायन हे पुस्तकात शास्त्र असले, तरी ती कलाच आहे, असेही देव म्हणाले.

पानतावणे म्हणाले, कर्णिक हे जीवनसत्याचा वेध घेणारे लेखक आहेत. त्यांनी नैतिकतेचे मूल्य जपले आहे. शब्दांना सुरात भिजविणारे प्रतिभावंत स्वरयोगी म्हणजे यशवंत देव. परंपरा व नवता याचा मेळ त्यांच्या संगीतात आहे. कर्णिक म्हणाले की, पुण्यनगरीत कलाकार व साहित्यिकांचा योग्य सन्मान होतो.

*** खुरटे अनुभव अन् नोबेल पुरस्कार**

ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर पानतावणे यांनी लेखकाच्या अनुभव समृद्धतेबाबत यावेळी भाष्य केले. ते म्हणाले की, लेखकाला जीवनाच्या तळाशी जावे लागते. खुरट्या अनुभवांवर केलेल्या लेखनाला नोबेल पुरस्कार मिळत नाही. वेदना पकडण्यासाठी लेखकामध्ये अनुभवाचे साधन असावे लागते. त्याचप्रमाणे समीक्षकाला पहिल्यांदा लेखक व्हावे लागते. लेखकाच्या अनुभवांशी जवळीक साधावी लागते.

*** दमाणी साहित्य पुरस्कार जाहीर**

मराठी साहित्यातील प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'भैरूरत्न दमाणी साहित्य पुरस्कार' न्या. नरेंद्र चपळगावकर (औरंगाबाद), कवी नागराज बाबूराव मंजुळे (पुणे) व लेखिका मोनिका गजेंद्रगडकर (मुंबई) यांच्या साहित्यकृतींना जाहीर झाला आहे.

नरेंद्र चपळगावकर यांचे 'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ' हे वैचारिक साहित्य (मौज प्रकाशन, मुंबई), कवी नागराज मंजुळे यांचा 'उन्हाच्या कटाविरुद्ध' हा काव्यसंग्रह (माइंड ॲन्ड मीडिया प्रकाशन, पुणे) व मोनिका गजेंद्रगडकर यांचा 'शिल्प' हा कथासंग्रह (मौज प्रकाशन, मुंबई) या साहित्यकृतींना दमाणी साहित्य पुरस्कार दिला जात असल्याची माहिती पुरस्कार समितीचे संस्थापक

नवरतन दमाणी यांनी दिली. प्रत्येकी २५ हजार रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याशिवाय सोलापूरचे कवी डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या 'कविराय राम जोशी' या कादंबरीला (पद्मगंधा प्रकाशन, पुणे) विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असल्याचे दमाणी यांनी जाहीर केले. अकरा हजार रूपये रोख स्मृतीचिन्ह, शाल व श्रीफळ असे या विशेष पुरस्काराचे स्वरूप आहे. १६ डिसेंबर रोजी भैरूरतन दमाणी यांच्या स्मृतिदिनी हा पुरस्कार वितरण सोहळा हुतात्मा स्मृतिमंदिरात संपन्न झाला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचे प्रबळ दावेदार तथा ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते व केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरित करण्यात आला.

*** ज्ञानेश्वर मुळे यांना राष्ट्रीय विश्वरत्न पुरस्कार**

विश्वात्मा फाऊंडेशनतर्फे देण्यात येणारा 'राष्ट्रीय विश्वरत्न पुरस्कार' यंदा भारताचे मालदीवमधील उच्चायुक्त आणि प्रसिद्ध साहित्यिक ज्ञानेश्वर मुळे यांना प्रदान करण्यात आला.

१६ नोव्हेंबर रोजी बालगंधर्व रंगमंदिरामध्ये फादर फ्रान्सिन दिब्रिटो, डॉ. के. एच. संचेती, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश धोंगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या विशेष कार्यक्रमामध्ये मुळे यांना हा पुरस्कार दिला गेला. यावेळी दीपक आसेगावकर, विजय पवार, रमेश बुधावले, शैलेंद्र म्हसकर, वैकुंठ कुंभार, विनीता आपटे, डॉ. के.व्ही. पाठक आणि अमित गोरखे यांना राज्यस्तरीय विश्वरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच 'आई' विषयावरील अकरा हजार एकशे अकरा कवितांचा संग्रह असणाऱ्या खंडाचे प्रकाशन करण्यात आले.

*** गदिमा पुरस्कार**

प्रसिद्ध अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना यंदाचा गदिमा पुरस्कार जाहीर झाला असून गृहिणीसाठी सचिव पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री लालन सारंग यांना देण्यात आला.

यंदाचा गदिमा स्नेहबंध पुरस्कार स्वातंत्र्य सैनिक आणि शिक्षणतज्ज्ञ रावसाहेब शिंदे यांना तर चैत्रबन पुरस्कार लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांना देण्यात आला. तसेच दहावीच्या परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविलेल्या मोक्षा चौधरी हिचा गदिमा पारितोषिकाने गौरव करण्यात आला.

१४ डिसेंबरला गदिमांच्या स्मृतिदिनी टिळक स्मारक मंदिर येथे पुरस्कारांचे वितरण झाले. यावेळी चित्रपटनिर्माते रवींद्र जोशी यांनी 'माझ्या आवडीची गदिमा गीते' हा कार्यक्रम सादर केला.

*** सुधीर गाडगीळ यांना 'जिंदादिल पुरस्कार'**

ज्येष्ठ निवेदक आणि लेखक सुधीर गाडगीळ यांना रंगत-संगत प्रतिष्ठान आणि साहिल फाऊंडेशनतर्फे देण्यात येणारा 'जिंदादिल पुरस्कार' जाहीर झाला. गाडगीळ यांना पत्रकारिता, निवेदन आणि मुलाखती तसेच लेखनाच्या क्षेत्रामध्ये त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल हा सन्मान लाभला आहे.

२१ नोव्हेंबर रोजी एस.एम.जोशी फाऊंडेशनच्या सभागृहामध्ये ज्येष्ठ उद्योजक आणि कामत ग्रुप ऑफ हॉटेल्सचे चेअरमन विठ्ठल कामत यांच्या हस्ते गाडगीळ यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि रोख ५ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

*** सुधीर मोघे यांना पुरस्कार प्रदान**

''केशवसुतांच्या कवितांमुळेच आजच्या लेखक, कवींचे भरणा-पोषण झाले. आम्ही सर्व त्यांचेच वंशज आहोत. यापुढेही नभात चंद्र-सूर्य असेपर्यंत केशवसुत प्रत्येकाच्या श्वासोच्छ्वासात भरून राहतील,'' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी केले.

दामले कुटुंबीयातर्फे आयोजित समारंभात कवी सुधीर मोघे यांना प्राचार्य मुकुंद दातार यांच्या हस्ते कविवर्य केशवसुत स्मृती काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी कर्णिक यांनी केशवसुतांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. राजाभाऊ दामले या प्रसंगी उपस्थित होते.

कर्णिक म्हणाले, ''साहित्य संमेलनाचा अध्यक्ष असताना केशवसुतांचे स्मारक बांधण्याची घोषणा केली. त्याप्रमाणे मालगुंड येथे हे स्मारक उभे करता आले. अशी भव्य स्मारके इतरत्र कोठेही नाहीत. खरे तर ही स्मारके राज्याची ऐतिहासिक गरज आहेत.'' मोघे म्हणाले, ''केशवसुतांची कविता विलक्षण अनुभव, दूरदृष्टी, आत्मविश्वास आणि ठाम विचार देणारी आहे. त्यांच्यामुळेच माझ्या लेखनामागील भावनिक, वैचारिक बैठक पक्की झाली. त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळत असल्याने आजचा दिवस भाग्याचा आहे.'' दातार म्हणाले, ''आधुनिक मराठी कविता ही केशवसुतांची देणगी आहे. त्यांच्या कवितांत नवा आचार, विचार, उच्चार आहे.'' केशवसुतांच्या कवितांवर आधारित मैफलीने समारंभाचा समारोप झाला.

*** जयमाला शिलेदार यांना गौरवनिधी प्रदान**

''संगीत नाटक हेच शिलेदार कुटुंबीयांसाठी 'जीवन' आहे... या नाटकांमुळेच जीवन समृद्ध झाले... संगीत नाटकांविषयी पाहिलेली अनेक स्वप्नेही सत्यात उतरवता आली... या सर्व घटनांचे, वाटचालीचे साक्षीदार आपण सर्व रसिक आहात', अशा भावना ज्येष्ठ गायिका जयमाला शिलेदार यांनी व्यक्त केल्या.

संगीत रंगभूमीवरील आजवरच्या वाटचालीनिमित्ताने जयमालाताईंना मित्र

फाऊंडेशनतर्फे सुमन किर्लोस्कर यांच्या हस्ते १० हजार रुपयांचा गौरवनिधी प्रदान करण्यात आला. यावेळी जयमालाताईंचे भाषण त्यांच्या कन्या दीप्ती भोगले यांनी रसिकांना वाचून दाखवले. या वेळी गायिका कौशिकी चक्रवर्ती आणि फाऊंडेशनचे धनंजय गोखले उपस्थित होते.

जयमालाताई यांनी सांगितले की, रसिकांची कृपा असेल तरच कलावंताला उभारी मिळते, म्हणूनच मी सर्व रसिकांची ऋणी आहे. संगीत नाटकात अवर्णनीय सौंदर्य आहे. आयुष्यात नेहमी मी या सौंदर्याचाच विचार केला. दरम्यान, पुण्यात गाणे सादर करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी प्रेरणा असते, असे सांगत कौशिकी चक्रवर्ती यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण गायनाने रसिकांची मने जिंकली. ❐





**आगामी**

**असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे**

**ए.जी. कृष्णमूर्ती**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

१००रु. पोस्टेज २०रु.

सूत्र १ : स्वप्न पाहा. भव्य स्वप्न पाहा...
सूत्र २ : तुमच्या उद्योगात प्रवीण बना
सूत्र ३ : सकारात्मक बना
सूत्र ४ : मी हे करू शकतो / शकते
सूत्र ५ : पैसा हे जोडउत्पादन आहे
सूत्र ६ : तुमच्या स्वप्नावर पकड मिळवा
सूत्र ७ : तुमच्या 'टीम'च्या भरवशावर धोके पत्करा
सूत्र ८ : आव्हानांचं स्वागत करा
सूत्र ९ : प्रत्येकाची भरभराट झाली पाहिजे
सूत्र १० : आयुष्य फक्त एकदाच मिळते




# श्रीमंत लोकांचे पाच नियम

एखाद्या नव्या कल्पनेच्या बळावर अचाट यश आणि वैभव मिळवणे अवघड नाही असा आश्वासक संदेश देणारे पुस्तक




मूळ लेखक **डॉ. सुधीर दीक्षित** /अनुवाद **प्रशांत तळणीकर**

२९०रु. - सभासदांना सवलतीत

डॉ. सुधीर दीक्षित यांनी लिहिलेल्या 'अमीरों के पाँच नियम' या हिंदी पुस्तकाचे प्रकाशन भोपाळच्या मंजुळ पब्लिशिंग हाऊसने केले. त्याचे चांगले स्वागत झाले. त्याचाच मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसद्वारे नुकताच बाजारात आला आहे.

श्रीमंत होण्याची, खूप संपत्ती मिळवण्याची, सर्वांगीण यश मिळवण्याची आकांक्षा नसणारी व्यक्ती क्वचितच सापडेल. ही आकांक्षा सर्वच व्यक्तींची पूर्ण होते असे नाही; ज्यांची पूर्ण होते त्यांच्या भाग्याचा सर्वांनाच हेवा वाटतो. श्रीमंतीसाठी भाग्य लागते; नशीब लागते असे म्हणून आपल्या नशिबाला दोष देणारे लोकही दिसतात. खूप कष्ट करणारी, परिश्रम करणारी लाखो माणसे जन्मभर जेमतेम पोटापुरते मिळवून कसाबसा संसाराचा गाडा रेटतात; तर फारसे कष्ट न करणारी काही माणसे अल्पावधीत अब्जाधीश म्हणून मिरवू लागतात. पेट्रोलपंपावर कारकून म्हणून नोकरी करणारा कोणी धीरूभाई पंचवीस वर्षांत भारतातील अग्रगण्य उद्योगपतींच्या पंगतीत स्थानापन्न होतो; बायकोचे दागिने विकून आलेले दहा हजार रुपये भागीदारीसाठी आपला हिस्सा म्हणून देणारा कोणी नारायणमूर्ती पंधरा-वीस वर्षांत भारतीय आयटी क्षेत्राला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवून देऊन आपल्या भागधारकांनाही लक्षाधीश-कोट्यधीश बनवतो... अशा यशोगाथा बघायला मिळतात तेव्हा त्या अनेकांना प्रेरणाही देतात. श्रीमंत होण्याचा काही मंत्र अशा यशस्वी व्यक्तींच्या जीवनानुभवातून मिळतो का असाही शोध घ्यावासा वाटतो. श्रीमंतीत नशिबाचा भाग असतो हे खरे असले तरी मानवी प्रयत्नाचा, मानवी बुद्धीचा, नवे काही करण्याचा, कल्पकतेचा भागही मोठा असतो हेही अनेक श्रीमंतांच्या अनुभवांवरून लक्षात येते. आणि अशा व्यक्तींच्या अभ्यासातून काही समान, समाईक सूत्रे सापडतात का याचा मागोवा घेण्याचाही प्रयत्न करणारे अनेक अभ्यासक पुढे येतात.

डॉ. सुधीर दीक्षित यांच्या मते, श्रीमंत होण्याची इच्छा असेल तर श्रीमंत बनण्याचे नियमही जाणून घेणे आवश्यक असते. गणित विषयात पारंगत व्हायचे असेल तर आपण गणिताचे सिद्धान्त आत्मसात करतो; तसेच श्रीमंतीचे काही सिद्धान्तही आत्मसात केले तर आपली श्रीमंतीची स्वप्ने बघणे रास्त ठरेल. त्याचबरोबर त्यांचा असा ठाम विश्वास आहे की आपल्यापैकी प्रत्येकाला श्रीमंत होता येईल. आपली सद्य:स्थिती कितीही वाईट असली तरी निराश वा हताश व्हायचे कारण नाही. अनेक धनिकांच्या जीवनकथांचा अभ्यास करून त्यांनी श्रीमंतीला उपयुक्त ठरणारे पाच नियम शोधून काढले आणि या पाच नियमांचा पाठपुरावा केला तर कोणाही व्यक्तीला पैसे मिळवता येतील असे

त्यांचे पक्के मत बनले.

हे पाच नियम पुढीलप्रमाणे :

१. नावीन्यपूर्ण काम करणे.

२. धोका पत्करणे.

३. अडचणींना न घाबरणे

४. मोठी स्वप्ने पाहणे.

५. दीर्घ पल्ल्याचा विचार करणे.

नावीन्यपूर्ण काम करणे, नवीन कल्पना सुचणे आणि ती प्रत्यक्षात आणणे हे श्रीमंत बनण्याच्या दिशेने टाकलेले पहिले आणि निर्णायक पाऊल आहे. मजकुराच्या प्रती काढणे (झेरॉक्स मशीन), पुस्तके ऑनलाइन विकणे (ॲमेझॉन डॉट कॉम), संगणकासाठी ऑपरेशन सिस्टिम-सॉफ्टवेअरची निर्मिती (मायक्रोसॉफ्ट), पिझ्झा घरपोच पोचवणे (पिझ्झा हट), सोशल नेटवर्किंग (फेसबुक) अशा नावीन्यपूर्ण कल्पना राबणाऱ्या उपक्रमांना आणि उद्योगांना जगभर मान्यता मिळाली. त्यांची तुफान विक्री झाली. निर्मात्यांना आणि उत्पादकांना भरपूर कमाई झाली. तसे पाहिले तर आपल्या सर्वांनाच नवनव्या कल्पना सतत सुचत असतात; परंतु त्यांचा पाठपुरावा आपण करीत नाही. त्यासाठी वेळ देत नाही. त्यासाठी धोका पत्करत नाही. त्या कल्पनेचा उपयोग व्यापक प्रमाणात भविष्यकाळात कसा फलदायी ठरेल याचा मागोवा घेत नाही; त्या कल्पनेला व्यावसायिक स्वरूप देण्याएवढा आत्मविश्वास आपल्याला नसतो तसेच त्या नव्या कल्पनेवर लोकांची बरीवाईट मते किंवा टीकाटिपणी ऐकून आपण कच खातो आणि त्या कल्पनेला मूर्त रूप देण्याचे टाळतो. ज्या व्यक्ती आपल्याला सुचलेल्या कल्पनेला लोकांच्या विशिष्ट समस्येवरचा तोडगा म्हणून व्यावहारिक पातळीवर आणतात, त्या व्यक्ती त्या त्या क्षेत्रावर आपला प्रभाव पाडतात आणि अर्थार्जनही करून श्रीमंत होतात.

आपल्या नावीन्यपूर्ण कल्पनेला वास्तवात आणताना कमी जास्त धोका पत्करावा लागतोच. घराघरात वीज पोचावी, दिव्यांनी प्रत्येक घर उजळून निघावे ही कल्पना सुचल्यावर एडिसनने विजेचा बल्ब तयार करण्यासाठी प्रयोग सुरू केले. बल्बमध्ये दीर्घकाळ जळून प्रकाश देणारी फिलामेंट शोधण्यासाठी हजारावर वस्तू वापरून बघितल्या. गावातील एखादा रस्ता अशा दिव्यांनी प्रकाशमय करण्यासाठी विद्युत वितरणाची यंत्रणा उभारणे हे खर्चिक काम होते. बँका व वित्तपुरवठादार त्यात गुंतवणूक करायला तयार नव्हते. लोकांचाही या कल्पनेवर विश्वास नव्हता. परंतु न्यूयॉर्कच्या पर्ल स्ट्रीटवर शेकडो बल्ब प्रकाशमान

करून एडिसनने आपल्या कल्पनेचे प्रात्यक्षिक दाखवले, तेव्हा लोकांचा विश्वास बसला. जनरल इलेक्ट्रिक कंपनीची स्थापना झाली. बँका मदतीसाठी पुढे आल्या. एडिसनने बल्ब बनवूनच समाधान मानले असते तर सार्वजनिक रस्त्यांवर दिवे लागण्याचा योग कधी आला असता, त्यात किती काळ गेला असता हे सांगणे कठीण ठरले असते. बिल गेट्सने संगणकांची ऑपरेटिंग सिस्टिम तयार करण्याची कल्पना सुचल्यावर कॉलेज शिक्षण अर्धवट सोडून त्या कल्पनेचा पाठपुरावा केला. कोणी नोकरी सोडते, कोणी आर्थिक धोका पत्करते, कोणी टीका सहन करते, कोणी अपयशाला तोंड देते - हे धोके पत्करण्याची तयारी जे दाखवतात ते शेवटी यशस्वी होतात. कधी कधी अपयश येते, नुकसान होते, प्रयोग अंगलट येतो; पण अपयशातून पुढे यशाचा मार्ग दिसतो. धोका स्वीकारण्याची तयारी यशाचा मार्ग प्रशस्त करते.

श्रीमंत होण्याचा तिसरा नियम म्हणजे ‘अडचणींना ना घाबरणे. अडचणी सर्वांनाच येतात. त्या अडचणीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न यशाकडे नेतो; श्रीमंतीकडे नेतो. एका व्यक्तीची अडचण ही दुसऱ्या व्यक्तीची व्यवसाय संधी ठरू शकते.

प्रत्येक अडचण म्हणजे संधी आहे. सत्कारात्मक धोरण ठेवले तर यशाचे नवनवे मार्ग दिसू लागतात. त्यामुळे अडचणींना तोंड देण्यासाठी सज्ज रहायला हवे. वय, आर्थिक स्थिती, शिक्षण किंवा आरोग्य यांच्या सबबी सांगून आधीपासूनच कच खाऊ नका. विरोध झाला तरी धीर सोडू नका. आपल्याला जे ध्येय किंवा उद्दिष्ट साध्य करायचे आहे त्यावर दृढ राहा. त्याबद्दल विश्वास बाळगा.

श्रीमंत लोकांचा चौथा नियम - मोठी स्वप्ने बघा. मोठ्या योजना हाती घ्या. व्यवसायाचा विस्तार करा. स्वप्नं तर सर्वच लोक पाहतात. पण यशस्वी व्यक्ती मोठी स्वप्ने बघतात. अयशस्वी व्यक्तींची स्वप्ने छोटी असतात. त्या स्वप्नांकडेही पाहताना त्यांची वृत्ती नकारात्मक असते. त्या स्वप्नांवर त्यांचा विश्वास नसतो. अडचणींचा बाऊ करणारे लोक आपली स्वप्ने पूर्ण होतील, या विषयी सतत साशंकच असतात. त्यांच्या सुप्त मनात त्या स्वप्नाचे बीजारोपण कधी होतच नाही. स्वप्ने साकार करण्यासाठी कष्ट घ्यावे लागतात. मानसिक बळ लागते. यशाचा आरंभ स्वप्नापासून होतो. स्वप्न जेवढं भव्य तेवढं यशही भव्य. जगातल्या सर्वच्या सर्व संगणकामध्ये आपले सॉफ्टवेअर वापरले जाईल असे स्वप्न बिल गेट्सने बघितले. ते त्याने प्रत्यक्षात आणले. वीस वर्षांत अमेरिकेतील सर्वांत श्रीमंत व्यक्ती बनण्याचे भाग्य त्याला लाभले. आपल्या कारखान्यातला कामगारही आपल्या कारमधून कामाला यायला हवा असे स्वप्न हेन्री फोर्डने

बघितले. कामगारालाही परवडेल अशा किमतीत टी-मॉडेल तयार केले. अमेरिकेतील प्रत्येक घरात आज कार आहे; प्रत्येक प्रौढ व्यक्तीकडे कार आहे.

स्वप्नाच्या जोडीला दृढविश्वास, निश्चय आणि चिकाटी हवी. भविष्यावर नजर हवी.

अडचणी, टीका, अपयशाचे भय, आप्तस्वकीयांचा विरोध या सर्वांवर मात करून आपली स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावा. यश तुमचेच आहे.

श्रीमंत लोकांचा पाचवा नियम - दीर्घ पल्ल्याचा विचार करा. आज आंब्याचे झाड लावले तर मला लगेच फळे खायला मिळणार नाहीत. परंतु पाचदहा वर्षांनी निश्चित आंबे मिळतील. आज झाडे लावण्याचे टाळले तर काही वर्षांनी फळे मिळण्याची अशाच बाळगता येणार नाही. आज एक बी लावा, जोपासना करा. निसर्ग शंभरपट फळे देईल. हा कर्मफळ सिद्धान्त, कार्यकारणभाव सिद्धान्त लक्षात ठेवा. दीर्घकालीन योजना आखा. अल्पकालीन, संकुचित, साचेबंद विचार ठेवू नका. ज्यांना दीर्घ पल्ल्याचा विचार करता येतो त्यांनाच भव्यदिव्य यशाची प्राप्ती होते.

दीर्घकालीन विचार करताना संभाव्य अडचणी आणि संभाव्य शक्यता यांचीही काळजीपूर्वक चाचपणी करणे श्रेयस्कर ठरते. तात्पुरते नुकसान वा अपयश पचवून भावी फायद्याची व्यूहरचना करावी लागते. क्षणिक प्रलोभनांना भुलून न जाता अंतिम उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी सर्व शक्ती एकवटावी लागते.

या पाच नियमांमध्ये तसे काही वेगळे वा नवे नाही. व्यावहारिक शहाणपणाचा हा एक भाग आहे.

या पुस्तकाचे खरे वैशिष्ट्य म्हणजे या पाच नियमांचे अनुसरण ज्यांच्या जीवनात दिसते अशा नामवंत, श्रीमंत, यशस्वी व्यक्तींचे या पुस्तकात देण्यात आलेले छोटेखानी परंतु प्रेरणादायक परिचय. सुमारे शंभर व्यक्तीचे हे संदर्भ खूपच मानसिक बळ वाढविणारे, साशंकतेचा अंध: कार दूर करून योग्य मार्ग दाखवणारे जणू दीपस्तंभ आहेत. या व्यक्तींनी कोणत्या नवीन कल्पनांचा पाठपुरावा केला, कोणते धोके पत्करले. अडचणीतून कसा मार्ग काढला, कोणती मोठी स्वप्ने बघितली, दीर्घ पल्ल्याचा विचार करताना अल्पकालीन फायद्याचे मोह कसे टाळले हे स्पष्ट केले आहे. गेल्या शतकातील आणि समकालीनांमधील बहुतेक उद्योग-विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या या यशोगाथा आहेत. बिल गेट्स (मायक्रासॉफ्ट), जेफ बेजोस (ॲमेझान डॉट कॉम), स्टीव्ह जॉब्ज (ॲपल), मायकेल डेल (डेल), गॉर्डन मूर (इंटेल),

पियर ओमिदयार (ई-बे), जिम क्लार्क (नेटस्केप, एसजीआय), सर्जी ब्रिन व लॅरी पेज (गुगल), सबीर भाटिया (हॉटमेल), लॅरी एलिसन (ओरॅकल), एन. आर. नारायणमूर्ती (इन्फोसिस), अझीम प्रेमजी (विप्रो), राजेश हुक्कू (आयफ्लेक्स) यांनी संगणक, इंटरनेट, आयपॉड, आयफोन, ई बुक, ई-मेल, ई-बँकिंग वगैरेंच्या क्षमता दाखवल्या आणि आपल्या दैनंदिन जीवनाला अधिक सुकर, सुखद बनवले.

आयटी क्षेत्राप्रमाणेच इतरही अनेक क्षेत्रात अनेक प्रतिभावंतांनी मोलाचे योगदान केले. एडिसनने विजेचा दिवा बनवून मानव जातीला अंधारयुगातून प्रकाशयुगात आणले. हेन्री फोर्डने सुलभ वाहतुकीसाठी 'कार'सारखे साधन असेंब्ली लाइनद्वारे सर्वसामान्यांना परवडेल इतके स्वस्त केले. होंडाने मोटारसायकलच्या क्षेत्रात क्रांती केली. बोईंगने विमानाची क्षमता वाढवून हवाई प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ बनवला. अलेक्झांडर ग्रॅहॅम बेलने टेलिफोनद्वारे संपर्काचे एक सोयीस्कर साधन माणसाला मिळवून दिले. फ्रेड स्मिथने ओव्हर नाइट पॅकेज डिलिव्हरी सेवा सुरू करून टपाल-पार्सल वितरण व्यवस्थेला गतिमान बनवलं. हे बिट वॅलेसने रीडस डायजेस्टद्वारे उत्तम लेख व पुस्तके सारांश रूपात वाचकांना उपलब्ध करून दिले, हेन्री ल्युसने टाइम, लाइफ सारखी सर्व विषयांचा स्पर्श करणारी नियतकालिके सुरू केली, ह्युज 'हफनरने प्लेबॉय मासिक आणि प्लेबॉय क्लब्ज काढून स्त्री-पुरूष सौंदर्य आणि संबंध यांच्या भोवती असणारे गुप्ततेचे वलय दूर केले. अनिता रॉडियने द बॉडी शॉप दुकानांची साखळी सुरू करून सौंदर्य प्रसाधनांच्या विक्रीला चालना व प्रतिष्ठा दिली. फ्रँक वूलवर्थने रिटेल स्टोअर्सची मालिका उघडून अमेरिकेतील ग्राहकांपुढे जागतिक उत्पादनांचे भांडार खुले केले. मॅडम सी. जे. वॉकरने कृष्णवर्णीय महिलांसाठी सौंदर्य प्रसाधने तयार करून त्यांचा आत्मसन्मान वाढवला. जॉन एच. जॉन्सन याने कृष्णवर्णीयांसाठी निग्रो डायजेस्ट हे पाहिले अमेरिकन मासिक सुरू करून कृष्णवर्णीयांच्या सर्वात मोठ्या प्रकाशन संस्थेची उभारणी केली. टॉमस बॅरेलने कृष्णवर्णीयांसाठी पहिली देशव्यापी जाहिरात एजन्सी सुरू केली. एकेका कल्पनेतून अशी औद्योगिक साम्राज्ये उभी राहिली, आणि त्यांनी त्या कल्पनेच्या धन्याला अब्जाधीशांच्या पंक्तीत नेऊन बसवले.

श्रीमंत लोकांच्या प्रभावशाली वर्तुळात जायची प्रेरणा देणारे हे पुस्तक अग्रगण्य जागतिक उद्योजकांच्या मानसिकतेची झलक पेश करत आपल्या मनोभूमिकेचा ताबा देऊ शकले तर आपल्या आकांक्षांना गगनही ठेंगणे वाटेल.

❐




# द सिक्स व्हॅल्यू मेडल्स

एकविसाव्या शतकातील प्रचंड स्पर्धेच्या झंझावातात कोणताही निर्णय घेताना मूल्यभाव जागृत ठेवणारी सहा पदकांची आशयधन संकल्पना




मूळ लेखक **एडवर्ड डी बोनो** /अनुवाद **सुभाष जोशी**

१२०रु. - सभासदांना सवलतीत

कुठल्याही क्रीडा स्पर्धेत प्रथम येणाऱ्याला सुवर्ण पदक, द्वितीय क्रमांकाला रौप्यपदक, तृतीय क्रमांकाला ब्रॉंझ पदक देण्यात येते हे आपल्याला ठाऊक असते. उत्तम कामगिरीबद्दल होणारा हा गौरव असतो. कुठल्याही स्पर्धेत उत्कृष्ट यश मिळवण्यासाठी खूप पूर्वतयारी,अभ्यास,सराव, नैपुण्य,चमकाई यांची गरज असते.

लढाईच्या काळात रणांगणावर शौर्य आणि पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकांना विशिष्ट सेवापदके देण्यात येतात. ती पदके म्हणजे पराक्रमाची जणू पावती असते.

पदकामुळे त्या सैनिकाच्या दर्जात फरक पडतो किंवा आर्थिक लाभ होतो असे नाही; पण त्याद्वारे आपल्या कौशल्याचा, धैर्याचा गौरव होतो. आपल्या आयुष्यातील तो एक अभिमानाचा टप्पा असतो.

विशिष्ट क्षेत्रातील उच्च कामगिरीला शासनातर्फे पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न यासारखे किताब देण्यात येतात. पूर्वी राजेराजवाडे एखादा सरदाराला मानाचा किताब आणि सरदेशमुखी, चौथाईचा हक्क, मानसबदारी, जमीन वा गाव देत. सेवेची दखल घेण्याचा तो एक प्रकार होता.

या पदकांद्वारे विशिष्ट गुणवत्ता, विशिष्ट मूल्ये, विशिष्ट मानदंड अधोरेखित केले जातात.

उद्योग व्यवसायात उच्च स्थान मिळवण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी अशाच प्रकारच्या गुणवत्तेची, नेतृत्वगुणांची, नीतिमूल्यांची गरज असते. त्यासाठी काही पथ्ये पाळावी लागतात. काही कार्यप्रणाली (सिस्टिम) निर्माण करावी लागते. आपणास कोणत्या प्रकारची संस्था किंवा व्यवस्था अपेक्षित आहे हे ठरवावे लागते. मानंदड ठरवावे लागतात. आपल्या विचारपद्धतीत त्यानुसार बदल घडवून आणावे लागतात.

मानवी मन म्हणजे स्वनियोजित माहितीप्रणाली आहे. ही संकल्पना पायाभूत ठरवून जागतिक ख्यातीचे विचारवंत आणि व्यवस्थापनतज्ज्ञ एडवर्ड डी. बोनो यांनी समांतर विचार पद्धतीची सूत्रे विकसित केली आहेत. मायक्रोसॉफ्ट, आयबीएम, नोकिया, सीमेन्स, एनटीटी वगैरे नामवंत संस्थांमध्ये या सूत्रांवर आधारित प्रशिक्षणाचा चांगला फायदा झाल्याचे दिसून आले. ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघाने बोनो यांच्या या सूत्रांचा पाठपुरावा करून

आपला खेळ सुधारून अनेक सामने जिंकले, त्यामुळे बोनोंची सूत्रे विविध क्षेत्रांना लागू पडतात हे सर्वमान्य झाले.

बोनो यांनी एकूण ६७ पुस्तके लिहून आपल्या विचार पद्धतीचे सांगोपांग विवेचन केले आहे. त्यांच्या पुस्तकांचे ३७ भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. हार्वर्ड, केंब्रिज, ऑक्सफर्ड, लंडन विद्यापीठात त्यांची व्याख्याने होत असतात.

'द सिक्स व्हॅल्यू मेडल्स' या पुस्तकात त्यांनी आपली 'मूल्यांची संकल्पना' स्पष्ट करण्यासाठी सहा पदकांचा प्रतीक म्हणून वापर केला आहे.

सुवर्णपदक, रौप्यपदक, पोलादपदक, काष्ठपदक काचपदक आणि ताम्रपदक असे पदकांचे सहा प्रकार घेऊन बोनो यांनी या प्रत्येक पदकाचे संदर्भव्यूह मांडले आहेत. मानवी विचारशक्ती हे एक महत्त्वाचे साधन आहे. हे साधन उत्तम प्रकारे वापरण्यासाठी सदोदित ताजे तरतरीत, धारदार ठेवायला हवे; म्हणजेच ते बोथट, साचेबंद, झापडबंद होऊ देता कामा नये. त्यात गरजेनुसार, कालमानानुसार सुधारणा करीत राहिले पाहिजे. त्या दृष्टीने नवीन विचारपद्धती आणि नवी सूत्रे स्वीकारण्याची लवचिकता हवी.

सहा पदकांच्या उदाहरणाद्वारे नवीन विचार पद्धतीचे वेगवेगळे निकष स्पष्ट करून त्यांचा वापर कसा करावा हे विशद केले आहे.

सहा मूल्य पदके म्हणजे विचारांच्या सहा चौकटी.

सुवर्णपदक हे सर्वात श्रेष्ठ मानवी मूल्यांचे प्रतीक. मानवी मूल्यांचा स्वीकार करणारा, त्याबद्दल आदर बाळगणारा समाज हा सुसंस्कृत, न्यायप्रिय, उदार असतो. गुलामगिरी, पिळवणूक, जुलूम जबरदस्ती, शोषण यांना त्यात वाव नसतो. आपला उद्योग व्यवसाय, आपली संस्था ही अशा उच्च मानवी मूल्यांचा आग्रह धरणारी म्हणजे मूल्यात्मक सुवर्ण पदकाची आकांक्षा धरणारी असावी.

रौप्यपदकाचा संबंध उद्योग व्यवसायाच्या व्यवस्थापकीय मूल्यांशी आहे. व्यवसाय हा कौटुंबिक असो, सामूहिक असो वा सार्वजनिक असो, त्याचे व्यवस्थापन नेटके, किफायतशीर,त्याबरोबरच उधळपट्टी व आवश्यक डामडौल टाळणारे असावे.

पोलादपदक हे मजबूत, टिकाऊ, दर्जेदार वस्तूचे प्रतीक होय. उत्पादित मालाचा दर्जा उत्तम हवा, विक्रीपश्चात सेवा चोख हवी. उत्पादन हे अपेक्षित

उद्दिष्ट सुविहितपणे पार पाडणारे हवे.

काचपदक हे सोपेपणा, संशोधन, सर्जनशीलता यांचे प्रतीक होय. वाळूपासून काच तयार होते; पण मानवी कल्पकतेमुळे काच विविध रूपात, आकारात, रंगात प्रकट होते. काचपदकाचे मूल्य अंगभूत गुणवत्ता आणि संभाव्य सुप्त शक्यता यांच्याशी निगडीत असते.

काष्ठपदक हे पर्यावरणाचे प्रतीक आहे. काष्ठ म्हणजे लाकूड. निसर्गाचे एक रूप. आपण घेतलेल्या निर्णयाचा, कृतीचा, योजनेचा किंवा परिवर्तनाचा इतरांवर काय परिणाम होईल ह्या निकष काष्ठपदकाच्या मूल्याद्वारे अधोरेखित होतो. काष्ठपदकाची मूल्ये साधारणपणे नकारात्मक असतात. निसर्गात आपण सदैव बदल घडवून आणू पाहतो. हे बदल सुसह्य करण्याची, निसर्गाचा समतोल कमीत कमी ढळावा अशी दक्षता घेण्याची गरज काष्ठपदक मनावर बिंबवले.

ताम्रपट-तांबापितळेचे पदक वस्तुनिष्ठ आकलनावर, माहिती संकलनावर भर देते. वस्तू जशा दिसतात तशाच प्रत्यक्षात असतात हा आपला समज अनेकदा भ्रममूलक असतो. पितळ हे सोन्यासारखे दिसते. आपण त्यामुळे फसतो. आपली दिशाभूल होते. आपले मूल्यमापन त्यामुळे चुकीचे ठरते. जग जसं दिसतं तसा त्याला प्रतिसाद लोक देतात. वास्तवातल्या जगाला नाही. पितळीपदक हे योग्य आकलनासाठी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून बघण्याचा इशारा देते.

मूल्यांबाबतची आपली संवेदनशीलता टीका-आलोचना, धोक्याची जाणीव, अज्ञात शक्यता, अ-स्वीकार किंवा नकार, बहिष्कार, सवय, मूल्यभान याद्वारे प्रकट होते.

सहा मूल्य पदकांची मूल्यमापन पद्धती एकदा अंगवळणी पडली की कुठल्याही वेळी, कुठल्याही प्रसंगात ती उपयोगात आणण्याची सवय लागते. प्रत्येक वेळी सर्वच्या सर्व मूल्ये तपासून बघण्याची गरज नसते. काही मूल्यांना अग्रक्रम देऊनही काम भागते.

परंतु मूल्यांमध्येही कालमानप्रसंग या नुसार प्राधान्यक्रम ठरवणे, श्रेष्ठ कनिष्ठ स्थान देणे क्रमप्राप्त ठरते. तेव्हा मूल्यांच्या संदर्भात संघर्ष निर्माण होतो.

नैतिक मूल्यांपेक्षा व्यवहार, मानवी स्वभाववृत्त, हितसंबंध यांना अनेकदा अग्रक्रम मिळतो. एकच एक मूल्य सर्व बाबतीत प्रमाण मानून चालत नाही. काही मूल्ये नकारात्मकही असतात.

सामाजिक मूल्ये आणि वैयक्तिक मूल्ये, भौतिक मूल्ये आणि नैतिक मूल्ये, वैचारिक मूल्ये आणि भावनिक मूल्ये यात पदोपदी संघर्ष संभवतो. अशावेळी सर्व मूल्ये समोर मांडून त्यातील कोणते मूल्य तुमच्यावर जास्त प्रभाव टाकते ते शोधा. तसे मूल्य सापडत नसेल तर संभाव्य परिणामांचा अंदाज घेऊन जास्तीत जास्त श्रेयस्कर मूल्य निवडा.

मूल्यांचे उगमस्थान म्हणून संपर्क मूल्य, परवानगी, प्रवेशद्वार, पात्रता मूल्य, तटस्थ मूल्य, वर्धित मूल्य, वेगमूल्य, समस्या निवारण, अडथळा, चुका, स्पर्धा, अपयश, संकल्पना यांचा विचार करणे इष्ट ठरते.

स्पर्धेच्या या युगात सतत निर्णय घेणे क्रमप्राप्त असते. हे निर्णय घेताना मूल्यांचे भान ठेवावे लागते. मूल्यांबाबतचा ढिलेपणा वा गलथानपणा आपले आयुष्य आणि करीयर अडचणीत आणू शकतो. सहा पदकांद्वारे मूल्यविवेक केला तर निर्णय घेणे सुकर होते. नव्या संधी मिळू शकतात. योग्य पर्याय सापडू शकतात.

सुवर्णपदकामुळे आपले मानवी मूल्यांचे भान सदैव जागृत राहते. रौप्य पदकामुळे व्यवस्थापकीय भान कायम राहते. पोलाद पदकामुळे गुणवत्ता, मूल्य, काचपदकामुळे कल्पकता मूल्य, काष्ठपदकामुळे पर्यावरण मूल्य, ताम्रपटाने विश्वाचे वास्तव आकलन-होण्याचे महत्त्व - हे सारे सहजपणे समोर येते. कोणतेही काम करताना किंवा निर्णय घेताना डोळ्यापुढे गरीबातला गरीब माणूस आणा आणि त्याला या कामामुळे किंवा निर्णयामुळे काय फायदा होईल असा प्रश्न स्वत:ला विचारा असे एक सूत्र महात्मा गांधींनी सांगितले होते. बोनो यांचे हे सहापदकांचे प्रतीक त्याच सूत्रासारखे अर्थपूर्ण व उपयुक्त ठरेल. प्रत्येक उच्चपदस्थ व्यक्तीने त्याचे अनुसरण करणे कल्याणकारक ठरेल.

❒

**आगामी**




# लेनिनग्राडचा वेढा

मूळ लेखक

**मायकेल जोन्स**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

३२०रु. पोस्टेज ३०रु.

८ सप्टेंबर १९४१. राक्षसी महत्त्वाकांक्षा असणाऱ्या हिटलरच्या फौजांनी सोव्हिएत महासंघाचा मानबिंदू असणाऱ्या लेनिनग्राड शहराभोवती पक्का फास आवळला. यामागे होती, एक थंड डोक्यानं आखलेली क्रूर योजना आणि लोकांची उपासमार करून शहर नष्ट करण्याची निर्दयी नाझी विचारसरणी. सलग ८७२ दिवस चाललेला हा वेढा हे मानवी इतिहासातलं एक भीषण पर्व आहे. विनाशासाठी टपलेलं शत्रूसैन्य आणि अत्यंत भ्रष्टाचारी नेत्यांची गलथान हुकूमशाही, यांच्यात भरडले जाऊन दहा लाखांपेक्षा जास्त नागरिक भुकेनं तडफडून मेले. नैतिक अध:पतनाचं टोक गाठलं गेल्यानं नरमांसभक्षणासारखे अघोरी प्रकार घडले. पण लेनिनग्राडच्या काही नागरिकांनी आपल्यातलं माणूसपण मरू दिलं नाही आणि अखेर त्यांनी विजय मिळविला. लेनिनग्राडचा वेढा ही त्या विलक्षण झुंजीची, मन सुन्न करणारी कहाणी आहे.




# स्टीव्ह जॉब्ज

एक झपाटलेला तंत्रज्ञ!

समाजाच्या सर्व घटकांना मोहात पाडणाऱ्या अत्याधुनिक उत्पादनांचा प्रतिभाशाली निर्माता




**अच्युत गोडबोले / अतुल कहाते**

९५रु. - सभासदांना सवलतीत

वृत्तपत्रांचा झपाटा आता ग्रंथ प्रकाशन क्षेत्रातही दिसू लागला आहे, ही लक्षवेधक बाब आहे. ॲपलच्या प्रवर्तक स्टीव्ह जॉब्ज याचे ५ ऑक्टोबरा रोजी निधन झाले; आणि त्यानंतर एक दीड महिन्यात त्याच्या चरित्राची आणि माहितीची अनेक पुस्तके बाजारात आली. विशेष म्हणजे हे केवळ अमेरिकेत घडले असे नाही; तर भारतात आणि महाराष्ट्रातही घडले. त्याचे पाचशेवर पृष्ठांचे चरित्र मराठीत अनुवादित होऊन छापूनही झाले. सध्या मराठीत तंत्रज्ञान-व्यवस्थापन-माहिती संज्ञापन क्षेत्रावर चौफेर लेखन करणारे डॉ. अच्युत गोडबोले यांनी अनुवाद वगैरे व्यापात न पडता, स्टीव्ह जॉब्जवर स्वतंत्र पुस्तक लिहिण्याची मेहता पब्लिशिंग हाऊसची ऑफर स्वीकारून आपले सहलेखक अतुल कहाते यांच्या सहकार्याने अल्पकाळात ते लिहून पूर्णही केले आणि नोव्हेंबर ११ चा मुहूर्त गाठून मेहतांनी ते वाचकांना देण्याची दक्षताही घेतली. अच्युत गोडबोले-अतुल कहाते यांच्या लेखनाचा वेग सुपर फास्ट आहे, इंटरनेटच्या जमान्याला साजेसा आहे. वर्षानुवर्षे एखाद्या विषयाचा वेध घेत आयुष्याच्या सरत्या काळात त्यावर लिहिण्याचा आपल्याकडे प्रघात आहे; या सायबर एजमध्ये, डिजिटल जगामध्ये प्रत्येकाला सारे काही इन्स्टंट, झटपट हवे असते आणि तसे ते मिळूही शकते याचे 'स्टीव्ह जॉब्ज-एक झपाटलेला तंत्रज्ञ' हे पुस्तक म्हणजे एक ठसठशीत उदाहरण आहे.

स्टीव्ह जॉब्ज या आधुनिक संगणक युगाचा एक आद्य प्रवर्तक आहे. आयबीएमच्या महाकाय संगणकाचा वापर एलआसीसारख्या कंपन्या करीत; पण त्यावेळी सर्वसामान्य माणसे त्याच्याशी नाळ जुळवण्याचा विचारही करू शकत नाहीत. कारण तो खूप महाग होता आणि त्यावरचे काम खूप खर्चिकही होते. वैयक्तिक वापरासाठी छोटा, टीव्ही-रेडिओएवढा काँप्युटर असावा हे तेव्हा ज्याच्या त्याच्या स्वप्नात होते. अनेकजण त्यासाठी प्रयत्नशील होते. स्टीव्ह जॉब्जच्या डोक्यातही ती कल्पना आली आणि त्याने सर्वप्रथम लोकप्रिय पीसी बनवला. त्यासाठी पंचविशीच्या आत वॉझ्नियॅक या मित्रासह ॲपल नावाची कंपनी काढून ॲपल हा पर्सनल काँप्युटर तयार करून बाजारात आणला. (१९७७) ॲपल टू चे कीबोर्ड, मॉनिटर आणि सीपीयू या तीन भागांचे दर्शन नेत्रांना सुखवणारे होते आणि त्याद्वारे होणारी अक्षररचना, चित्रांकन, हिशेब-गणित वगैरे काम हे दैनंदिन जीवनाला उपयुक्त ठरणारे होते. प्रयोगशाळेतून संगणक घरच्या टेबलावर स्थानापन्न झाला. त्याचा

उपयोग अनेक प्रकारांनी होऊ शकेल हे ध्यानात आले. या ॲपल टू साठी जेफ्री फ्रँक उर्फ जेफ रास्किन याने बेसिक प्रोग्रॅमिंग लँग्वेजचे मॅन्युअल लिहिले. ॲपल टू १९७७ मध्ये सॅन फ्रॉन्सिस्को येथे भरलेल्या संगणक जत्रेमध्ये प्रदर्शित झाला. किंमत होती १२९८ डॉलर्स.

स्टीव्ह जॉब्जला इलेक्ट्रॉनिक्सची गोडी त्याच्या दत्तक वडिलांमुळे लागली. स्टॅनफोर्ड विद्यापीठात कॉलेजला असताना त्याची स्टीफन गॅरी वॉझ्नियॅक याच्याशी मैत्री झाली. १९७१ मध्ये या दुकलीने चोरून टेलिफोन करण्याबद्दलचा एक लेख वाचून एक 'ब्ल्यू बॉक्स' तयार केला आणि अनधिकृत फोन कॉल करण्यासाठी त्याचा वापर सुरू केला. अशी २०० यंत्रे त्यांनी प्रत्येकी दीडशे डॉलर्सना विकून चांगली कमाई केली. पण नंतर हा धंदा बंद केला. वॉझ्निकलला नंतर एचपी (ह्युलेट पॅकार्ड) मध्ये नोकरी मिळाली तर जॉब्जला अतारी या इलेक्ट्रॉनिक गेम्सची साधने बनवणाऱ्या कंपनीत. एका लोकप्रिय गेमची सुधारित आवृत्ती तयार करण्याचे काम या दोघांनी फक्त चार दिवसात करून हजार डॉलर्स मिळवले. १९७५ मध्ये कंप्युटर तयार करण्यासंबंधीचा एक लेख पॉप्युलर इलेक्ट्रॉनिक्स या मासिकात आला. या दोघांनी त्यावरून कंप्युटर तयार केला. ॲपल कंप्युटर कंपनी काढून (१ एप्रिल १९७६) कंप्युटरने मार्केटिंग सुरू केले. बाइट शॉप या कंप्युटर-विक्री करणाऱ्या नव्या कंपनीला ५०० डॉलर्स दराने ५० कंप्युटर्स विकून स्टीव्हने शुभारंभ तर दणक्यात केला. प्रथम घरीच ॲसेंब्लिंग करून नंतर हे काम गॅरेजमध्ये सुरू केले. ॲपल १ हा कंप्युटर १९७६ जुलैमध्ये बाजारात आला. किंमत ठेवली ६६६.६६ डॉलर्स वर्षाने ती ४७५ इतकी खाली आली. त्यातील त्रुटी दूर करून १९७७ मध्ये ॲपल टू बाजारात आणले. मर्कुला या तंत्रज्ञाने ॲपलमध्ये ९२ हजार डॉलर्स गुंतवून अडीच लाख डॉलर्सचे कर्ज मिळवून दिले. मर्कुलाने आपल्या मायकेल स्कॉट या मित्राला कंपनीचे अध्यक्ष नेमले. कंप्युटरमध्ये अधिक सुधारणा करण्यासाठी सर्वजण कामाला लागले. जॉब्ज हा परफेक्शनिस्ट होता. बारीकसारीक गोष्टीबाबतही तो काटेकोर असे. फ्लॉपी डिस्कच्या यंत्रणेमुळे ॲपल दोनची माहिती साठवण्याची क्षमता वाढली. एका प्रोग्रॅमरने तयार केलेले कॅल्क्युलेटर हे सॉफ्टवेअरही ॲपलने सामावून घेतले. त्यामुळे ॲपल दोन प्लसची विक्री जोरात होऊ लागली. किंमत होती १९९५ डॉलर्स.

१९७९ साली ॲपल थ्री, लिसा आणि मॅकिन्टॉस या तीन प्रकल्पांवर

काम सुरू झाले.

१९८४ साली मॅकिंटॉश बाजारात आला. अॅपलची विक्री १०० कोटी डॉलर्सच्या घरात गेली.

१९८० मध्ये अॅपलने शेअर बाजारात प्रवेश केला. १४ डॉलर्सचा भाव २९ डॉलर्सवर गेला. ४६ लाख शेअर्स एका मिनिटात विकले गेले.

अॅपल तीनला लोकांचा प्रतिसाद फारसा मिळाला नाही. रचनेतील दोषांमुळे माल परत येत राहिला. तो बाजारातून काढून घेणे भाग पडले. अॅपल तीनमुळे कंपनीला ६ कोटी डॉलर्सचा तोटा सहन करावा लागला.

आयबीएमला टक्कर देण्यासाठी अॅपलने १९८३ मध्ये लाँच केलेल्या 'लिसा'लाही अपेक्षित यश मिळाले नाही. लिसाची किंमत ९९९५ डॉलर्स ही तशी जास्तच होती.

स्टीव्ह जॉब्जची प्रतिभा पूर्णांशाने उतरली ती 'मॅकिंटॉश'मध्ये. मॅकिंटॉशने पीसीचे जग बदलून टाकले. त्याचे बाह्यरूप आकर्षक होते. २४ जानेवारी १९८४ रोजी मॅकिंटॉशचे अनावरण एका भव्य समारंभात झाले. मॅकिंटॉशची जाहिरातही मोठ्या प्रमाणावर केली गेली. एका वर्षांत ५ लाख मॅकिंटॉश विकले गेले.

याच दरम्यान जॉन स्कलीने अॅपलमध्ये प्रवेश केला. त्याचे व जॉब्जचे न पटल्याने जॉब्जला अॅपल सोडणे भाग पडले. स्कलीने आयबीएम आणि मायक्रोसॉफ्ट यांच्याशी प्रयत्न करार केले. मायक्रोसॉफ्टची विंडोज प्रणाली लोकप्रिय ठरली. अॅपलने कोर्टात धाव घेऊन मायक्रोसॉफ्टवर कारवाई सुरू केली. मायक्रोसॉफ्टला १९९३ मध्ये निर्दोष ठरवण्यात आले. स्कलीने केलेल्या करारामुळे अॅपलचे खूप नुकसान झाले.

स्टीव्ह जॉब्जने 'नेक्स्ट' कंप्युटर कंपनी सुरू केली तसेच पिक्सार कंपनी काढून वॉल्ट डिस्नेसाठी टॉयस्टोरी ही अॅनिमेटेड फिल्म तयार केली. टॉयस्टोरीने ३५.८० कोटीचा व्यवसाय करून उच्चांक गाठला. टॉयस्टोरी-२ नंतर डिस्ने व जॉब्जमध्ये मतभेद झाले. पुढे डिस्नेने पिक्सार विकत घेतले. (२००६)

स्टीव्ह जॉब्जचे १९९७ मध्ये 'अॅपल'चा सल्लागार म्हणून पुनरागमन झाले. सीईओ पदावर लौकरच त्याची निवड झाली.

अॅपलचा एकही कंप्युटर त्यावेळेपर्यंत २००० डॉलर्सपेक्षा स्वस्त नव्हता

हे लक्षात घेऊन स्टीव्ह ने १९९८ मध्ये आयपॉड कंप्युटर बाजारात आणला. किंमत ठेवली १२९९ डॉलर्स. ६ आठवड्यात ३ लाख २५ हजार आयपॉड विकले गेले. वर्षांत ही संख्या २० लाखांवर गेली.

१९९९ मध्ये आयबुक हा नवा लॅपटॉप ॲपलने बाजारात आणला. किंमत १५९९ डॉलर्स यानेही लॅपटॉपचे सगळे जुने विक्रम मोडले. दीड लाख आयबुक आगाऊ नोंदवले गेले. ॲपलचे शेअर बाजारातले मूल्य ८ पट वाढले.

ॲपलने जॉब्जला एक छोटे विमान भेट दिले. शिवाय ॲपलचे १ कोटी शेअर्स घेण्याची परवानगी दिली.

संगीत ऐकण्यासाठी आयपॉड हे छोटेखाली म्युझिक प्लेअर हे पुढचे क्रांतिकारक उत्पादन. ते २३ ऑक्टोबर २००१ रोजी सादर केले गेले. आयपॉडमुळे हजारो गाणी खिशात आली. वापरायला सोपे सुटसुटीत. बॅटरी पॉवरफुल. १४ ते ३८ दिवस चार्ज टिकणारी. आयपॉडवर १६ हजार गीते बसू शकतात.

स्टीव्ह जॉब्जचे पुढचे संशोधन म्हणजे आय-फोन.

मोबाईल, इमेल, संगीत, रेडिओ, इंटरनेट, कॅमेरा वगैरे सर्व सोयी एकत्र आणणारा आयफोन म्हणजे जादूई चिरागच! या बहुउद्देशीय मोबाईलसाठी नवी ऑपरेटिंग सिस्टीमच हवी होती. ती इतर कंपन्यांना बनवणे शक्य नसल्याचे ॲपलनेच विकसित केली. टच स्क्रीन तंत्रज्ञान त्यासाठी वापरले. असंख्य बारकावे या तंत्रज्ञानात वापरले. २००७ मध्ये लाँचिंग झाले. एकच धमाल उडाली. तंत्रज्ञानाच्या नव्या युगाची झलक या आयफोनने दाखवली.

आयफोनमधील इंटरनेट, इमेल, वायफाय, लिखित वा रेकॉर्डेड श्राव्य संदेश पाठवण्याची सोय, वगैरे सुविधांमुळे आयफोन म्हणजे सर्व कामे करणारी जादूची डबीच ठरली.

आयफोनच्या स्क्रीनला ओरखडे पडू नयेत म्हणून ॲल्युमिनोसिलिकेट काचेचा वापर केला आहे. ही काच प्लॅस्टिकपेक्षा ३० पट कठीण आणि २० पट कडक आहे.

फोनमधील अँटेना, तिच्यातून होणारे किरणोत्सर्जन, मोबाईल नेटवर्कशी जोडण्याचे तंत्र याकडेही खास लक्ष पुरवण्यात आले. ॲपलच्या स्पर्धकांनाही या फोनने चक्रावून सोडले. असे काही अद्‌भुत बघायला मिळेल असे त्यांना वाटले नव्हते.

या फोनची किंमत ५९९ डॉलर्स होती; ती पुढे ३९९ डॉलर्स करण्यात आली.

यात छोटेमोठे दोष होते ते नंतर दूर करण्यात आले. आयफोन ४ आणि आयफोन ४ एस हे पुढे बाजारात आले.

१५ कोटी डॉलर्स खर्च याच्या संशोधनासाठी झाला.

आयफोन ३ जीएस मॉडेल एका आठवड्यात १० लाख विकले गेले.

२००९ मध्ये आयफोनची विक्री तिसऱ्या आठवड्यात ५३ लाख झाली.

ॲपलला एका फोनवर १९९ डॉलर्स फायदा झाला.

आयफोननंतर आयपॅड आणि आयपॅड-२ या टॅब्लेट पीसींनी पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे यांचे वाचन, गेम्स खेळणे, चित्रपट पाहणे, व्हिडिओ बघणे गाणी ऐकणे- या सर्व बाबी सुलभ केल्या. टचस्क्रीनचा वापर, मोठा कीबोर्ड (टचस्क्रीन) यामुळेही तो हाताळणे सुखद ठरले.

स्टीव्हच्या या सर्वच उत्पादनांमध्ये कल्पकता आणि वापर-सुलभता दिसते. त्यामुळे त्याचे स्मरण ही उपकरणे वापरताना होत राहील.

या चरित्रात या उत्पादनांबद्दलची विस्तृत माहिती आली आहेच. स्टीव्हच्या वैयक्तिक जीवनाबद्दल, त्याच्या व्यावसायिक नीतिमत्तेबद्दल, त्याच्या वर्तनातील बऱ्या वाईट भागांबद्दलही बरेच तपशील आले आहेत. त्याबद्दल मुळातच वाचणे इष्ट ठरेल. त्याच्या जन्माविषयी मात्र येथे सांगायला हवे. एक सीरियन मुस्लीम अब्दुल फताह उर्फ जॉन जंदाली आणि जिऊँ कॅरोल शिबल ही अमेरिकन कॅथॅलिक तरुणी यांचा हा मुलगा. अनौरस. त्याला पॉल जॉब्ज आणि क्लॅरा जॉब्ज या दांपत्याने दत्तक घेतले. स्टीव्हला कॉलेज शिक्षण मिळायला हवे अशी अट त्याला दत्तक देताना जंदाली-शिबल यांनी घातली होती. पॉल हा लाइफगार्ड होता पण त्याला स्वत:ला पोहता येत नव्हते. स्टीव्हला पॉलने इलेक्ट्रॉनिक्सची गोडी लावली. क्लॅरा अकाउंटंट होती. स्टीव्ह लहानपणी ज्या घरात रहायचा ते फार सुंदर व नीटनेटके होते. मॅकिंहॉटॉशपासून आयपॅडपर्यंतच्या सर्व उत्पादनांची रचना करताना या घराचा आदर्श पुढे असे स्टीव्ह म्हणे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील जाणकारांनी लिहिलेले हे चरित्र तरुण वर्गाला प्रेरणादायक ठरेल.

❐




# रोमांचक आत्मकथेचा उत्कृष्ट अनुवाद

'जगामध्ये दरवर्षी ५००० व्यक्तींचे खून असे प्रतिष्ठेपायी केले जातात. त्यातली ही फक्त एक कहाणी... ही माझी व्यक्तिगत कथा आहे.' जसविंदर संघेरा यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत मिळविलेल्या यशाची गाथा 'शेम' या आत्मकथेत शब्दबद्ध झाली आहे. जसविंदर संघेरा यांच्या आत्मकथेचा अनुवाद अत्यंत संवेदनशीलतेने व सक्षमतेने सुनंदा अमरापूरकर यांनी मराठीत केला असून मेहता ग्रंथ प्रकाशनने तो प्रकाशित केला आहे.




विदेशात डर्बी येथे राहणाऱ्या व यौवनात पदार्पण करणाऱ्या जसविंदर संघेरासाठी कुटुंबियांनी तिच्या उच्च शिक्षण घेण्याच्या इच्छेची पर्वा न करता तिचा विवाह ठरवला. आजच्या परिस्थितीला मूकपणे संमती देण्याऐवज प्रतिक्रिया स्वरूप तिने जी पावले उचलली त्याचा आलेख या आत्मकथेत लेखिकेने चितरला आहे. कुटुंबातील व्यक्तींचे जीवनानुभव व भोवतालच्या आशियायी समाजाची मानसिकता यांच्या ताणाबाणातून लेखिका आपल्या आयुष्याचा पट उलगडून दाखविते. पाश्चात्य वातावरणाच्या पार्श्वभूमीवर विदेशात स्थायिक झालेल्या आशियाई लोकांच्या घराण्याच्या प्रतिष्ठेसंबंधीच्या कल्पना यांच्यातील विरोध लेखिका अत्यंत प्रभावीपणे दृश्य करते. विदारक वेदनापूर्ण वास्तवातून स्वत:च्या आयुष्याचा लेखिकेने काढलेला मार्ग व तो पूर्णत्वास नेताना कधी हिंमत-जिद्द तर कधी निराशा-अगतिकता यांच्या हिंदोळ्यावर दोलायमान होणाऱ्या लेखिकेच्या मनोविश्वातील

चढ उतार, बारकावे यांचे वस्तुनिष्ठ चित्रपण या आत्मकथेचे लक्षणीय बलस्थान आहे.

कोणत्याही व्यक्तीने भोगलेल्या जीवनानुभवाच्या सामान्यपणे दोन प्रतिक्रिया प्रकट होतात. पहिली अशी की स्वत: जे दु:ख भोगले ते कमी अधिक प्रमाणात दुसऱ्यांना अनुभवायला लावून स्वत:च्या परिस्थितीची समज देणे व दुसरी अशी की जे आपण भोगले ते दुसऱ्यांना भोगायला लागू नये यादृष्टीने प्रयत्नशील राहणे. जसविंदर संघेरा दुसऱ्या प्रकारात मोडणारी स्त्री असल्याने तिने स्त्री आधार केंद्रात स्वयंसेवक म्हणून काम करायला सुरुवात केली आणि आशियायी स्त्रियांना आधाराची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन कर्म-निर्वाणमध्ये कार्यशील राहून त्या माध्यमातून आशियाई स्त्रियांच्या हक्कासाठी झगडत आशियाई स्त्रियांसाठी चार आश्रयघरं उभी केली. स्त्रियांना व मुलांना निवारा मिळवून देणं हे जसं तिनं आयुष्याचं लक्ष्य केलं तसंच स्वतंत्रपणे जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी गुणवत्ताही प्राप्त केली. प्रौढ शिक्षण वर्गात प्रवेश घेण्यापासून ते पीएच.डी. पदवी प्राप्त करण्यापर्यंतचा लेखिकेचा प्रवास अत्यंत रोमांचक आहे.

'शेम' ही सत्यकथा असूनही ती निवेदन करताना लेखिकेच्या शब्दशैलीत कुठे आवेश-अभिनिवेश नाही. परखड, जळजळीत समाजचित्रण करत परदेशातील आशियाई स्त्री जीवनावर प्रकाशझोत टाकीत स्त्रियांच्या हलाखीच्या जीवनाचे कंगारे प्रकाशमान केले आहेत. मुळात जीवनचरित्र अत्यंत व्यामिश्र पण ते जगताना लेखिकेचा जीवनोद्देश अत्यंत शुद्ध-सकस व उदात्त त्यामुळे 'शेम' आत्मकथेचा प्रभाव प्रेरणादायी. अंतर्मुख करणारा व विशाल दृष्टिकोनाचा प्रत्यय देणारा आहे. ओघवती मराठी भाषाशैली व आत्मकथेतील लेखिकेच्या मनोभूमीची अनुवादिकेला असलेली समज यामुळे 'शेम' आत्मकथेचा अनुवाद अत्यंत-सरस हृदयस्पर्शी व कंप निर्माण करणारा आहे. जसविंदर संघेरा यांची स्वतंत विचारशैली, विश्लेषणशक्ती, वस्तुनिष्ठ निरीक्षण शक्ती, स्वत:तील गुणदोषांचे प्रखर व परखड विवेचन व समाज मनावरील भाष्य यांचा अत्यंत संयत आविष्कार आत्मकथालेखिकेने तसेच सुजाण अनुवादिका सुनंदा अमरापूरकर यांनी केला आहे. 'शेम' ही मराठीत अनुवादित झालेली आत्मकथा प्रत्येकाने वाचावी अशी आहे. इतक्या सगळ्या बायका विश्वासाने आपली दु:खं लेखिकेला सांगतात आणि ती कमी करण्यात लेखिका त्यांना मदत करू शकते. किंबहुना हे तिला स्वत:चे भाग्य वाटते म्हणून ग्रंथाच्या अखेर, मदत-आधार-सल्ला तसेच देणगी देण्यासाठी कर्मनिर्वाणचा पत्ताही दिला आहे.

प्रा. डॉ. शुभदा शहा

तरुण भारत दि. २७/११/२०११

❐

## २०११ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

### कादंबरी

| | | |
|---|---|---|
| **नथिंग टू लूज :** ली चाइल्ड | अनु. उदय कुलकर्णी | ३५०/- |
| **डिजिटल फॉर्ट्रेस :** डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ४४०/- |
| **द मिसिंग रोझ :** सरदार ओझकान | अनु. श्रीकांत परांजपे | १५०/- |
| **आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद :** : मायकेल हेस्टिंग्ज | अनु. अंजनी नरवणे | २५०/- |
| **जोहार माय बाप जोहार** | मंजुश्री गोखले | ३००/- |
| **द प्रायव्हेट पेपर्स ऑफ ईस्टर्न ज्युवेल** : मॉरीन लिंडले | अनु. ऋजुता कुलकर्णी | २८०/- |
| **बिलाँगिंग :** समीम अली, हम्फ्रे प्राईस | अनु. सिंधु जोशी | २४०/- |
| **युथनेशिया** | स्वाती चांदोरकर | २२०/- |
| **अस्मिता** | सूर्यकांत जाधव | २८०/- |
| **अंकरहित शून्याची बेरीज :** दिनकर जोषी | अनु.अंजनी नरवणे | १६०/- |
| **कॅरी मी डाऊन :** एम. जे. हायलंड | अनु. पुलिंद सामंत | २५०/- |
| **लोकल माझी सखी** | मधुवंती सप्रे | १८०/- |
| **नावेतील तीन प्रवासी** | द. मा. मिरासदार | १२०/- |
| **नीलांगिनी** | स्मिता पोतनीस | ४००/- |
| **थ्री कप्स ऑफ टी :** :ग्रेग मॉर्टेनसन, डेव्हिड ऑलिव्हर रेलीन | अनु. सिंधु जोशी | ३५०/- |
| **द असोशिएट :** जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाथरकर | ३००/- |
| **द गिफ्ट ऑफ रेन :** तान त्वान एंग | अनु. अशोक पाथरकर | ४४०/- |
| **द गॉड ऑफ ॲनिमल्स :** :आर्यन कायले | अनु. गीतांजली वैशंपायन | २८०/- |
| **गर्नसी वाचक मंडळ :** :मेरी ॲन शाफर, ॲनी बरोज | अनु. मैत्रेयी जोशी | २५०/- |
| **सॉल्ट ॲण्ड हनी :** कँडी मिलर | अनु. वैजयंती पेंडसे | २००/- |
| **स्क्रीम फॉर मी :** करेन रोझ | अनु. दीपक कुळकर्णी | ४८०/- |
| **मी का नाही?** | पारु मदन नाईक | ११०/- |

| | | |
|---|---|---|
| **संधिकाल** | मिलिंद गाडगीळ | ३२०/- |
| **दॅट थिंग कॉल्ड लव्ह** : तुहीन ए. सिन्हा | अनु. श्यामल कुलकर्णी | २००/- |
| **अल्टिमेटम :** मॅथ्यू ग्लास | अनु. सुदर्शन आठवले | ४४०/- |
| **कृष्णायन :** काजल ओझा - वैद्य | अनु. प्रा. सुधीर कौठाळकर | २००/- |
| **कीप ऑफ द ग्रास :** करण बजाज | अनु. माधुरी शानभाग | १६०/- |
| **ब्लड मनी :** क्रिस कॉलेट | अनु. वैशाली रानडे | २००/- |
| **मी रुक्मिणी** | सुवर्णा ढोबळे | ३२०/- |
| **तलवारीचा शोध :** नॅन्सी यी फान | अनु. मंजूषा आमडेकर | १९०/- |
| **काठ :** डॉ. एस. एल. भैरप्पा | अनु. उमा वि. कुलकर्णी | २५०/- |
| **अज्ञेय** | रैखा बैजल | १००/- |
| **मेल्टडाऊन :** मार्टिन बेकर | अनु. सुभाष जोशी | ३००/- |
| **आयोध्येचा रावण आणि लंकेचा राम** : दिनकर जोषी | अनु. सुषमा शाळिग्राम | १२०/- |
| **अ-मृत पंथाचा यात्री** : दिनकर जोषी | अनु. डॉ. सुषमा करोगल | १८०/- |
| **ॲडम** | रत्नाकर मतकरी | २८०/- |
| **बऊठाकुरानीर हाट** : रवींद्रनाथ टागोर | अनु. मेधा तासकर | १६०/- |
| **वन फुट रॉंग** : सोफी लगूना | अनु. सुनीति काणे | १६०/- |
| **सेक्रेड हार्ट्स** : सारा ड्युनांट | अनु. सुनीति काणे | ४००/- |

## कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| **भावकल्लोळ :** के. सत्यनारायण | अनु.प्रा.एन.आय.कडलास्कर | १२०/ |
| **उधाण** | पांडुरंग कुंभार | १३०/ |
| **दर्पणी पाहता रुप** | विद्युल्लेखा अकलूजकर | १००/- |
| **ती दोघं** | डॉ. रमा मराठे | १३०/- |
| **शेम** : जसविंदर संघेरा | अनु. सुनंदा अमरापूरकर | २५०/- |
| **माझ्या बापाची पेंड** | द. मा. मिरासदार | १३०/- |
| **गंमतगोष्टी** | द. मा. मिरासदार | १४०/- |
| **चकाट्या** | द. मा. मिरासदार | १५०/- |
| **बेंडबाजा** | द. मा. मिरासदार | १४०/- |

| | | |
|---|---|---|
| **चुटक्याच्या गोष्टी** | द. मा. मिरासदार | १२५/- |
| **गुदगुल्या** | द. मा. मिरासदार | १२०/- |
| **हसणावळ** | द. मा. मिरासदार | १४०/- |
| **खडे आणि ओरखडे** | द. मा. मिरासदार | ११०/- |
| **विरंगुळा** | द. मा. मिरासदार | १३०/- |
| **गप्पांगण** | द. मा. मिरासदार | १३०/- |
| **माकडमेवा** | द. मा. मिरासदार | १२५/- |
| **सरमिसळ** | द. मा. मिरासदार | १२०/- |
| **भोकरवाडीच्या गोष्टी** | द. मा. मिरासदार | १४०/- |
| **जावईबापूंच्या गोष्टी** | द. मा. मिरासदार | ६०/- |
| **एका परिसाची कथा** | मिलिंद जोशी | २००/- |
| **कथा गुर्जरी** | अनु. अंजनी नरवणे | २५०/- |
| **दिवा** | प्रमोदिनी वडके-कवळे | २७०/- |
| **नॉट पेड :** हरिशंकर परसाई | अनु. उज्ज्वला केळकर | १४०/- |

## ललितलेख

| | | |
|---|---|---|
| **एक दिवस** | शोभा चित्रे | १४०/- |
| **स्पर्श** | डॉ. विनीता परांजपे | ९०/- |
| **रामायणातील पात्रवंदना** : दिनकर जोषी | अनु. अंजनी नरवणे | १८०/- |

## व्यक्तिमत्त्व विकसन

| | | |
|---|---|---|
| **वुमन ऑन टॉप :** सीमा गोसावी | अनु. शोभना शिकनीस | १५०/- |
| **ब्रेन प्रोग्रॅमिंग** | डॉ. रमा मराठे | १५०/- |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| **इनसाइड द गॅस चेंबर** : श्लोमो व्हेनेत्सिया, संपादन:जीन माउटापा | अनु. सुनीति काणे | २००/- |
| **आनंदाचं पासबुक** | श्याम भुर्के | ३००/- |
| **सर्चिंग फॉर डॅडी :** ख्रिस्तिन जोआना हार्ट | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २५०/ |
| **ए रशियन डायरी** : ॲना पोलितकोवस्क्या | अनु. शोभना शिकनीस | ३००/- |
| **फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स** : जॅन रफ्- ओ'हर्न | अनु. नीला चांदोरकर | २७०/- |
| **इन्फिडेल :** आयान हिरसी अला | अनु. नीला चांदोरकर | ४१०/- |
| **अग्ली :** कॉन्स्टन्स ब्रिस्को | अनु. उल्का राऊत | २५०/- |

**अनकंडिशनल लव्ह :** नतालिया अगियानोअनु. नीला चांदोरकर २६०/-

**मी, संपत पाल**

गुलाबी साडीवाली रणरागिणी

: ॲनी बरथॉड अनु. सुप्रिया वकील १७०/-

**कॅन्सर रोखू या** वन्दना अत्रे/डॉ. चंद्रकांत संकलेचा

: डॉ. डेव्हिड सर्व्हन-श्रायबर १८०/-

**अ विल टू विन :** ॲलिस पीटरसन अनु. उदय कुलकर्णी २४०/-

**आमेन द ऑटोबायोग्राफी ऑफ अ नन** अनु. सुनंदा अमरापूरकर १८०/-

: सिस्टर जेस्मी

## चरित्र

**हात विधात्याचे** अनु. नीला चांदोरकर २५०/-

: डोरोथी क्लार्क विल्सन : प्रस्तावना-फिलिप यॅन्सी

**स्मार्ट लीडरशिप** अनु. माधुरी शानभाग १५०/-

: गीता पिरामल/जेनिफर नेतरवाला

**स्टीव्ह जाब्ज** अच्युत गोडबोले ९५/-

अतुल कहाते

## अनुवादित अनुभवकथन

**मेकिंग द कट :** डॉ. मोहम्मद खाद्रा अनु.डॉ.देवदत्त केतकर २००/-

**माय स्ट्रोक ऑफ इन्साइट** अनु. दिगंबर बेहेरे २००/-

: डॉ. जिल बोल्त टेलर

**वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन** अनु. डॉ. सुभाष दांडेकर २४०/-

: विद्यमाला बर्च

## सत्यकथन

**२६/११ मुंबईवरील हल्ला** अनु. प्रा. मुकुंद नातू २५०/-

: हरिंदर बावेजा

**ग्रोईंग अप बिन लादेन** अनु. बाळ भागवत ४००/-

:जीन सॅसन, नज्वा बिन लादेन,ओमर बिन लादेन

**द प्राइस ऑफ लव्ह** अनु. मीना टाकळकर २२०/-

: निकोला टी. जेम्स

**क्लाराज वॉर** अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर २२०/-

: क्लारा क्रेमर

**युवराज्ञी** अनु. संयुक्ता कैकिणी १८०/-

: जीन सॅसन

| | | |
|---|---|---|
| **लव्हिंग नॅटली** | अनु. पूर्णिमा कुंडेटकर | २४०/- |
| : बेथ हॉलोवे | | |
| **शॅपेल** | अनु. सुनीति काणे | २४०/- |
| : टोनी विल्सन | | |
| **शत्रूशी दोन हात** | अनु. योगिनी वेंगुर्लेकर | ४००/- |
| : मोआइझम बेग | | |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **द स्टार प्रिन्सिपल :** रिचर्ड कोच | अनु. श्याम भुर्के | १८०/- |
| **फिट फॉर ५०+ फॉर विमेन** | अनु. सुभाष जोशी | ८०/- |
| : शेन गुड | | |
| **फिट फॉर ५०+ फॉर मेन** | अनु. सुभाष जोशी | ८०/- |
| : ग्रेग चॅपल | | |
| **'स' सुखाचा** : जॉन ग्रे | अनु. शुभदा विद्वांस | २९०/- |
| **येस! मन:परिवर्तनशास्त्रातील ५० गुपितं** | अनु. डॉ.धरणीधर रत्नाळीकर | २००/- |
| : डॉ नोह जे. गोल्डस्टेन/स्टीव्ह जे. मार्टिन/रॉबर्ट बी. सीअलडिनी | | |
| **धन्वंतरी घरोघरी :** | डॉ. ह. वि. सरदेसाई<br>डॉ. अनिल गांधी | १५०/- |
| **तुला आठवताना... :** जॉन ग्रे | अनु. शुभदा विद्वांस | ३००/- |
| **चिंता सोडा सुखाने जगा** | अनु. ॲड.शुभदा विद्वांस | २००/- |
| : डेल कार्नेजी | | |
| **मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा** | अनु. ॲड.शुभदा विद्वांस | २००/- |
| : डेल कार्नेजी | | |
| **श्रीमंत लोकांचे पाच नियम** | अनु. प्रशांत तळणीकर | २९०/- |
| : डॉ. सुधीर दीक्षित | | |

## व्यवस्थापन

| | | |
|---|---|---|
| **द सिक्स व्हॅल्यू मेडल्स** | अनु. सुभाष जोशी | १२०/- |
| : एडवर्ड डी बोनो | | |

## विज्ञान लेख

| | | |
|---|---|---|
| **शास्त्रज्ञांचे जग** | निरंजन घाटे | २००/- |

## प्रवासवर्णनपर

| | | |
|---|---|---|
| **चाय, चाय** | अनु. पूर्णिमा कुंडेटकर | १५०/- |

## संदर्भग्रंथ

**शब्दचर्चा** डॉ. म. बा. कुलकर्णी ३५०/-

## अध्यात्मिक

**संवाद परमेश्वराशी:** नील डोनाल्ड वॉल्श अनु. डॉ. वृषाली पटवर्धन २४०/-

## चिकन सूप मालिका

**चिकन सूप फॉर द पेरेंट्स सोल :** अनु. प्रज्ञा ओक २५०/-
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन,
किंबर्ली किर्बर्जर, रेमंड आरॉन

**चिकन सूप फॉर द सोल भाग-४** अनु. उषा महाजन २५०/-
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन,
हॅनाह मॅकार्टी, मेलडी मॅकार्टी

**चिकन सूप फॉर द सोल भाग-५** अनु. उषा महाजन ३००/-
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन

**चिकन सूप फॉर द सोल भाग-६ :** अनु. उषा महाजन २५०/-
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन

**चिकन सूप फॉर द ग्रँड पेरेंटस सोल :** अनु. शीला कारखानीस २८०/-
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, मेलडी मॅकार्टी,हॅनॉक मॅकार्टी

**चिकन सूप फॉर द सोल :** अनु. सुनीति काणे २८०/-
डेली इन्स्पिरेशन्स फॉर विमेन
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, मर्सिया हिगिन्स व्हाइट

## एकांकिका

**सुट्टी आणि इतर एकांकिका** द. मा. मिरासदार ७०/-

**गाणारा मुलुख** द. मा. मिरासदार ४०/-

## वगनाट्य

**मी लाडाची मैना तुमची** द. मा. मिरासदार ७०/-

## पंचतंत्र मालिका

**पंचतंत्रातील सुरस गोष्टी** निर्मला मोने ५०/-

❐

# Mehta Publishing House - English Books

| Book Name | Author | Price (Rs.) |
|---|---|---|
| An Introduction to Linguistic Theories | S. V. Shastri/ L. M. Goud | 90 |
| Untouchable | Mulk Raj Anand | 60 |
| Two on a Tower | Thomas Hardy | 100 |
| Plenty For All | S. A. Dabholkar | 400 |
| Indian English Poems | Ed.by Dr. Shirish Chindhade | 50 |
| Selected English Essays | Ed. by Dr. Shirish Chindhade | 50 |
| Glimpses of Changing Banking Scenario | P. N. Joshi | 300 |
| The Breadwinner | Deborah Ellis | 120 |
| Parvana's Journey | Deborah Ellis | 120 |
| Mud City | Deborah Ellis | 120 |
| Salt & Honey | Candi Miller | 200 |
| Call Centre : An Inside Story | Vikrant Shukla | 250 |
| The Myth Called Wealth | Rajesh Wattamwar | 150 |
| Master your Mind | Dr. Neel Burton | 200 |
| The Meaning of Madness | Dr. Neel Burton | 225 |
| Plato's Shadow | Dr. Neel Burton | 250 |
| Cancer Care and Mysteries and Yoga | Dr. Nitin Unkule | 295 |
| Japanese Magnolia | Rei Kimura | 299 |
| Japanese Orchid | Rei Kimura | 249 |
| Awa Maru - Titanic of Japan | Rei Kimura | 149 |
| Speeches that Reshaped the World | Alan J. Whiticker | 300 |
| Speeches of War and Peace | Larry Buttrose | 300 |
| One Foot Wrong | Sofie Laguna | 200 |
| Never to Return | Sandy Reid | 255 |
| Schapelle | Tony Wilson | 280 |
| Fifty Years Of Silence | Jan Ruff-O'Herne | 300 |
| Betrayed | Latifa Ali with Richard Shears | 400 |

| | | |
|---|---|---|
| Why My Third Husband Will Be a Dog | Lisa Scottoline | 400 |
| Parenting The Office | Doris S. Davidoff<br>Philip G. Davidoff<br>Donald M. Davidoff<br>Douglas G. Davidoff | 350 |
| The Wrong Chase | Laxmi Natraj<br>Vikrant Shukla | 300 |
| The Fountain's Magic | Marya Rahator | 140 |
| In The Hands of Taliban | Joanie de Rijke | 250 |
| The Spare Room | Helen Garner | 250 |
| Like A Willow Tree | Rei Kimura | 400 |

## Forthcoming English Books

| | |
|---|---|
| Gayatri's Maths Mantra | Gayatri Lodha |
| Travelling To Infinity | Jane Hawking |
| Novgorod Diary | Gabriel Timar |
| Slumboy | Mouhssine Ennaimi |
| Why I Am Still Married | Karen Propp And<br>Jean Trounstine |
| Kiss Of Saddam | Michelle McDonald |
| The Women On The Mountain | Sharyn Munro |
| Paper Cranes | Cheryl Koenig |
| Mr. Two Bomb | William Coles |
| Shattered Silence | Melissa G. Moore<br>& M. Bridget Cook |
| The Women Before Me | Ruth Dugdall |
| A Note from Ichiyo | Rei Kimura |
| Poppy | Gregor Salmon |
| Healthy Habits for a Fit Family | J.Ron Eaked, MD |
| Closer | Jim and Cathy Burns |
| The Gift | Amit Desai |

❐



# ओळख लेखकांची

# रणजित देसाई

**जन्म : ८ एप्रिल १९२८**
**मृत्यू : ६ मार्च १९९२**

उमदा, दिलदार मनाचा एक थोर साहित्यिक. रणजित देसाईंचे साहित्य म्हणजे वाचकांशी उच्च भावनिक स्तरावर साधलेला कलात्मक संवाद. महाराष्ट्रातील या थोर, सर्जनशील प्रतिभावान साहित्यिकाचा जन्म कोल्हापुर जिल्ह्यातील कोवाड येथील एका संपन्न खानदानी कुटुंबात झाला. शिक्षणानंतर कोवाडला स्थायिक झाल्यावर तिथल्या निसर्गरम्य वातावरणात त्यांनी लेखन-वाचन हा छंद जोपासला. १९४६ मध्ये 'प्रसाद' या मासिकात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'भैरव' या पहिल्याच कथेला पारितोषिक मिळाले. १९५८ साली त्यांचा 'रूपमहाल' हा पहिलाच कथासंग्रह प्रकाशित झाला. त्याच सुमारास 'बारी' ही कादंबरी लिहून त्यांनी कादंबरीक्षेत्रात पहिले पाऊल टाकले. त्यांनी ऐतिहासिक, सामाजिक, पौराणिक या विषयांबरोबरच चरित्रकहाणी हा कादंबरीचा नवा प्रकार हाताळला आणि आपल्या समर्थ लेखणीने तो लोकप्रियही केला. चरित्रकादंबरीसाठी त्यांनी निवडलेल्या व्यक्ती सर्वसामान्य वर्गात न बसणाऱ्या, असामान्य कर्तृत्व असलेल्या आहेत. 'स्वामी'या त्यांच्या कादंबरीला अफाट लोकप्रियता मिळाली. या कादंबरीत त्यांनी थोरले माधवराव पेशवे व त्यांच्या पत्नी रमाबाई यांच्यातील कोमल भावबंध लोकांसमोर मांडला. या कादंबरीवर लोकांनी जिवापाड प्रेम केलेच, त्याचबरोबर रणजित देसाई यांना 'स्वामीकार' हा किताबही बहाल केला. कथालेखन करताना देसाई यांनी प्रथमच जाणीवपूर्वक प्राणिकथा लिहिल्या. या कथांमधून निसर्ग, माणूस, आणि प्राणी यांचा अतूट संबंध त्यांनी फारच प्रभावीपणे मांडला.
'स्वामी' या कादंबरीला राज्य पुरस्कार, ह. ना. आपटे पुरस्कार आणि साहित्य अकादमी पुरस्कार मिळाले. रणजित देसाई यांनी अनेक प्रादेशिक साहित्यसंमेलनांचे अध्यक्षपद भूषविले. साहित्यक्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल केंद्र शासनाने त्यांना 'पद्मश्री' हा किताब बहाल करून सन्मानित केले.

## पद्मश्री रणजित देसाई यांची साहित्यसंपदा

| **कादंबरी** | **किंमत** |
|---|---|
| स्वामी | १९० |
| (राज्य पुरस्कार १९६२, ह.ना. आपटे पुरस्कार १९६३, साहित्य अकादमी पुरस्कार १९६४) | |
| श्रीमान योगी | ४८० |
| अभोगी | १८० |
| राधेय | २०० |
| पावनखिंड | १२० |
| माझा गाव | २०० |
| समिधा | १२० |
| बारी | १५० |
| राजा रविवर्मा | ३२० |
| प्रतिक्षा | १०० |
| शेकरा | ७० |
| लक्ष्यवेध | ११० |

| **कथासंग्रह** | **किंमत** |
|---|---|
| रुपमहाल | ९० |
| मधुमती | ९० |
| कमोदिनी | १२० |
| आलेख | १२० |
| गंधाली | १४० |
| मोरपंखी सावल्या | आ.सं. |
| कातळ | ९० |
| मेघ | १०० |
| आषाढ | ८० |
| वैशाख | ९० |
| प्रपात | १०० |
| संकेत | ८० |
| बाबुलमोरा | १२५ |
| मेख मोगरी | ७० |

| नाटके / एकांकिका | किंमत |
|---|---|
| स्वामी | आ. सं. |
| वारसा | आ. सं. |
| हे बंध रेशमाचे | आ. सं. |
| रामशास्त्री | आ. सं. |
| धन अपुरे | आ. सं. |
| गरुडझेप | आ. सं. |
| श्रीमानयोगी | ६० |
| लोकनायक | आ. सं. |
| संगीत तानसेन | आ. सं. |
| कांचनमृग | ४० |
| पंख जाहले वैरी | आ. सं. |
| पांगुळगाडा | आ. सं. |
| तुझी वाट वेगळी | ६० |
| सावली उन्हाची | ५० |

| ललित | किंमत |
|---|---|
| स्नेहधारा | आ. सं. |
| संचित | आ. सं. |
| (निवडक अध्यक्षीय भाषणे) | |

## रणजित देसाई यांच्या 'स्वामी' या पुस्तकातील काही भाग

दोन प्रहरची वेळ टळली होती. सूर्य झरझर पश्चिम क्षितिजाकडे झुकत होता. शनिवारवाड्याच्या दिल्ली दरवाज्यावरील नगारखान्यावर भगवा झेंडा मोठ्या डौलाने फडफडत होता. दोन्ही बाजूंच्या चिरेबंद बुरुजांच्या रखवालीत उभा असलेला खिळेबंद बुलंद दिल्ली दरवाजा सताड उघडा होता. शनिवारवाड्याच्या त्या उत्तराभिमुख प्रवेशद्वारावर छबिन्याचे शिपाई शिस्तीत उभे होते.

गंगोबातात्या शनिवारवाड्याकडे झरझर पावले टाकीत जात होते. किडकिडीत देहयष्टीचे, भेदक डोळ्यांचे गंगोबातात्या शनिवारवाड्यासमोर आले, मान वर करून त्यांनी एकवार नगारखान्यावर फडफडणाऱ्या भगव्या झेंड्याकडे नजर टाकली आणि ते पायऱ्या चढू लागले.

गंगोबातात्या हे बडे प्रस्थ होते. होळकरांचे सरदार, विश्वासू असा त्यांचा लौकिक होता. राघोबादादांची गंगोबातात्यांवरील मर्जी साऱ्यांना ज्ञात होती. पायऱ्या चढत येणाऱ्या गंगोबांना पाहताच दिल्ली दरवाज्याच्या आत उभे असलेले खासगी चिटणीस दत्तोपंत पुढे झाले. मस्तकी पगडी, अंगात मलमली अंगरखा, धोतर व पायी जोडा परिधान केलेले गंगोबा नजीक येताच दत्तोपंतांनी त्यांना मोठ्या अदबीने नमस्कार केला. त्या नमस्काराचा स्वीकार करून गंगोबांनी विचारले,

"दरबार सुरू झाला?"

"नाही;" दत्तोपंत म्हणाले, "पण दरबार भरला आहे. श्रीमंत अद्यापि दरबारात आले नाहीत."

गंगोबा हसत म्हणाले,

"दत्तोपंत! तुम्ही नवीन माणसे, तुम्हांला कल्पना नाही यायची."

"कसली?"

"नानासाहेबांच्या वेळी असायला हवं होतं तुम्ही. काय तो थाट! काप गेला आणि भोकं तेवढी राहिली, अशी अवस्था झाली आहे. आता तो रुबाब तर गेलाच आणि त्याबरोबर शिस्तही!"

दत्तोपंत काही बोलले नाहीत. क्षणभर थांबून गंगोबा आपले जरीउपरणे सारखे करीत म्हणाले,

"वेळ झाली. जायला हवं. नाहीतर श्रीमंत दरबारी हजर व्हायचे. त्यांच्यामागून आम्ही तेथे हजर व्हायचे आणि सारा दरबार आम्हांला न्याहाळायचा."

केलेल्या विनोदावर गंगोबातात्या खूश होऊन स्वत:च हसले; पण

दत्तोपंतांच्या चेहऱ्यावरची रेषाही ढळली नाही. गंगोबांनी एकवार आपल्या भेदक नजरेने दत्तोपंतांकडे पाहिले आणि दिल्ली दरवाज्याच्या रोखाने ते वळले. दत्तोपंत खाकरले आणि त्यांनी हाक मारली,

''तात्या!''

गंगोबा वळले.

''काय?''

''तात्या, आपल्याला ह्या दरवाज्यातून जाता येणार नाही.'' दत्तोपंत एकदम म्हणाले,

''म्हणजे?'

''कालच श्रीमंतांची सक्त ताकीद आहे, की ज्यांना दिल्ली दरवाज्यातून येण्या-जाण्याचा मान असेल, त्यांनाच प्रवेश द्यावा. तात्या, राग मानू नका; पण आपण गणेश दरवाज्यातून जावं, हे ठीक.''

स्वत:ला सावरीत गंगोबातात्या म्हणाले,

''अस्सं, अस्सं! ठीक. जशी श्रीमंतांची आज्ञा. आम्ही गणेश दरवाज्याने जाऊ.'' आणि एवढे बोलून ते भरभर पायऱ्या उतरू लागले. पायऱ्या उतरत असता त्यांच्या पुणेरी जोड्याचा चटचट आवाज उठत होता.

पूर्वाभिमुख गणेश दरवाज्यातून गंगोबा आत गेले. अर्ध्या वाड्याला पायी फेरा घालावा लागल्यामुळे त्यांच्या जोड्यावर धूळ माखली होती. फरशीवर पाय झटकून ते आत शिरले आणि गणेशमहालाकडे चालू लागले.

गणेशमहालात दरबार भरला होता. पेशवाईचे सारे सरदार, मानकरी आपापल्या बैठकीवर बसले होते.

सहजासहजी कवेत मावू नयेत, एवढ्या जाडीचे शिसवी सुरूदार खांब आपल्या नाजूक कोरीव कामाने आणि काळ्याशार तकाकीने मन चटकन आकर्षून घेत होते. एकमेकांना समांतर अशा हारीत उभे असलेले ते खांब आणि त्यांनी तोललेले लाकडी छत मसनदीच्या बाजूकडे हळूहळू निमुळते होत गेले होते आणि त्याचीच एक बाजू मेघडंबरीच्या रूपाने खाली उतरली होती. त्या मेघडंबरीच्या खाली भव्य गणेशमूर्ती होती. मूर्तीच्या पायांशी पेशव्यांची मसनद होती. गणेशमहालाच्या चौफेर भिंतीवर रामायण-महाभारतांतील निवडक प्रसंग दखनी कलेत चितारले होते.

गणेशमहालाच्या प्रवेशद्वारापासून पेशव्यांच्या मसनदीपर्यंत तांबडी पायघडी अंथरली होती. मसनदीच्या दोन्ही बाजूंना सरदार-दरकदार यांच्यासाठी बैठका सजवल्या होत्या.

दबल्या आवाजात एकमेकांशी बोलण्यात सरदार मंडळी गर्क

असतानाच मसनदीच्या डाव्या बाजूला असलेल्या चिकाच्या पडद्यांची हालचाल झाली. क्षणात दरबारात स्तब्धता पसरली. त्याच वेळी भालदार-चोपदारांनी दिलेली ललकारी साऱ्यांच्या कानांवर आली :

**"ब-आदब बा मुलाहिजा होश्शी ऽ या ऽऽ र!**
**निगा रखो ऽऽ!**
**खास उल खास जू अल इख्तिदार शाने दौलत, वफाए मुल्क,**
**दिनायते दख्खन्, शरियेत पनाह, स्वारी राजमंडल पेशवा,**
**फिद्वीय श्रीमत् महाराज सिंहासनाधीश्वर, क्षत्रिय कुलावतंस**
**छत्रपति रामराजा महाराज विश्वासनिधि सकल राजकार्यधुरंधर,**
**राजश्रीया-विराजित श्रीमंत माधवराव बल्लाळ पंतप्रधा ऽऽ न**
**तशरीफ लाते हैं। ऽऽ"**

त्या ललकारीबरोबर साऱ्यांच्या नजरा प्रवेशद्वाराकडे लागल्या. भालदार-चोपदार संथ पावले टाकीत आत आले. चोपदाराने हातातला रुपेरी गुर्झब तोलीत पुकारले,

**"खडी ताजिम, निगा रखो महाराज ऽऽ!"**

सारा दरबार खाडकन उभा राहिला आणि श्रीमंत माधवराव पेशवे दरबारात प्रवेश करते झाले. क्षणात साऱ्यांच्या नजरा झुकल्या. चोपदार पुकारत होता :

**"आस्ते कदम, महाराज ! नजर बर्क्दम होश्शिया ऽऽ र ऽऽ"**

मखमली पायघड्यांवरून धीमी धीमी पावले टाकीत माधवराव मसनदीकडे जात होते. दुतर्फा उभे असलेले सरदार, मानकरी, मनसबदार यांचे मुजरे पेशव्यांच्या प्रत्येक पावलागणिक झडत होते. मोठ्या डौलात मान झुकवून माधवराव मुजऱ्यांचा स्वीकार करीत पुढे जात होते. हिरव्या मखमलीने आच्छादलेल्या मसनदीपुढे येताच माधवरावांचे पाऊल थबकले. क्षणभर स्थिर नजरेने त्यांनी समोरच्या गणेशाकडे पाहिले आणि दुसऱ्याच क्षणी भानावर येऊन मोठ्या निष्ठेने मसनदीला मुजरा केला. वीरासन घालून त्यांनी मसनदीवर बैठक घेतली.

सारा दरबार आपल्या जागी स्थानापन्न झाला. साऱ्यांच्या नजरा पेशव्यांकडे वळल्या.

वयाने फार तर सोळा वर्षांची उमर. अद्यापि कोवळ्या मिसरुडांचा काळा रंग ओठावर फाकला नव्हता. गौरवर्णाची, सडसडीत, पण पीळदार

अंगलटीची, रेखीव चेहऱ्याची माधवरावांची मूर्ती आपल्या तीक्ष्ण नजरेने दरबार न्याहाळीत होती. मस्तकावरील पगडीवर हिऱ्यांचा शिरपेच शोभत होता. पगडीवरच्या मोत्यांच्या तुऱ्याच्या झुरमुळ्या कानाला स्पर्श करीत होत्या. कानात चौकडा, गळ्यात टपोऱ्या मोत्यांचा कंठा शोभत होता. अंगात घातलेल्या तलम निम्याच्या आतील किनखापाच्या बंडीची वेलपत्ती स्पष्ट दिसत होती. वीरासन घालून बसल्यामुळे चुणीदार पायजमा अंगरख्याखाली झाकून गेला होता.

माधवरावांनी दरबारावर नजर फिरवली. नजरेला नजर भिडताच त्रिंबकराव पेठे आपल्या जागेवरून पुढे आले. माधवरावांच्या शेजारी ते येताच माधवरावांनी विचारले,

"मामा, आता दरबाराच्या कामकाजाला सुरुवात होऊ द्या."

"पण..." त्रिंबकमामा अडखळले.

"पण काय?" माधवरावांनी विचारले.

त्रिंबकराव पुढे वाकले आणि कुजबुजत म्हणाले,

"अद्यापि दादासाहेबांची स्वारी आली नाही."

"मग?"

"आणि सखारामबापूही..."

पेशव्यांनी पाहिले, उजव्या बाजूच्या मसनदीलगतच्या दोन्ही जागा रिकाम्या होत्या. माधवरावांच्या कपाळीचे गंध आठ्यांनी मिटले गेले. ते शांत स्वरात म्हणाले,

"मामा, दरबाराला सुरुवात होऊ दे!"

"आज्ञा!" म्हणत मुजरा करून त्रिंबकरावमामा तीन पावले मागे सरकले. आणि अचानक सारा दरबार उभा राहिला. माधवरावांनी पाहिले. राघोबादादा तडफेने आत येत होते. पाठोपाठ सखारामबापू बोकील कमरेचा बस्ता सावरीत प्रवेश करीत होते. दरबाराचे मुजरे स्वीकारीत राघोबादादा आपल्या जागी गेले. श्रीमंतांच्या डाव्या हाताला सखारामपंत येऊन उभे राहिले. ते म्हणाले,

"श्रीमंत..."

ते न ऐकलेसे करून माधवराव म्हणाले,

"बापू, दरबार खोळंबला आहे. कामकाजाला सुरुवात होऊ द्या!"

"जशी आज्ञा!" बापू म्हणाले.

खंडेराव दरेकरांनी जादा घोड्यांसाठी अर्ज पेश केला. तो मंजूर झाला. नारो आप्पाजी तुळशीबागवाल्यांनी शहर सुधारण्यासाठी जादा रकमेची मागणी केली. ती मान्य केली. गोपळराव पटवर्धनांनी मिरजेचा वृत्तान्त आणला होता.

तो श्रीमंतांनी ऐकला. घरच्या मंडळींचे क्षेमसमाचार श्रीमंतांनी जातीने विचारले.

दरबाराची कामे संपत आली आणि अचानक दिनकर महादेव उभा राहिला. सखारामबापूंच्या कपाळावर आठ्या पडल्या. मुजऱ्याचा स्वीकार करून श्रीमंतांनी आज्ञा करताच दिनकर महादेव म्हणाला,

''कसूर माफी असावी. श्रीमंतांच्या सेवेत घडली तेवढी सेवा आजवर केली. आता वयामुळे एवढी मोठी जबाबदारी पेलणे अशक्य आहे. तरी जवाहीरखान्याच्या देखरेखीतून मुक्तता व्हावी, एवढीच विनंती...''

माधवराव हसले व म्हणाले,

''दिनकरराव, असे किती वय झाले आहे, की तुम्हांस ह्या कामाचा बोजा वाटावा?''

''मी श्रीमंतांना जे सांगितले, ते सत्य आहे. हे मोठे जबाबदारीचे काम... ते निभावणे...''

सखारामबापू म्हणाले,

''दिनकरराव, हा प्रश्न तुम्ही दरबारी उपस्थित करण्याचे काहीच प्रयोजन नव्हते.

ते तुम्ही आम्हांला सांगितले असतेत, तरी चालले असते. आम्ही आपल्या अर्जाचा विचार करू आणि योग्य वाटल्यास सेवेतून मुक्तता करू...''

''पण, श्रीमंत...'' दिनकरराव बापूंच्याकडे न पाहता माधवरावांना म्हणाला.

''तुम्ही बसा...'' सखारामबापू म्हणाले, ''हा पेशव्यांचा दरबार आहे. खासगी सल्लामसलतीचे ठिकाण नव्हे. तुमच्यासारख्या अनुभवी माणसाला सांगायला पाहिजे, असे नाही!''

माधवराव खालच्या मानेने हा संवाद ऐकत, हातातले गुलाबाचे फूल हुंगत बसले होते. त्यांनी एकदम मान वर केली आणि ते म्हणाले,

''तेच म्हणतो आम्ही.''

बापूंनी चमकून माधवरावांच्याकडे पाहिले.

माधवरावांच्या चेहऱ्यावरचे मार्दव कुठल्या कुठे नाहीसे झाले होते. चेहरा उग्र झाला होता. त्यांचा आवाज चढत होता...

''सखारामबापू, आपणही ते लक्षात ठेवावयास हवे. जेव्हा आमच्यासमोर अर्ज पेश केला जातो, तेव्हा त्याचा निर्णय आम्ही करायचा. गरज लागल्यास आपणांकडून आम्ही सल्ला घ्यायचा, ही रीत आहे. आम्ही उपस्थित असता आमचे निर्णय आपण देऊ नये. तसे घडले, तर ते दरबारच्या रीतीस सोडून होईल!''

''आज्ञा!'' सखारामबापूंनी मान खाली घातली.

''बोला, दिनकरराव, कशाचाही मुलाहिजा न ठेवता, तुम्ही आम्हांस सेवानिवृत्तीचे कारण सांगा. आम्ही ते जरूर ऐकू.''

क्षणभर थांबून दिनकरराव म्हणाले,

''श्रीमंत! पेशव्यांचा जवाहीरखाना म्हणजे फार मोठी जबाबदारी. सणा-सुदीला खाशा स्वाऱ्यांच्याकडे अनेक नग जातात-येतात. त्यांच्या लेखी पावत्या आल्या नाहीत, तर घोटाळे होण्याचा संभव अधिक. एक दागिना गहाळ झाल्याने पेशव्यांचा जवाहीरखाना रिकामा होणार नाही; पण माझ्यासारखा सामान्य माणूस जन्मातून उठेल...''

''गरजेनुसार केलेल्या मागण्या लेखीच असतात आणि त्या पोहोचल्याच्या पावत्याही असतात ना? मला वाटतं, तसाच रिवाज आहे.''

''हो. पण तसा पाळला जात नाही.'' दिनकरराव सांगून मोकळे झाले.

राघोबा एकदम उभे राहिले. त्यांचा चेहरा संतापाने फुलला होता. ते म्हणाले,

''असे आडून बोलण्यापेक्षा, दिनकरराव, तुम्ही उघडच का नाही सांगत? सांगा ना, आम्ही पावत्या दिल्या नाहीत, म्हणून!''

सारा दरबार या अनपेक्षित कलाटणीने आश्चर्यचकित झाला होता. रागाने बेभान झालेल्या राघोबांच्या धिप्पाड मूर्तीकडे सारा दरबार एकटक बघत होता.

माधवरावांनी चमकून राघोबादादांच्याकडे पाहिले.

सखारामबापू गडबडीने म्हणाले,

''दिनकरराव, तुम्ही अर्ज मागे घ्या. दप्तरीच्या नियमांना अपवाद असतात. विश्वास आणि माणसे पाहून हे नियम पाळायचे असतात.''

दिनकरराव उभ्या जागी थरथरत होता.

''बापू!'' माधवराव मसनदीवरून उठत म्हणाले, ''ही पेशव्यांची मसनद आहे, ह्याचा विसर पडू देऊ नका. तिचा अपमान कुणी करू धजेल, तर तेथे वयाचा, मानाचा वा अधिकाराचा मुलाहिजा आम्हांला ठेवता येणार नाही! दिनकरराव, तुम्ही म्हणता, ते ठीक आहे; पण नियमांना अपवाद असतात, ते अपघाताने... आजवर चालत आलेली जवाहीरखान्याची शिस्त अशीच पुढे चालू ठेवा. खुद्द पेशवेदेखील त्या नियमांना अपवाद ठरू नयेत. ह्या आज्ञेची तामिली आजपासून जारी करा!''

पाहता पाहता माधवराव उठले आणि दरबाराला समजावयाच्या आत चालू लागले. भालदार, चोपदार मागोमाग धावले. दरबार उभा राहीपर्यंत माधवराव गेलेही!

साऱ्या दरबारात कुजबूज सुरू झाली. संतप्त राघोबा सखारामबापूंसह दरबारातून बाहेर पडले.

दरबार संपला.

माधवरावांचा चेहरा संतापाने लालबुंद झाला होता. गणेशमहालातून बाहेर पडताच ते वळले. आठ कारंजांच्या हौदाची कारंजी उडत होती; पण तिकडे लक्ष न देता, ते सरळ बकुळीचा हौद ओलांडून होमशाळेसमोर आले. तेथून उठणारा आवाज ऐकून एकदम त्यांनी पावले वळवली आणि ते फडाच्या चौकात आले. एवढ्यात दरबार संपेल, अशी कुणाचीच कल्पना नसल्याने वाटेवर गाफीलपणे बसलेले नोकरचाकर माधवरावांना पाहताच गोंधळून गेले होते. फडात रंगात आलेल्या गप्पा माधवरावांना पाहताच कुठल्या कुठे लोपल्या. तिकडे लक्ष न देता, माधवराव चाफेखण ओलांडून सरळ गोपिकाबाईंच्या महालाकडे जाऊ लागले. गोपिकाबाईंच्या महालानजीक जाताच त्यांची पावले थबकली. दारापाशी उभ्या असलेल्या मैना दासीने मान खाली घातली आणि ती अदबीने उभी राहिली.

''मैना! मातोश्री आहेत ना?'' माधवरावांनी विचारले.

''जी! आता हेच आल्यात, जी.''

''आणि तू येथे कशी?''

''बाईसाहेब आल्यात, जी.''

''मातोश्रींना निरोप दे. सांग, आम्ही आलोय्, म्हणून!''

'जी!' म्हणून मैना आत गेली. काही क्षणांत ती बाहेर आली. मण्यांचा पडदा बाजूला सरकवून माधवराव आत गेले. त्यांनी पाहिले, तो डाव्या हाताला, बैठकीवर त्यांच्या मातोश्री गोपिकाबाई बसल्या होत्या. त्यांचा गौरवर्ण चेहरा प्रसन्न दिसत होता. वय फार झाले नसताही वैधव्याच्या वसनांनी त्या पोक्त वाटत होत्या. माधवराव जवळ गेले आणि त्यांनी गोपिकाबाईंच्या पायांना स्पर्श केला. गोपिकाबाई म्हणाल्या,

''औक्षवंत व्हा! बसा!''

माधवराव बसले. त्यांनी पाहिले, तो गोपिकाबाईंच्या बाजूला त्यांची दासी विठी उभी होती आणि विठीशेजारी डोक्यावरून पदर घेतलेली एक किशोरी संकोचाने उभी होती. तिच्या आरक्त पावलांकडे माधवरावांची नजर गेली. डाव्या पायाचा अंगठा गालिच्यावर मुरडून, ती पदर सावरून उभी होती. माधवराव चपापले. अर्धवट उठत ते म्हणाले,

''क्षमा असावी! मला माहीत नव्हते, आपल्याकडे कोणी आले असेल, म्हणून! पुन्हा येईन मी.''

गोपिकाबाई त्या वाक्याने प्रसन्नपणे हसल्या. विठीही तोंड वळवून हसत होती.

माधवरावांनी चमकून मैनेकडे पाहिले. तीही हसत होती. माधवराव गोंधळले.

गोपिकाबाई म्हणाल्या,

''पेशव्यांना आपल्या पत्नीची ओळख पटू नये, हे नवल म्हणायचे. सूनबाई, आरती आण!''

विठीने आतून आरतीचे साहित्य आणले. माधवराव गोरेमोरे झाले. त्यांनी वर पाहिले. रमाबाई आरती घेऊन उभ्या होत्या. पदरातून त्यांचा चेहरा किंचित मोकळा झाला होता. माधवराव ते सौंदर्य पाहत होते. त्यांनी रमाबाईंना आजवर पाहिले होते. परकरी रमा त्यांची सौंगडी होती. पेशवेपदावर आल्यानंतर पैठणी-शालू नेसलेलीही रमा पाहिली होती; पण आज समोर उभ्या असलेल्या रमेचे सौंदर्य– ते आगळे होते. सोनचाफी वर्णाच्या रूपवती रमाबाई उभ्या होत्या. आरतीच्या प्रकाशात त्यांच्या नाजूक गळ्यातील हिऱ्यांचा लफ्फा चमकत होता. दंडात सुवर्णाच्या गोफविणीची वाकी होती. तिच्या चौफुल्यावर बसवलेले खडे चमकत होते. नाकातील नथ चांदण्या फेकीत होती.

भानावर येऊन माधवरावांनी पुढे केलेला विडा हाती घेतला. आरती झाली.

''पण कशासाठी ओवाळलं, ते नाही समजलं...'' माधवरावांनी हसून विचारले.

''माधवा, आजचा दिवस तसाच आहे. पेशव्यांच्या गादीवर बसून महिने लोटले, तरी खऱ्या अर्थानं आजचं खरं ओवाळणं झालं.''

''मी नाही समजलो.''

''आज शनिवारवाड्यात पेशवा आल्यासारखं वाटलं. गेल्या दोन महिन्यांत माझी आशा संपत आली होती. आपल्या वडिलांच्या पुण्याईचं स्मरण तुम्हांला राहावं, विश्वासरावांचे भाऊ आपण शोभावे, एवढीच आमची इच्छा!''

''आपल्या इच्छेबाहेर का आम्ही आहो?''

''ते आम्हांला माहीत आहे, पण...''

विठी गडबडीने आत आली. म्हणाली,

''दादासाहेब महाराज...!''

''त्यांना आत येऊ द्या.'' गोपिकाबाई म्हणाल्या.

रमाबाईंनी पदर सावरला; माधवराव उठून उभे राहिले आणि राघोबादादा आत आले. आत येताच त्यांनी गोपिकाबाईंना मुजरा केला.

''मुजरा, वहिनीसाहेब!''

''औक्षवंत व्हा!''

राघोबांनी एकवार माधवरावांच्याकडे दृष्टिक्षेप केला. बैठकीवर ठेवलेल्या आरतीकडे पाहिले. त्या वेळी रमाबाईंनी वाकून त्रिवार नमस्कार केला. ओठांतल्या ओठांत आशीर्वाद देत राघोबांनी विचारले,

''आज माधवरावाला ओवाळलेत वाटते?''

''हो! दरबार झाला. आज पौर्णिमा ना?'' गोपिकाबाई म्हणाल्या.

''आणि तसा पराक्रमही करून आले आहेत. भर दरबारात आमचा उपमर्द. ही काही साधी गोष्ट नव्हे!''

''काका!'' माधवराव म्हणाले, ''मी आपला उपमर्द करू धजेन तरी कसा?''

खोटे हसत राघोबादादा म्हणाले,

''हं! उपमर्द म्हणजे आणखी काय असतो, ते तरी कळू द्या!''

''आम्हीही होतो तेथे.'' गोपिकाबाई म्हणाल्या, ''माधवाने आपला उपमर्द केला, असे आम्हांला वाटले नाही. आम्हांला वाटले, की माधवाचे दरबारातले वर्तन पाहून आपणांसही संतोष वाटला असेल.''

स्वत:ला सावरीत किंचित नरमाईच्या स्वरात राघोबादादा म्हणाले,

''जरूर! पण लहान तोंडी मोठा घास घेणे योग्य नव्हे. आज बापूंना बोलले, उद्या आम्हांलाही...''

''काका...'' माधवराव म्हणाले, ''बापू आणि आपल्यांतला फरक का आम्हांला कळत नाही?''

''माधवा, विसरतोस तू. पेशवाईची वस्त्रे तुला दिली, तेव्हाच सखाराम-बापूंनाही कारभाराची वस्त्रे मिळाली.'' राघोबांनी आठवण दिली.

''हो, पण ती पेशवाईची वस्त्रे नव्हेत; कारभाराची! कारभार ठरविणे हे पेशव्यांचे मर्जीचे काम नसेल, तर त्या पेशवाईला अर्थ काय?''

''म्हणजे आमच्या मताला आता किंमत राहिली नाही, असेच समजायचे ना?''

''काका!'' माधवराव व्यथित होऊन म्हणाले, ''तुम्ही आज्ञा करावी आणि आम्ही ती पाळावी, ह्यापरता आम्हांला आनंद नाही, हे आम्ही शपथेवर सांगतो. मी बापूंची माफी मागावी, अशी का आपली आज्ञा आहे?''

राघोबांचा चेहरा बदलला. ते हसत म्हणाले,

''नाही, माधवा, तसं कसं मी म्हणेन? मी तुझी परीक्षा पाहत होतो. आम्हांलाही आज आनंद वाटला. असंच कारभारात लक्ष घातलंस, तर

आम्हीही निश्चिंत होऊ. शक्य तितक्या लवकर या जबाबदारीतून मुक्त व्हावं, हीच आमची इच्छा आहे!'' आणि गोपिकाबाईंना मुजरा करीत ते म्हणाले, ''येतो आम्ही. बापू आमची वाट पाहत असतील.''

माधवरावांनी राघोबांना मुजरा केला. रमेने वाकून नमस्कार केला आणि राघोबा बाहेर पडले.

पाठोपाठ माधवरावांनी गोपिकाबाईंच्या चरणांना स्पर्श केला. गोपिकाबाईंनी विचारले,

''तुम्ही थेऊरला जाणार ना?''

''हो! रविवारी निघू. सोमवारी अभिषेक आटोपून मंगळवारी आपल्या दर्शनाला परत येऊ.''

''बरोबर कोण कोण येतंय्?''

''अद्याप निश्चित नाही; पण त्र्यंबकमामा, गोपाळराव आणि...''

''मग हिलाही घेऊन जा ना, तेवढेच दर्शनही होईल!''

माधवरावांनी एकवार रमेकडे नजर टाकली व ते म्हणाले,

''जशी आज्ञा!''

—आणि एवढे बोलून माधवराव बाहेर पडले.

महालामध्ये गोपिकाबाई, रमाबाई, विठी, मैना एवढ्याच होत्या, महालात हळूहळू अंधार पडत होता. गोपिकाबाई म्हणाल्या,

''विठी, समया पेटवायला सांगा!''

रमाबाई पुढे झाल्या आणि खाली वाकून नमस्कार करून म्हणाल्या,

''येते मी.''

पुढे वाकलेल्या रमाबाईंना आपल्याजवळ ओढून घेत गोपिकाबाई म्हणाल्या,

''काही नको जायला. बैस थोडी. मैना...''

''जी!''

''आज तुझ्या बाईसाहेबांची दृष्ट काढायला सांग. माझीच दृष्ट लागली असेल पोरीला!''

मैना हसत बाहेर गेली. विठी चारी कोपऱ्यांच्या समया पेटवीत होती. हळूहळू महालात उजेड फाकत होता. विठी फरफरणाऱ्या वाती वातेऱ्याने सारख्या करीत होती. त्या वाढत्या प्रकाशात गोपिकाबाई रमाबाईंचा चेहरा निरखीत होत्या.

हसऱ्या डोळ्यांनी आपल्या सासूची नजर पाहणाऱ्या रमाबाई खुदकन हसल्या आणि एकदम गोपिकाबाईंना बिलगल्या. त्यांना उराशी कवटाळीत गोपिकाबाई म्हणाल्या,

''असंच हसतमुखानं संसार करा. सुखी राहा!''

## नवे कोरे




# चिंता सोडा सुखाने जगा

मूळ लेखक

**डेल कार्नेजी**

अनुवाद

**ॲड. शुभदा विद्वांस**

२००रु. पोस्टेज २०रु.

डेल कार्नेजी ह्यांच्या बेस्टसेलर्स पुस्तकांच्या सुधारित आवृत्तीच्या सहा लाख प्रती नुकत्याच प्रकाशित झाल्या आणि लाखो लोकांना अकारण चिंता करण्याच्या सवयीतून मुक्तता मिळाली. डेल कार्नेजींनी १९९० साली व्यावहारिक पातळीवर आचारविचारांची जी सूत्रे सांगितली होती ती आज सुद्धा तेवढीच उपयुक्त आहेत.

तुमच्या व्यवसायासंबंधीच्या पन्नास टक्के चिंता तुम्ही ताबडतोब कमी करू शकता.

तुमच्या आर्थिक चिंता तुम्ही मिटवू शकता.

'निंदकाचे घर असावे शेजारी' ह्या उक्तीप्रमाणे टीकेचा फायदा करून घ्या.

दमणूक टाळा आणि चिरतरुण दिसा.

तुमच्या जागृतावस्थेतच एक तास अधिक मिळवा आणि

स्वत:ला जाणून घ्या, स्वत: म्हणून जगा.

लक्षात ठेवा, ह्या पृथ्वीतलावर तुमच्या सारखा दुसरा कोणीच नाही.

'चिंता सोडा सुखाने जगा' हे पुस्तक मूलभूत मानवी भावना आणि विचार ह्यांना हळुवारपणे हाताळते. हे पुस्तक वाचणे हा एक रोमांचकारक अनुभव आहे. यातील सूचना आचरणात आणणे फार सोपे आहे. त्यामुळे तुमच्यात आमूलाग्र बदल होईल. एवढेच नाही, तर तुम्ही अधिक उच्च प्रतीचे आयुष्य जगू शकाल.

## नवे कोरे

# मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा




मूळ लेखक

**डेल कार्नेजी**

अनुवाद

**ॲड. शुभदा विद्वांस**

२००रु. पोस्टेज २५रु.

तुम्हाला तुमच्या पसंतीचे काम हवे आहे का? ते तुम्हाला सहज मिळेल. तुम्हाला जे काम मिळाले आहे ते तुम्ही अवश्य घ्या आणि त्यामध्ये अधिक सुधारणा करा.

तुम्ही कोणत्याही संकटात सापडला असाल तर त्याचा उपयोग संधी म्हणून करा.

डेल कार्नेजी ह्यांच्या अजरामर आणि काळाच्या कसोटीला उतरलेल्या उपदेशांमुळे अगणित लोकांनी यशाचे शिखर गाठले आहे. त्यांना व्यावसायिक यश तर मिळालेच पण त्यांचे व्यक्तिगत आयुष्यही समृद्ध झाले.

'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा' हे पुस्तक तुम्हाला पुढील गोष्टी शिकवते.

लोकांना तुम्ही आवडावे म्हणून करायच्या सहा युक्त्या.

लोकांनी तुमच्याशी सहमत व्हावे म्हणून करायच्या बारा युक्त्या.

लोकांना राग न येऊ देता त्यांच्यात बदल घडवून आणण्याच्या सहा युक्त्या.

आणि आणखीही खूप काही.

'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा'
ह्या पुस्तकाचा जास्तीत जास्त लाभ घ्या.




*** डॉ. हरगोविंद खुराणा**

नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वंशाचे शास्त्रज्ञ डॉ. हरगोविंद खुराणा यांचे अमेरिकेत निधन झाले. डॉ. खुराणा यांना १९६८ साली रेण्वीय जीवशास्त्रामधील (मॉलिक्युलर बायॉलॉजी) त्यांच्या संशोधनासाठी मार्शल निरेनबर्ग आणि रॉबर्ट होली यांच्यासोबत संयुक्तपणे नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले होते. भारत सरकारनेही त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरविले होते.

सजीवांमध्ये पेशींची जनुकीय माहिती डीएनए, आरएनए याा सारख्या न्यूक्लिक ॲसिड्समध्ये साठवलेली असते. त्या न्यूक्लिड ॲसिडमधील न्यूक्लिओटाइड्स हे घटक पेशीतील प्रथिनांच्या संश्लेषणाचे कार्य कशा प्रकारे नियंत्रित करतात, हे समजण्यास डॉ. हरगोविद यांच्या संशोधनामुळे मदत झाली. पुन्हा पुन्हा येणारे दोन घटक असणारे आरएनए दोन वेगवेगळी अमिनो ॲसिड्स तयार करतात, हे डॉ. खुराणा यांनी शोधले. या संशोधनाच्या साह्याने त्यापूर्वीच्या निरेनबर्ग आणि लेडर यांच्या प्रयोगावरून सेरिन आणि ल्युसिन या ॲसिड्सच्या रचनेची माहिती मिळाली. अशाच प्रकारे तीन घटक असणारे आरएनए तीन वेगवेगळी अमिनो ॲसिड्स तयार करतात, हेही त्यांनी दाखवून दिले. त्यातूनच पुढे ऑलिगोन्यूक्लिओटाइड्सचे संश्लेषण करणारे ते पहिले शास्त्रज्ञ ठरले.

*** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्रीलाल शुक्ल**

अलिकडेच ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले हिंदी साहित्यिक श्रीलाल शुल्क यांचे प्रदीर्घ आजारानंतर लखनौ येथे निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. 'रागदरबारी' ही त्यांची साहित्यकृती खूप गाजली होती. १८ ऑक्टोबर रोजी उत्तर प्रदेशचे राज्यपाल बी.एल.जोशी यांच्या हस्ते त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार इस्पितळातच प्रदान करण्यात आला. राज्यपाल बी.एल.जोशी आणि मुख्यमंत्री मायावती यांनी शुक्ल यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख

व्यक्त केले आहे. शुक्ल यांच्या निधनाने हिंदी साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याचे उभयतांनी म्हटले आहे. शुक्ल यांनी ‘अज्ञातवास’, ‘विश्रामपूरका संत’ आणि इतर अनेक कादंबऱ्या लिहिल्या. स्वातंत्र्यानंतरच्या काळात नैतिक मूल्याचा जो ऱ्हास झाला, त्यावर त्यांनी आपल्या साहित्यकृतीत प्रकाश टाकला आहे.

*** ‘सकाळचे माजी संचालक प्रदीपकुमार खिरे**

‘सकाळ’चे माजी संचालक (एचआर अँड ऑपरेशन्स) प्रदीपकुमार खिरे (वय ५३) यांचे अल्पशा आजाराने खासगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी व मुलगी असा परिवार आहे. त्यांनी कोल्हापूर ‘सकाळ’मधून व्यवस्थापक म्हणून सुरवात केली. त्यानंतर त्यांनी मुंबई आणि पुणे येथे विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. सुमारे वीस वर्षे ते ‘सकाळ’शी संबंधित होते. ‘मनुष्यबळ विकास’ आणि ‘वृत्तपत्र व्यवस्थापन’ हे त्यांच्या अभ्यासाचे विशेष विषय होते.

*** ज्येष्ठ पत्रकार वा. दा. रानडे**

‘सकाळ’चे माजी संपादक व ज्येष्ठ पत्रकार वा. दा. रानडे (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मूळचे नगर जिल्ह्यातील असलेले रानडे यांचे कुटुंब १९३४ मध्ये पुण्यात आले.

१९४५ मध्ये ते विद्यार्थी चळवळीचे काम करणाऱ्या ‘नॅशनॅलिस्ट ग्रुप’मध्ये सहभागी झाले. त्यांचा पत्रकारितेचा प्रवास त्याच वर्षी ‘सकाळ’मधून सुरू झाला. ‘सकाळ’मध्ये त्यांनी प्रदीर्घ काळ सहसंपादक पदावर काम केले. अडतीस वर्षे पत्रकारिता केल्यानंतर १९८३ मध्ये ते निवृत्त झाले. १९८७ मध्ये त्यांनी ‘पुरोगामी विचार मंच’ स्थापन केला.

आंतरराष्ट्रीय राजकारण, घटनात्मक लोकशाही आणि निवडणूक हे त्यांचे लिखाणाचे आवडीचे विषय होते. ‘भाषावर प्रांतरचना व महाराष्ट्र’, ‘भारताचे लोकमत’, ‘बांगलादेश : एक नव्या राष्ट्राचा जन्म’, इतिहासाची पाने चाळता’, ‘संयुक्त आघाडीतून स्थिर सरकारकडे’ आदी पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. अपघाती निधन झालेल्या पत्नीच्या नावाने ‘वसुधा मनोविकास प्रतिष्ठान’ सुरू करून त्यांनी मानसोपचाराच्या कार्याला प्रोत्साहन दिले. ‘मनोमित्र’ हे मासिक त्यांनी बारा वर्षे चालविले.

*** जगन्नाथ नरहरी गंगावणे**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील निवृत्त रिजनल पर्सोनल मॅनेजर श्री.ज.न. गंगावणे (वय८६) यांचे कर्करोगाने निधन झाले. शेवटपर्यंत गंगावणे हे कार्यरत होते. त्यांच्या पश्चात ज्येष्ठ पशुतज्ज्ञ आणि कृषीशास्त्रज्ञ डॉ. सुरेश

गंगावणे, सुधीर गंगावणे ही मुले मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. त्यांना समाजकार्याची मोठी आवड होती. नावाला प्रसिद्धि न देण्याच्या अटीवर त्यांनी अनेक गरीब व गरजू मुलांना शैक्षणिक कार्यात सहयोग दिला होता.

आपण आपल्या गावाचे काही देणे लागतो या भावनेतून त्यांनी सिन्नर या आपल्या गावच्या सार्वजनिक वाचनालयास लोकांच्या वाचनाच्या आवडीस प्रोत्साहन म्हणून आणि हातभार म्हणून लाखो रुपयांची पुस्तके भेटीदाखल दिली.

याच सार्वजनिक हिताच्या भावनेतून त्यांनी नेत्रदान आणि देहदानाची इच्छा प्रदर्शित केली होती. या इच्छेचा आदर करीत त्यांच्या कुटुंबियांनी देसाई रुग्णालयास नेत्रदान आणि भारती विद्यापीठास मरणोत्तर देहदान केले आहे.

❒


**सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता**

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८.००
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

**नवे कोरे**

# रामायणातील पात्रवंदना




मूळ गुजराती लेखक

**दिनकर जोषी**

अनुवाद

**अंजनी नरवणे**

१८०रु. पोस्टेज २५रु.

आपण सर्वच जण लहानपणापासून रामायणातील गोष्टी ऐकत आलो. आजही कॉमिक्स, पुस्तकं, टीव्ही, चित्रपट या सगळ्या माध्यमांमधून आपण सगळेच रामकथा बघत, वाचत असतो.

भारतातील भाषांमध्ये व वेगवेगळ्या देशांमध्ये मिळून तीनशेच्या वर लहान मोठी रामायणं लिहिली गेली आहेत. बौद्ध, जैन, मुस्लिम रामायणंही आहेत! अर्थात मूळ अधिकृत ग्रंथ महर्षी वाल्मिकी लिखितच.

बऱ्याचजणांना हे वाचून आश्चर्य वाटेल की वाल्मिकी रामायणाप्रमाणे श्रावणबाळाची कथा वेगळी आहे. जनक राजानं सीतेचं स्वयंवर मांडलंच नव्हतं, रावण अत्यंत विद्वान व धार्मिक शिवभक्त होता आणि कुबेराचा सावत्र भाऊ होता, लक्ष्मणानं 'लक्ष्मणरेषा' काढलीच नव्हती!

आणि मुख्य म्हणजे रामायणातल्या महत्त्वाच्या व्यक्तींचे स्वभाव, गुणदोष, कोणत्या घटनेत कोण कसं आणि का वागलं, विरोधाभास कोणते, या सर्वांचा आपण किती विचार करतो? या पुस्तकात तटस्थ भूमिकेतून, सर्वांबद्दल संपूर्ण आदर बाळगूनही सर्व व्यक्ती व घटनांचं सुंदर विश्लेषण केलं आहे.

ते वाचून, त्यावर विचार करून आपण केवळ अंधश्रद्धाळू न राहता डोळस आणि सश्रद्ध बनू शकतो.

आपल्या संस्कृतीची भागीरथी असणारं रामचरित्र नव्यानं समजून घेऊया!




मा. प्रकाशक

पुस्तक 'संवाद परमेश्वराशी' वाचले. मी Original पुस्तक वाचले आहे पण ह्या पुस्तकात जो 'जिवा ते शिवा' हा भाव आमच्यापर्यंत पोचविला आहे तो शब्दात वर्णन करता येण्यासारखा नाही... 'Conversations with God' हे समजायला थोडे जड गेले त्यामुळे काही paragraphs तसेच सोडून दिले गेले. 'संवाद परमेश्वराशी' हे पुस्तक समजायला अत्यंत सोपे वाटले. वृषाली ताईंनी हे पुस्तक नुसतेच अनुवादित केलेले नाही तर त्याला एक नवीन अर्थ दिला आहे. आयुष्याकडे बघायचा दृष्टीकोनच बदलला आहे.

दिप्ती डोंगरे

श्री. श्याम भुर्के

आपले 'आनंदाचे पासबुक' हे पुस्तक वाचले. क्लार्क ते उपमहाव्यवस्थापक या बँकेच्या प्रवासातील आठवणीने लिहिलेल्या घटना वाचून पुन्हा एकदा नोकरीच्या काळात डोकावता आले. मी महा. बँकेची पहिली महिला कर्मचारी आहे.

बऱ्याच वर्षांपूर्वी आपले 'सभेत कसे बोलावे' हे पुस्तक एका दमात वाचून काढल्याचा आनंद अजूनही आठवणीत आहे.

आपली यापुढेही प्रकाशित होणारी पुस्तके वाचण्यास उत्सुक आहे.

आपल्या पुढील लेखनास शुभेच्छा!

संगिता गोगटे

**नवे कोरे**

# शत्रूशी दोन हात




मूळ लेखक

**मोआइझम बेग**

सह लेखिका

**व्हिक्टोरिया ब्रिटन**

अनुवाद

**योगिनी वेंगुर्लेकर**

४००रु. पोस्टेज ३०रु.

ग्वांटानामो बे मधील छावण्यांमध्ये जे नऊ ब्रिटिश नागरिक डांबले गेले होते,
त्यापैकी मोआइझम बेग हे एक होते.
जो गुन्हा त्यांनी केलाच नव्हता आणि
ज्या गुन्ह्यांचं नेमकं स्वरूप कधीही स्पष्ट झालं नाही,
त्यासाठी त्यांना तिथे डांबून ठेवण्यात आलं.
९/११च्या हल्ल्यानंतर जे एक
वातावरण तयार झालं, त्या काळात पाकिस्तानमधे तात्पुरतं राहात असताना त्यांचं अपहरण करण्यात आलं.
मोआइझम बेग तीन वर्षं तुरुंगात राहिले.
यातला बराच मोठा काळ एकांतवासात गेला.
तिथे डांबलेल्या दोघांचे खून झाले त्याचे
ते प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होते. त्यांना
मृत्यूच्या धमक्या दिल्या गेल्या तसंच भयंकर छळालाही सामोरं जावं लागलं
२००५ साली कुठल्याही प्रकारचं स्पष्टीकरण वगैरे न देता किंवा त्यांची माफी न मागता त्यांची सुटका करण्यात आली.

# बालनगरी

अनुक्रमणिका


विद्याधरांचे दुकान १०५

चित्र रंगवा ११३




## भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी
## विद्याधरांचे दुकान

(मागील अंकावरून)

तो पळत, पळत त्या दोघींपाशी गेला. त्याने हसून पंडीला अभिवादन केले. तिचे त्याच्याकडे लक्ष नव्हते. तो आला तिथे पलिकडे काहीतरी नजरेने टिपायचा प्रयत्न ती करत होती, ओम 'तो माणूस' त्या दिवशी तू डेपोत हरवला होतास ना, तेव्हा तू उतरलास त्या बसमधून नंतर उतरून गेलेला.

ओम चमकला. बसमध्ये कोणी नाही याची त्याने पुरेपूर खात्री केलेली, पण कोणीतरी होतं म्हणून तो बघायला आत शिरलेला. अर्थात ही गोष्ट त्याने सगळयांना सांगितली नव्हती. कोणी नव्हते तर तसे सांगून मुद्दाम स्वतःचा फज्जा करून घ्यायला तो काय आपला हे होता? हे म्हणजे नितिन. त्याला बुवा आपल्या फजित्या खाश्या मिटक्या मारत सांगायची खोड होती. तरी पंडीने मुद्दाम तो माणूस लक्षात ठेवायची काही गरज नव्हती.

तो गुरूपौर्णिमेच्या दिवशी शिवाजी मैदानात पण होता. पंडीने पुढचे सांगितले, आपल्या बहुतेक अमुदि वर्गांच्या तिथे मी त्याला पाहिलेय. अजून पुढे बघ, तोच का तुझ्या मागावरचा जाड्या, पण तो तर किती बारीक आहे. तिच्या आवाजात तिच्या डोक्यातला गोंधळ लपत नव्हता.

ओमचाही मोठ्ठा गोंधळ उडाला होता. त्याला भास वाटतात ते भास नसतात तर. म्हणजे त्याने आता जाड्या मागे पाहिला होता. तोही खरा तर. पण मग पंडी त्याला बारीक का म्हणतेय?

'कुठचा ग, मला दाखव' तेजाने फर्मािवले.

'तो... तिथे होता गं आता, तो नाही का त्याने मागे वळून बघितले आणि तुम्ही थांबला होतात. कसा झिंगत, झिंगत जात होता'.

तो दारूडा. निळा शर्ट आणि निळी जीन घातलेला? त्याच्या हातात पांढरे, लाल वेलक्रो पट्टेवालं घडयाळ होतं आणि त्याचा एक मोजा पांढरा नि एक काळा होता. त्याच्या गळ्यातल्या चेनमध्ये बदामी आकाराचं सोन्याचं पदक होतं न त्यात त्याच्या प्रेमिकेचं नाव मारीया लिहीलं होतं. तो? तेजाची सरबत्ती ऐकून ओम गार झाला. जे दहा सेकंद त्याने वळून या दोघांकडे पाहिलं तेवढयात तेजाने एवढं सारं टिपलं आणि लक्षात ठेवलं? ओमला तर नेमका त्याने कुठल्या रंगाचा शर्ट घातला होता ते सुद्धा आठवत नव्हतं.

त्याच्या प्रेमिकेचं नाव मारीया आहे होय? 'पंडीने जरा नाराज सुरात विचारले.'

'तो का त्याच्या आईचं नाव गळयात घालणार आहे? काय जाम चिकणा होता ना गं तो!'

आपण चुकीच्या साथीदारांबरोबर चुकीच्या वेळी उभे आहोत, हे ओमच्या पटकन लक्षात आलं. मिनीबसच्या दारातून एक मोठ्ठं गोल गरगरीत डोकं बाहेर आलेले ओमला दिसलं, तसा तो तिकडे धुंडीकडे पळाला. आता इथे अजून कोणीतरी मोठ्या व्यक्तिने येऊन झापेपर्यंत, तो माणूस कोणत्या टि.व्ही मालिकेमधल्या वा सिनेमामधल्या नायकासारखा दिसतो आणि ती मारीया त्याची कितवी प्रेमिका असेल, यावर देमार कीस पडत राहणार. हे गेल्या पंधरवड्यातल्या अनुभवावरून त्याला माहित झालं होतं. जरी तो माणूस सारखा ओमचा पाठलाग का करतोय यावर विचार करणे जरूरी होतं, तरी याक्षणी त्या दोघी तो तेजाच्या कि पंडीच्या मागे लागलाय यावर विचार करणं पसंत करतील याची ओमला खात्री होती. बसमध्ये चढता, चढता त्याने दोघींकडे एक ओझरता कटाक्ष टाकला तेव्हा चंटी त्यांना सामील झालीय आणि तिने ज्या तऱ्हेने छातीवर हात दडपलाय त्यावरून ती बाई! चित्कारत असणार त्याच्या लक्षात आले. त्या तिघींची नजर समोरच्या गर्दीत त्या चिकण्याला शोधत होती. तो खरोखर चिकणा होता का? ओमला तरी याबाबत शंकाच

होती.

त्या पांढऱ्या शुभ्र रंगात रंगवलेल्या बसवर अमुदि शिक्षण उपक्रम - फिरते वाचनालय असे सोनेरी मोठ्या अक्षरात दोन्ही बाजूला लिहीले होते. बसला खिडक्या नव्हत्या. तिथे त्यांच्याजागी



खच्चून भरलेले पुस्तकांचे खण होते. छताला काचेच्या खिडक्या होत्या. त्यातून सूर्यप्रकाश आत उतरत होता. मध्यम उंचीच्या, स्थूल बांध्याच्या आणि उभट चेहऱ्याच्या, मोठे नाक असणा-या एक बाई पुस्तकांच्या भल्या मोठया ढिगाबरोबर पसाऱ्यात बसलेल्या होत्या. दोरी बांधून गळ्यात लटकवलेला चष्मा ओमला पाहण्यासाठी त्यांनी उचलून नाकावर ठेवला व त्या त्याच्याकडे कुतूहलाने पाहू लागल्या.

'मी ओम माहिमकर'. नेमके काय बोलावे न कळून ओम म्हणाला. इतर बहुतेक अमुदि शिक्षकांप्रमाणे त्यांनी त्याच्याकडे बघून परवलीचा उच्चारला नाही. याबद्दल ओमला हायसे वाटले. तसे कोणी केले की जखमेवर मीठ चोळल्यासारखे त्याला वाटे.

'मी शैलजा परांजपे'. त्या म्हणाल्या. पुन्हा त्याच्याकडे कुतुहलाने

पाहू लागल्या. ओमला परत जास्त अवघडल्यासारखे झाले. त्याने मदतीसाठी आपल्या साथीदारांकडे पाहीले. धुंडी, शेरा, राम, श्याम चौघेही पुस्तकांत हरवून गेल्यासारखे बसले होते.

ओमने त्या चौघांकडे बोट दाखवत म्हटले, मी यांच्याबरोबर शिकतो.

ते चौघे होकार देतील या अपेक्षेने त्याने त्यांच्याकडे पाहिले. चौघांनी त्याच्याकडे ढिम्म लक्ष दिले नाही. त्या ओमकडे तशाच पाहत होत्या. ओम चुळबुळत तसाच जागच्या जागी उभा राहिला. यापूर्वी कधी तो कोणत्या वाचनालयात गेला नव्हता. तिथे काय करायचे असते त्याला नेमकी कल्पना नव्हती. अर्थात बाकीचे चौघे पुस्तक वाचत होते तसे एखादे वाचायचे उघड होते.

'मी पुस्तक वाचू'. त्याने चाचरत विचारले.

'तू रंगवलय का बांधले नाहीस?' बाईंनी विचारले.

रंगवलय काय असते? विचारायला प्रश्न ओमच्या ओठांवर आलेला. तो गुमान गिळून तो गप्प बसला. मान खाली घालून उभा राहिला. त्याने इतर चौघांकडे नजर टाकली. आणि पहिल्यांदाच त्याच्या लक्षात आले. त्या चौघांच्याही हातात सप्तरंगी कडी होती. तशी तर त्याने तेजाच्या आणि पंडीच्याही हातावर पाहिली होती. त्याला वाटले ती त्या दोघींची काही फॅशन वगैरे असावी.

'रंगवलय पाहिल्याशिवाय तुला मी कुठली आणि कशी पुस्तके देऊ शकणार?' बाईंनी सहानुभूतीने त्याला विचारले. कुठे हरवलाय का कि घरी विसरलास? तुला तुझा क्रम माहित आहे ना? 'काय ठरवला होतास?'

क्रम? बाईंच्या सहानुभूतीमुळे ओमची समस्या त्याच्या ओठांबाहेर फुटली. आता मात्र शेराला राहावले नाही. तो जागच्याजागी खुसुखुसु हसू लागला. श्यामही खुसुखुसु सुरू झाला. लगोलग राम. आपल्याला काहीच कळत नाही म्हणून ओम खजिल झाला. शरमला. धुंडी उठून त्याच्या जवळ आला. शेराने व राम, श्यामने त्याला खालीच

दाबायचा प्रयत्न केला. तरी तो उठलाच.

आपले हातातले ओमला दाखवून त्याने ओमला समजावले, हे बघ हे असे सात रंगाचे मणी असतात, त्यातला जो रंग आपल्याला जास्तीत जास्त आवडतो त्या क्रमाने ते ओवायचे आणि तो दोरा हातात बांधला कि झाले तुझे रंगवलय तयार. मग परांजपे बाईंकडे वळून त्यांनाही धुंडीने समजावून सांगितले, 'बाई तो पण माझ्यासारखा अदिक्षितांच्या शाळेतून इथे भरती झालाय. त्याला आपल्या अमुदि शाळेचे नियम माहित नाहीत. मी देऊ माझे रंगवलय त्याला?'

'नाही.'

'थोडा वेळ?'

'नाही. असे करता येत नाही. एकाचे दुसऱ्याला चालत नाही.'

एवढयात बाहेर मोठ्ठासा गलका झाला. तेव्हा सारे बाहेर डोकवायला लागले. तिथे एक रडवेलीशी तरुण मुलगी लंगडत येत होती आणि तिच्यामागे एक दारूडा मोठमोठयाने बडबडत येत होता.

चुकून धक्का लागला मिस; च्युकलो म्हण्णतो ना मी. दोष माझ्झा कसला, गट्टारी।।..करत त्याने एक जोरदार आराळी मारून दिली.

आज गट्टारीत परत एक जोरदार आरोळी मारली.

'माफ्फ केलं म्हणा, म्हणा ना।।..माफ केल्लं.' दारूडा परत त्या मुलीच्या अंगचटीला गेला. वाघ्या वागडेंनी आपल्या म्हाताऱ्या शरीरात होतं नव्हतं तेवढं बळ एकटवून त्याला बाजूला ढकलला. तसे त्याने एकदम दोन्ही हात वागडेंच्या गळयात टाकून त्यांचा मुकाच घेतला जवळ जवळ, वाघ्या काका जाम चिडले, आणि त्यांनी झोडत झोडत त्याला दूर नेले.

ओमने मनोमन निश्चय केला. आजपासून तो वाघ्याकाकांना वागडे आजोबा न म्हणता त्यांच्या आवडत्या नावाने हाक मारणार. ती मुलगी त्याच्या चांगल्या ओळखीची होती. त्याला राखी बांधणारी जोश्यांची नली. त्याने झटकन पुढे होऊन नलीला आधार दिला.

जन्मापासून तिचा एक पाय दुसऱ्यापेक्षा छोटा होता. त्यामुळे तिला लंगडत चालावे लागे. ओळखीचा आधार दिसताच तो जरी छोटा होता तरी नलीने त्याला घट्ट पकडून ठेवले. सगळी वरात मग बसमध्ये चढली.

ओमला चालता चालता तेजाच्या कानात कुजबुजल्याशिवाय राहावले नाही, 'पाहिलेस तुझ्या चिकण्याचे भारी पराक्रम'.

तेजाने त्याच्या पाठीत एक हलकासा दणका घातला.

कटू सत्य फार झोंबते. ओमने अजून चिडवले. चंटीने त्याच्या पाठीत एक गुद्दा हाणला,

'फार थोडे लोक सत्य पचवू शकतात'. ओमने वर मखलाशी केली.

पंडीने त्याला गुपचुप जोरदार चिमटा काढला. 'चूप नाटकाचे संवाद इथे ऐकवू नकोस'.

धावण्याच्या श्रमाने आणि भीतीने नलीची छाती अजून जोराने वरखाली धपापत होती. तिला घाम सुटला होता. परांजपे बाई तिला धीर देत होत्या. नली आक्रंदत म्हणाली, 'त्याने माझा मुका घ्यायचा प्रयत्न केला'.

'त्याने तुझा मुका घेतला'? चंटीने लगेच चंटपणे विचारले.

'नाही', म्हणत नली रडायला लागली.

आता यात रडायला काय झाले? ओम वैतागाने म्हणाला.

बिचारीची निराशा झाली रे, चंटी हळूच जाणतेपणाने त्याच्या कानात कुजबुजली. ते ऐकू गेल्यागत नली मोठयाने विव्हळली, 'त्याने माझा बूट मोडला. आता माझी शिकवणी चुकणार. मी कशी जाणार'?

ओमने नलीच्या पायात पाहिले. तिच्या पायांची उंची जुळवणारे बूट मुद्दामहून शिवून घेतले जात. त्यातला एक गायब होता. त्यांच्याशिवाय नलीला एकटीने चालत जाणे खरोखरच अवघड होते.

'मी शिकवणीला गेले नाही तर सर बाबांना फोन करणार. बाबा मला ओरडणार. आई मला रागावणार'. नलीचे रडगाणे संपत नव्हते, 'आज नविन धड्याची सुरूवात. ती चुकली की उद्या मला काही कळणार नाही. सर परत घेणार नाहीत. धड्याचे तीन गुण जाणार. आई म्हणणार मी मुद्दाम शिकवणी बुडवली. ओम आईला सांग.

अमुदि शाळेविषयी थापाथापी केल्यावर, आणि ती पकडली गेल्यावर पुन्हा जोशी पतीपत्नींसमोर उभे राहणे ओमसाठी किती अवघड संकट होते याची नलीला काही कल्पना! एकदा का थापेबाज नाव झाले की आता ओमची प्रत्येक गोष्ट थाप वाटणार होती.

'अगं पण आजचा धडा चुकला तर शिक्षकांना त्यांच्या फावल्या वेळात जाऊन भेट ना. ते देतील तुला व्यवस्थित शिकवून. नाहीतर मग दुसऱ्या शिक्षकांचा वर्ग असेल ना त्या धडयावर, त्याला जाऊन बस. परांजपे बाईंनी सोप्पी तोड काढली. एक शिकवणीचा वर्ग चुकल्याबद्दल इतका आकांत कशाला करायला हवा त्यांना कळेना. नलीला देखील त्या नेमके काय सुचवताहेत कळेना. शिकवणीचे सर एरव्हीच्या आपल्या फावल्या वेळेत वर्ग चुकलेल्या मुलांना कशाला शिकवायला बसलेत? शाळेचे शिक्षक देखील तसे शिकवणार नाहीत. पुन्हा तोच धडा दुसऱ्या एखादया शिक्षकांकडून कसा शिकवला जाणार? एकाच विषयाला दोन दोन शिकवण्या? थोडावेळ नली आणि परांजपे बाईंमध्ये विचित्र काथ्याकूट झाला. नलीला अमुदि शाळेच्या शिक्षण पद्धतीविषयी काही माहीत नव्हती, ना परांजपे बाईंना मराठी विद्यालयाच्या शिक्षण पद्धतींविषयी काही माहित होते. दोघींना एकमेकींच्या विचारांचे, प्रश्नांचे, उत्तरांचे संदर्भ कळत नव्हते. लागत नव्हते.

मग ओम आणि धुंडी आपापल्या परीने दुभाष्यांप्रमाणे त्या दोघींना दोन्ही शिक्षणपद्धतींमधले फरक समजावून द्यायचा प्रयत्न करू लागले. त्यामुळे गोंधळ अजून वाढला. धडयाचे तीन गुण

गमावणे म्हणजे बाईंना कळेना. बाईकडून अमुदिमध्ये कोणतीही परीक्षा आणि कोणतेही गुण, पास, नापास असा प्रकार नाही हे कळले, तेव्हा ओम जागेवरून उडायचा राहिला. मग करायचा कशाला अभ्यास? त्याच्या डोक्यात विचार डोकावला. पण ते अभ्यास ज्याला म्हणतात तो करत तरी कुठे होते? ते तर रोज रोज नव्या, नव्या ठिकाणी जात होत, नव्या नव्या लोकांला भेटत होते, गप्पा मारत होते. त्यात श्यामळा करण्यासारखे काय होते? त्याला अमुदि लोक अभ्यास म्हणतात?

बाईंना देखिल कळेना. जर नलीला तो विषय आवडत नाही, तो धडा आवडत नाही, ते शिक्षक आवडत नाहीत तर ती त्या वर्गांना जातेय कशाला? तिचे आईवडील तिला अशी जबरदस्ती का करतायत? ते तिचे सावत्र आईवडील आहेत का? बाईंना अशा छळवादी आईबापांच्या तावडीत सापडलेल्या नलीबद्दल भारी अनुकंपा वाटली. आपल्यापरीने तिच्यावर थोडा अनुग्रह करायचे त्यांनी ठरवले. त्या तिला सर्वांसाठी लिहिलेल्या खणांपाशी घेऊन गेल्या. तिथे तिला आवडेल ते पुस्तक त्यांनी निवडायला सांगितले. तिचा शिकवणी वर्ग बुडल्यात जमा होता. त्या वेळेचा तिला असा सदुपयोग करता आला असता.

'अय्या!' म्हणत नलीने एक जलावतरणावरचे पुस्तक उचलले. अनिता सूदचे पोहोण्याचे अनुभव तीने त्यात लिहीले होते. परांजपे बाईंना नलीची दया आली. पण ओमला मात्र त्यांनी काही देऊ केले नाही. याचे मनोमन त्याला फार वाईट वाटले.

(क्रमशः)

समीर बागायतकर, वेंगुर्ला
९८६०४९८८६२
इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in

# चित्र रंगवा



# ओळखा पाहू

**८५व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष**



विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक १५ फेब्रुवारी २०१२ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल मार्च २०१२ च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

'ऑक्टोबर' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

शक्तिमानचा जनक - मुकेश खन्ना

स्पर्धेचे विजेते **अरविंद जोशी - परभणी**

अशोक कुलकर्णी, सीमा कुलकर्णी, सुरेखा हावळ, अनघा विभुते - कोल्हापूर, अनिरुद्ध धिंडे - यवतमाळ, अश्विनी भोसले, - सांगली, शोभा ढेपे, अंजू सराफ, रामचंद्र धर्माधिकारी, अंजली जोशी , सुरेश पवार- अहमदनगर, लता विद्वांस - इन्दौर, प्रज्ञा घोडेस्वार, चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, राहूल जाधव, संतोष पाटील - सातारा, सुधिर भिडे, राजू जोशी - नाशिक, संजय मुळे, शिवमंगल चव्हाण - अमरावती, गुंजा घाटे, अनिकेत कुलकर्णी, व्यंकटेश काळे, उज्ज्वला फणसे, रमेश थेटे - पुणे, प्राची उमरकर - बुलढाणा, भीमराव गुंडे - सोलापूर, राम घाटे, संतोष काळबांडे, - अकोला, अंकुश घाटे, जयंत जुननकर - नागपूर, आरती सावे, सीमा काकोडकर, सोनी जाधव - नांदेड, रविंद्र सराफ - रावेर, रमेश गटकळ - बारामती

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०%   तीन वर्षांना २५%   पाच वर्षांना ३०%**

| एक वर्षाची | तीन वर्षांची | पाच वर्षांची |
|---|---|---|
| वर्गणी १५०रु. | वर्गणी ३५०रु. | वर्गणी ५००रु. |

**तीन किंवा पाच**
**वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'लोखंड खाणारे उंदीर'** आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका - वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'**
आणि **'चला जाणून घेऊ या प्रार्थना'**
प्रत्येकी ४०रु.ची
पुस्तक भेट
पोस्टेज २०रु.













भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 Jan. 2012

# विक्रम वेताळ मालिका

लेखिका -वैशाली कार्लेकर
















विक्रमादित्य हा एक धाडसी आणि बुध्दिमान राजा, तर स्मशनातला वेताळ भीती दाखवणारा पण मिश्कील स्वभावाचा! सतत नव्यानव्या सुरस कथा सांगून राजा विक्रमाला कोडयात टाकण्याचा हा सिलसिला आपल्यालाही घेऊन जातो गोष्टींच्या एका अद्‌भुत नगरीत!
















१० पुस्तकांचा संच किंमत ५००रु. **सवलतीत रु.४००**

सवलत ३१ जानेवारी २०१२ पर्यंतच

BOOK POST
Printed Matter

## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.